CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT


सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २७५ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती आहे

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि आपल्या हिंदुत्वनिष्ठ जीवन रचनेचे हेच वैशिष्ट्य आहे. आयुष्यभर 'अर्थ' आणि 'काम' या पुरुषार्थतच न रमता लवकरात लवकर त्यातून पूर्णपणे मुक्त होऊन उर्वरित जीवन समाजरूपी ईश्वराच्या सेवेत घालविण्यात मनुष्य जीवनाची सार्थकता आहे.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



अहिल्याबाई होळकर यांची आज (तारखेप्रमाणे) पुण्यतिथी

# आधार, पॅन, व्होटर आयडीने नागरिकत्व सिद्ध होत नाही

## मुंबई उच्च न्यायालयाचा निर्वाळा

◆ **मुंबई, १२ ऑगस्ट**

कोणत्याही व्यक्तीकडे जर आधार कार्ड, पॅन, मतदार ओळखपत्र यासारखे दस्तावेज आहेत, याचा अर्थ ती व्यक्ती भारताची नागरिक आहे, असा होत नाही. हा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणातील सुनावणीदरम्यान केला.



न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाने बांगलादेशी घुसखोराला जामीन नाकारताना वरील मत व्यक्त केले. या बांगलादेशी व्यक्तीवर बनावट दस्तावेज बनवून भारतात जवळपास एक वर्ष वास्तव्य केल्याचा आरोप आहे. कथित बांगलादेशीचे नाव बाबू अब्दुल रऊफ सरदार असे आहे. भारतात आल्यानंतर त्याने सर्व दस्तावेज तयार केले होते, ज्यात आधार, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र आणि भारताचा पासपोर्टदेखील होता.

न्यायालयाने म्हटले की, संसदेने १९५५ मध्ये नागरिकत्व अधिनियम पारित केला होता ज्यात स्पष्ट व्याख्या आहे की नागरिकत्वाचे निकष काय आहेत. नागरिकत्व कायदा अगदी स्पष्ट आहे. त्यात नागरिक कोण आहे आणि कोण नाही, याचे स्पष्ट दिशानिर्देश आहेत. शिवाय नागरिकत्व कसे प्राप्त करावे, हेही यात सांगितले आहे. ओळखपत्रे ओळख पटवण्यासाठी आहेत. ◂(वृत्तसंस्था)

## आधार कार्ड नागरिकत्वाचा पुरावा नाही : सुप्रीम कोर्ट

◆ **नवी दिल्ली, १२ ऑगस्ट**

बिहारमधील मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमावरून निर्माण झालेल्या वादावर सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. आधार कार्ड हे नागरिकत्वाचा अंतिम पुरावा म्हणून स्वीकारले जाऊ शकत नाही आणि त्याची सखोल पडताळणी करणे अत्यावश्यक आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.



बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी राबवण्यात येत असलेल्या या प्रक्रियेतील त्रुटींवर बोट ठेवणाऱ्या याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे मत व्यक्त केले. मंगळवारी झालेल्या सुनावणीत न्या. सूर्यकांत यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेचे समर्थन करीत म्हटले की, आधार कार्डला अंतिम पुरावा मानता येणार नाही, या निवडणूक आयोगाच्या मताशी आम्ही सहमत आहोत. त्याची पडताळणी होणे आवश्यक आहे.

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला. सिब्बल यांनी निदर्शनास आणून दिले की, १९५० नंतर भारतात जन्मलेली प्रत्येक व्यक्ती देशाची नागरिक आहे. मात्र, सध्याच्या प्रक्रियेत गंभीर त्रुटी आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### निवडणूक आयोगाचा प्रतिवाद

**»» निवडणूक आयोगाची बाजू मांडताना ज्येष्ठ विधिज्ञ राकेश द्विवेदी यांनी सांगितले की, 'ही केवळ एक प्रारूप यादी आहे. एवढ्या मोठ्या प्रक्रियेत किरकोळ चुका होण्याची शक्यता नाकारता येत नाही,' मात्र, जिवंत व्यक्तींना मृत दाखवल्याचा आरोप त्यांनी फेटाळला.** ■

# राज्यात १५ हजार पोलिसांची भरती होणार

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी


◆ **मुंबई, १२ ऑगस्ट**

महाराष्ट्र पोलिस दलातील शिपायांची सुमारे १५ हजार पदे भरण्यात येणार आहेत. त्यासाठी २०२४-२५ च्या पोलिस शिपाई भरती प्रक्रियेस मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या भरतीमध्ये २०२२ व २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार आहे.

राज्याच्या पोलिस दलात २०२४ दरम्यान रिक्त असलेली व २०२५ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन, ही भरती करण्यात येणार आहे. पोलिस शिपाई भरती प्रक्रिया त्या-त्या जिल्हास्तरावरून राबविण्यात येणार असून, त्यासाठी ओएमआर आधारित लेखी परीक्षा घेण्यात येईल.

भरतीसाठी अर्ज मागवणे, अर्जाची छाननी, त्यावर प्रक्रिया तसेच उमेदवारांची शारिरीक परीक्षा, त्यातून पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा यासाठी अनुषांगिक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार प्रशिक्षण व खास पथके विभागाचे अतिरिक्त पोलिस महासंचालकांना देण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस दलातील शिपाई संवर्गाची पदे अत्यंत महत्त्वाची आहेत. पदे रिक्त राहिल्यास, पोलिसांवरील कामाचा ताण वाढतो. पोलिस दल व कारागृहातील स्थिती सुधारण्यासाठी उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी ही पदे वेळेत भरली जावीत, असे निर्देश दिले आहेत. लोकप्रतिनिधी, तसेच विधिमंडळातील चर्चेतही लोकप्रतिनिधींकडून ही पदे तातडीने भरण्याची मागणी करण्यात आली आहे. ◂(तभा वृत्तसेवा)



| पद | संख्या |
|---|---|
| पोलिस शिपाई | १०,९०८ |
| पोलिस शिपाई चालक | २३४ |
| बॅण्ड्स मॅन | २५ |
| सशस्त्र पोलिस शिपाई | २,३९३ |
| कारागृह शिपाई | ५५४ |

## वाढत्या परताव्यांमुळे निव्वळ प्रत्यक्ष कर संग्रहाचे प्रमाण घटले

◆ **नवी दिल्ली, १२ ऑगस्ट**

मोठ्या प्रमाणात वाढलेल्या परताव्यांमुळे निव्वळ प्रत्यक्ष कर संग्रहाचे प्रमाण ३.९५ टक्क्यांनी घटून यंदाच्या आर्थिक वर्षात आतापर्यंत ६.६४ लाख कोटी रुपये सरकारी तिजोरीत जमा झाले असल्याची माहिती मंगळवारी जारी झालेल्या सरकारी आकडेवारीतून समोर आली. प्रत्यक्ष करामध्ये कंपन्या, व्यक्ती आणि व्यावसायिक तसेच इतर संस्थांनी भरलेल्या उत्पन्नावरील कराचा समावेश आहे. आतापर्यंत निव्वळ कॉर्पोरेट कर संकलन २.२९ लाख कोटी रुपयांचे झाले, तर गैर-कॉर्पोरेट करसंकलन ४.१२ लाख कोटी रुपये झाले. ■

## भारत-चीन दरम्यान थेट विमानसेवा लवकरच

**नवी दिल्ली :** भारत आणि चीन पुढील महिन्याच्या सुरुवातीला थेट विमानसेवा सुरू करू शकतात. दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये सुधारणा झाल्याचे हे लक्षण आहे. भारत सरकारने एअर इंडिया आणि इंडिगो सारख्या विमान कंपन्यांना चीनला त्वरित उड्डाणे सुरू करण्यासाठी सज्ज राहण्यास सांगितले आहे. ■

# राशन दुकानदारांच्या 'मार्जिन'मध्ये वाढ

## क्विंटलमागे १५० ऐवजी १७० रुपये मिळणार



◆ **मुंबई, १२ ऑगस्ट**


राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य व साखरेचे वाटप करणाऱ्या रास्त भाव दुकानदारांच्या 'मार्जिन'मध्ये क्विंटलमागे २० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे आता दुकानदारांना यापूर्वीच्या १५० रुपयांऐवजी १७० रुपये 'मार्जिन' मिळणार आहे.

अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना शिधापत्रिकाधारकांना ५३ हजार ९१० रास्तभाव दुकानदारांमार्फत ई-पॉस मशिनद्वारे बायोमेट्रिक पडताळणी करून अन्नधान्य, साखर व इतर वस्तूंचे वितरण करण्यात येते.

या दुकानदारांना केंद्र शासनाकडून ४५ रुपये आणि राज्य शासनाकडून १०५ रुपये असे एकूण क्विंटलमागे १५० रुपये 'मार्जिन' म्हणून दिले जात होते. या 'मार्जिन' रकमेत वाढ करण्याची विनंती या दुकानदारांच्या संघटनांकडून करण्यात येत होती. त्यानुसार या 'मार्जिन'मध्ये क्विंटलमागे २० रुपयांची वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार क्विंटलमागे रास्त भाव दुकानदारांना १७० रुपये (१७०० रुपये प्रति मेट्रिक टन) असे 'मार्जिन' देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे दरवर्षी सुमारे ९२.७१ कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद केली जाणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### बँक शेअर्समुळे बाजारात मोठी घसरण



**मुंबई :** भारतीय शेअर बाजाराने दुपारच्या सत्रात मोठी घसरण नोंदवली. निर्देशांक ३०० पेक्षा जास्त अंकांनी खाली आला, तर निफ्टीतही नीचांकी पातळी दिसून आली. एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय यासारख्या बँकिंग क्षेत्रातील दिग्गज समभागांतील नुकसान हे घसरणीचे प्रमुख कारण ठरले. मात्र, व्यापक बाजाराने निर्देशांकांच्या तुलनेत कमी नुकसान सहन केले. त्यामुळे काही क्षेत्र या मंदीच्या तडाख्यातून वाचली. ■

### किरकोळ महागाई दराने गाठला आठ वर्षांचा नीचांक


**नवी दिल्ली :** जुलैमध्ये किरकोळ महागाई १.५५ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. ही ८ वर्षे आणि १ महिन्यातील सर्वांत कमी पातळी आहे. जून २०१७ मध्ये यापूर्वी ती १.५४ टक्के होती. त्याच वेळी, जून २०२५ मध्ये किरकोळ महागाई २.१० टक्के होती. मे २०२५ मध्ये ती २.८२ टक्के होती आणि एप्रिल २०२५ मध्ये ती ३.१६ टक्के होती. अन्नपदार्थांच्या किमतींमध्ये सतत घट झाल्यामुळे किरकोळ महागाई कमी झाली आहे. किरकोळ महागाईचे आकडे आज म्हणजेच १२ ऑगस्ट रोजी जाहीर झाले आहेत. आरबीआयचे उद्दिष्ट महागाई ४ ते २ टक्क्यांच्या आत ठेवण्याचे आहे. जुलैमध्ये किरकोळ महागाई १.५५ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. म्हणजेच यावेळी महागाई आरबीआयच्या लक्ष्यापेक्षा कमी आहे.

### आयर्लंडमध्ये भारतीयांवर एका महिन्यात सहा हल्ले

**डब्लिन :** युरोपीय देश आयर्लंडमध्ये भारतीय नागरिकांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटनांमुळे दक्षिण आशियाई स्थलांतरितांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सुमारे एका महिन्यात डब्लिन, क्लोंडाल्किन, बॅलीमुन आणि वॉटरफोर्ड येथे भारतीय स्थलांतरितांवर सहा हल्ले झाले आहेत. पीडितांना गंभीर दुखापत झाली. निष्पाप मुलांना मारहाण करण्यात आली आणि वांशिक शिवीगाळ करण्यात आली. परिस्थिती अशी आहे की अनेक भारतीय आणि आशियाई लोक म्हणतात की ते आयर्लंड सोडून इतर युरोपीय देशांमध्ये स्थायिक होण्याचा विचार करीत आहेत. एका भारतीय परिचारिकेने सोशल मीडियावर एक खुले पत्र शेअर केले आहे. ज्यामध्ये तिने म्हटले आहे की तिच्या सहकाऱ्यांनी तिच्यावर अत्याचार केले आहेत. ती आता आयर्लंड सोडण्याचा विचार करीत आहे.

# तीन राज्यांत उभारणार चार सेमीकंडक्टर प्रकल्प

## केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय | ४६०० कोटींच्या निधीची तरतूद



◆ **नवी दिल्ली, १२ ऑगस्ट**

ओडिशा, पंजाब आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यांत सेमीकंडक्टरचे चार प्रकल्प उभारले जाणार आहे, यासाठी ४६०० कोटी रुपयांची तरतूद करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यापूर्वी सहा सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली, त्यामुळे या प्रकल्पांची देशातील संख्या दहावर गेली असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंगळवारी पत्रपरिषदेत दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत संसदभवनात केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली, त्यात तीन निर्णय घेण्यात आले. या बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह, आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांच्यासह इतर मंत्री उपस्थित होते. मंत्रिमंडळ निर्णयाची माहिती देताना वैष्णव म्हणाले, भारत सेमीकंडक्टर मिशनअंतर्गत सेमीकंडक्टर प्रकल्पासाठी सिकसेम, कॉन्टिनेंटल डिव्हाईस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, थ्रीडी ग्लास सोल्युशन्स इंक आणि ॲडव्हान्स सिस्टम इन पॅकेज या चार कंपन्या स्थापन करण्यात येणार आहे. देशात २०२२ मध्ये सेमीकंडक्टर योजनेचा प्रारंभ झाला, सध्या सहा कारखान्यातून दरवर्षी २४ बिलियन चिप्स तयार केल्या जात आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### लखनौ मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला मान्यता

»» उत्तरप्रदेशची राजधानी लखनौ येथे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला आणि केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. १२ स्थानक असलेल्या ११.१६५ किमी लांबीच्या या मेट्रो मार्गासाठी ५,८०१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. ■

### अरुणाचल प्रदेशमध्ये तातो जलविद्युत प्रकल्प

»» अरुणाचल प्रदेशच्या शियोमी जिल्ह्यात तातो जलविद्युत प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी देण्यात आली. ७०० मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पासाठी ८,१४६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, सहा वर्षांत हा प्रकल्प उभारला जाणार आहे. ■

# बोगस बियाणे, खतविक्रीला आता बसणार चाप

**● या अधिवेशनात आणणार कठोर कायदा : चौहान**

**जयपूर, १२ ऑगस्ट**

बोगस बियाणे आणि खतांची विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यासाठी केंद्र सरकार लवकरच नवीन कायदा आणणार आहे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना चाप लावण्यासाठी पावसाळी अधिवेशनातच विधेयक मांडणार असल्याचे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज चौहान यांनी मंगळवारी सांगितले.

राजस्थानच्या दौऱ्यावर आलेल्या चौहान यांनी झुंझुनू येथे आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले की, शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि शेतकरी हा देशाचा आत्मा आहे. केंद्र सरकार सतत धोरणात्मक निर्णय आणि योजनांद्वारे शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी वचनबद्ध आहेत. बोगस बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी लवकरच एक नवीन कायदा आणला जाईल. यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्यात आणला असून, संसदेच्या पावसाळी अधिवेशनातच विधेयक सादर करणार आहे.

# बाल वर्गमित्राकडून बाल विद्यार्थिनीवर अतिप्रसंग

## बालकाविरुद्ध गुन्हा

**बाभुळगाव, १२ ऑगस्ट**

तालुक्यातील एका शाळेत तिसऱ्या वर्गात शिकणाऱ्या आठ वर्षीय मुलीवर नऊ वर्षीय वर्गमित्राने शाळेच्या शौचालयात नेत तिच्याशी अतिप्रसंग केला. समाजमन सुन्न करणारी ही घटना तालुक्यातील एका शाळेत ४ ऑगस्टला घडली. मात्र, बदनामीच्या भीतीने कुटुंबियांनी १० ऑगस्ट रोजी या प्रकरणी बाभुळगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

बाभुळगाव तालुक्यातील एका शाळेत तिसऱ्या वर्गात शिकणारी विद्यार्थिनी आणि तिचा वर्गमित्र असे दोघेजण सोबतच शाळेत गेले. त्यानंतर शिक्षकांची आणि विद्यार्थी मित्रांची नजर चुकवून ते दोघे शाळेच्या शौचालयात गेले. तिथे त्या विद्यार्थ्याने त्या विद्यार्थिनीशी अतिप्रसंग केला. ही बाब त्यावेळी कुणाच्याही लक्षात आली नाही. मात्र, घरी गेल्यानंतर आईच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. पीडित मुलीला विश्वासात घेत आईने विचारणा केली, तेव्हा ती बोलती झाली.

मात्र, बदनामीच्या भीतीने तिने याची कुठेही वाच्यता केली नाही. दरम्यान, मनातील भीती दूर होताच पीडितेला सोबत घेऊन आईने बाभुळगाव पोलिस ठाण्यात या प्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून (२), ३ (५) बीएनएस सहकलम ४ (२), ६ पॉक्सोअन्वये गुन्हा नोंद करण्यात आला

# भारताच्या सीमेपर्यंत चीनचा नवीन रेल्वे प्रकल्प

## सैन्याच्या जलद तैनातीसाठी मदत, तिबेटला जोडणारी ट्रेन सुरू करणार

◆ **नवी दिल्ली, १२ ऑगस्ट**

तिबेट-शिनजियांग रेल्वे मार्ग सुरू करण्याची तयारी चीनने सुरू केली आहे. हा रेल्वे प्रकल्प भारताच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळून अक्साई चीन प्रदेशातून आणि नेपाळ सीमेच्या डोकलाम येथील चंबी खोऱ्यापर्यंत पोहोचणार. सीमेवर सैन्याची जलद तैनाती आणि तिबेटला रेल्वेने जोडण्यासाठी हा प्रकल्प उभारण्यास लवकरच सुरुवात होणार आहे.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, चीन अरुणाचल प्रदेश सीमेजवळील ल्हासा-न्यिंगची मार्गापलीकडे प्रमुख लष्करी केंद्र असलेल्या चेंगडूपर्यंत रेल्वेमार्ग वाढवण्याची चीनची योजना आहे. याशिवाय हा रेल्वे मार्ग नेपाळ-तिबेट सीमेवरील ग्यारोंग आणि चंबी खोऱ्यातील याडोंग काउंटीपर्यंत पोहोचेल. चंबी खोरे हे संवेदनशील क्षेत्र आहे जिथे २०१७ मध्ये डोकलाममध्ये भारत आणि चीनमध्ये लष्करी संघर्ष झाला होता. आतापर्यंत भारताने या रेल्वे प्रकल्पासंदर्भात प्रतिक्रिया दिलेली नाही. सीमेवरील पायाभूत सुविधांच्या चीनच्या धडाक्याच्या पृष्ठभूमीवर भारतदेखील आपल्या सीमेवरील पायाभूत सुविधा मजबूत करीत आहे. २००६ मध्ये चीनने पहिल्यांदा तिबेटला आपल्या रेल्वे नेटवर्कशी जोडले. गोलमुड ते ल्हासा ही ट्रेन ताशी १०० किमी वेगाने धावते. ◂(वृत्तसंस्था)

# न्या. वर्मांविरोधात महाभियोगाला मान्यता

## लोकसभा सभापतींनी स्थापन केली तीन सदस्यीय उच्चाधिकार समिती

◆ **नवी दिल्ली, १२ ऑगस्ट**

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्या. यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग चालविण्याच्या खासदारांनी दिलेला प्रस्तावाला लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी मंगळवारी मंजुरी दिली. याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्यांनी तीन सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती गठित केली. या समितीत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि एका ज्येष्ठ विधिज्ञाचा समावेश आहे.



लोकसभेत माहिती देताना सभापती बिर्ला म्हणाले, न्या. यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग चालवण्यासाठी मला भाजपाचे रविशंकरप्रसाद यांच्यासर्फे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या १४६ सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असलेला महाभियोगाचा प्रस्ताव मिळाला आहे. या सदस्यांनी प्रस्तावात न्या. वर्मा यांना पदावरून हटवण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाच्या पुढील कार्यवाहिसाठी तीन सदस्यीय समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. यात सर्वोच्च न्यायालयाचे न्या. अरविंदकुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मनिंदर मोहन श्रीवास्तव आणि कर्नाटक उच्च न्यायालयातील कायदेतज्ज्ञ बी. व्ही. आचार्य यांचा या समितीत समावेश आहे. या समितीचा अहवाल येईपर्यंत न्या. वर्मा यांच्याविरुद्धचा महाभियोग लोकसभेत प्रलंबित राहील.

**काय आहे प्रकरण?**

न्या. वर्मा दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती असताना १४ मार्च २०२५ ला त्यांच्या शासकीय निवासस्थानी आग लागली होती. आगीवर नियंत्रणासाठी आलेल्या अग्निशमन दल आणि पोलिस पथकाला एका पोत्यात जळालेल्या नोटा आढळून आल्या. या घटनेनंतर न्या. वर्मा यांची अलाहबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. ◂(वृत्तसंस्था)

### अहवालानंतर प्रस्तावावर चर्चा

»» समितीच्या अहवालानंतर लोकसभेत महाभियोग प्रस्तावावर चर्चा होईल आणि त्यानंतर तो पारित केला जाईल. लोकसभेने पारित केलेला प्रस्ताव नंतर राज्यसभेत पाठवला जाईल. दोन्ही सभागृहांनी हा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर राष्ट्रपती न्या. यशवंत वर्मा यांना पदावरून हटविण्याचा आदेश काढणार आहे. ■

# आमचा वाईट काळ संपला, स्वबळावर लढू द्या : वडेट्टीवार

**पुणे, १२ ऑगस्ट**

आमचा वाईट काळ संपला आहे आणि आता आम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढू द्याव्या, अशी मागणी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे केल्याची माहिती विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मंगळवारी दिली.



काँग्रेसच्या नवनियुक्त प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या कार्यशाळेच्या समारोप सत्रात बोलताना वडेट्टीवार म्हणाले, महाविकास आघाडी म्हणून निवडणुका लढवण्याऐवजी स्वबळावर निवणुकीला सामोरे जाण्याची पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची इच्छा आहे. देशासाठी इंडिया आघाडी आणि राज्यासाठी महाविकास आघाडी गरजेची आहे, हे मान्य. पण स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे वेगळी असतात. त्यामुळे आमची स्वबळावरच लढायची मागणी आहे. मागच्या निवडणुकीत आम्ही मुंबईत स्वबळावर लढून ३७ जागा जिंकल्या होत्या. हा आकडा विसरता येणार नाही.

राजकारणात वाईट काळ येतो आणि जातो. आघाडीत काँग्रेसलाच नुकसान मविआसोबत निवडणुका लढवल्यास काँग्रेसलाच याचा फटका बसतो. त्यात ठाकरे बंधू एकत्र आल्यास आपल्याला विचार करावा लागणार आहे. उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीचा अविभाज्य भाग आहेत. पण, दोन भावांच्या एकत्र येण्याची केवळ चर्चा सुरू आहे, त्यांनी एकत्र निवडणुका लढण्याचे अद्याप अधिकृत जाहीर केलेले नाही.

## महत्त्वाचे...



### पत्रकार शोभा वाघमोडे यांनी कारागृहातील बंदींना बांधूल्या राख्या

**अकलूज, दि. १२ ऑगस्ट -**

रक्षाबंधन या पवित्र दिवसाचे औचित्य साधून पत्रकार शोभा वाघमोडे यांनी कारागृहातील ५४ बंदींना राख्या बांधून रक्षाबंधन हा सण साजरा केला व त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना केली.अवगुण सोडून देण्याचे केले आवाहनही केले. पत्रकार वाघमोडे या नेहमीच सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारे उपक्रम घेतात. यावेळी अनेक बंदी जणांच्या डोळ्यातून आनंदाश्रू तराळले. अनेकांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. हा सण माळशिरस तहसीलदार सुरेश शेजूळ, तुरुंग अधिकारी जी.एस. खैरे यांच्या परवानगीने पोलीस हवालदार गणेश हांगे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश पवार या सर्वांचे परवानगीने समक्ष साजरा करण्यात आला.



### सोनटक्के यांची आरोग्य सहाय्यक पदावर निवड झाल्याबद्दल स्विमींग ग्रुपतर्फे सन्मान

**अक्कलकोट, दि. १२ ऑगस्ट-**

येथील स्विमींग ग्रुपचे सदस्य चंद्रकांत सोनटक्के यांची आरोग्य सेवक पदावरून शिरवळ येथे आरोग्य सहाय्यक पदावर निवड झाल्याबद्दल स्विमिंग ग्रुपचे संस्थापक व श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश मालक इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. प्रसंगी स्विमींग ग्रुपचे सदस्य संतोष पराणे, बाळासाहेब एकबोटे, श्रीकांत झिपरे, प्रथमेश इंगळे, आदित्य गवंडी, तन्मय इचगे, दर्शन घाटगे, समर्थ भोसले, धनराज स्वामी, श्रीशैल कुंभार, राजू एकबोटे, विश्वनाथ देवरमनी, अशोक कलशेट्टी, महादेव आडवितोटे, सचिन किरनळ्ळी, सुनील पवार, हनुमंत माळी, संतोष जवळगे, कुमार हत्तुरे, शैलेश राठोड व समस्त स्विमिंग परिवार उपस्थित होते.



### क्रांतिसिंह नाना पाटील व कॉ. अण्णाभाऊ साठे हे जनलढ्याचे नायक : प्रा. ठोंबरे

**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी शेतकरी वर्गाला जागे करण्यासाठी संपूर्ण आयुष्यभर संघर्षाचा मार्ग पत्करला. क्रांतिसिंह नाना पाटील व कॉ. अण्णाभाऊ साठे हे जनलढ्याचे नायक होते. क्रांतिसिंह नाना पाटलांनी सांगितलेल्या मार्गाने शेतकरी वर्गाने पुढे जावे हीच त्यांना आदरांजली ठरेल, असे मत कॉ. तानाजी ठोंबरे यांनी व्यक्त केले. भारतीय कम्युनिस्ट पक्ष व आयटक कामगार केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कॉम्रेड अण्णाभाऊ साठे व कॉम्रेड क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते कॉम्रेड युवराज घाडगे उपस्थित होते. यावेळी आरोही शहाणे हिने माझी मैना गावावर राहिली ही अण्णाभाऊंची छक्कड गायली. सूत्रसंचालन प्रविण मस्तुद, आभार बालाजी शितोळे यांनी व्यक्त केले. यावेळी कॉम्रेड ए. बी. कुलकर्णी, लहू आगलावे, राजेंद्र करली, अनिरुद्ध नखाते, आनंद गुरव, निर्मला सरवदे, भारत भोसले, भारत चव्हाण, राजू ढेंबरे, अक्षय मंडलिक, नाना कसबे, अशोक सांगडे, आय्याज मुजावर, सुवर्णा कांबळे आदी उपस्थित होते.



### सार्वजनिक वाचनालयात डॉ. रंगनाथन जयंती

**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

बार्शीतील सार्वजनिक वाचनालयात ग्रंथालय शास्त्राचे जनक, भारताचे पहिले ग्रंथपाल पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांची१३३ वी जयंती वाचनालयाचे जेष्ठ वाचक जी. एच. बोकेफोडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन साजरी करण्यात आली. वाचन आणि वाचनालयांचे महत्व त्यांनी फार पटवून सांगितले. या कार्यक्रमावेळी वाचक, सभासद ग्रंथपाल आशिष चौधरी, सहा. ग्रंथपाल सचिन यादव आणि बाल विभाग लिपिक गिरीजा काळे उपस्थित होते.

### बस प्रवासात महिलेच्या गळ्यातील गंठणची चोरी

**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

तालुक्यातील कासारवाडी येथील एका महिलेच्या गळ्यातील सुमारे ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण बस प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे.फिर्यादी राजश्री महेश कांबळे (वय ५८, रा. कासारवाडी रोड, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्या ५ ऑगस्ट रोजी दुपारी बार्शी बस स्थानकातून स्वारगेट-लातूर बसने ढोकी येथे माहेरी जाण्यास निघाल्या होत्या. सायंकाळी सहाच्या सुमारास ढोकी येथे पोहोचून घरी गेल्यावर त्यांची वहिनीने गळ्यातील मिनी गंठण दिसत नसल्याचे सांगितले. गळा तपासल्यावर गंठण गायब असल्याचे दिसून आले. शोध घेतला असता ते सापडले नाही. सदर मिनी गंठण १० ग्रॅम ८५० मि.ग्रॅ. वजनाचे आहे. याबाबत त्यांनी पोलिसांत गुन्हा नोंद केला असून पोलीस तपास करीत आहेत.

# वारकरी संप्रदायाच्या बैठकीत कॉरिडॉर प्रकल्पास विरोध

## सुवर्णमध्य काढण्यासाठी अभ्यास कृती समिती नेमण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ ऑगस्ट -**

येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात जिल्हाधिकाऱ्यांसमवेत येथील मठाधिपती, श्री पंढरपूर तिर्थक्षेत्र बचाव कृती समितीचे पदाधिकारी आणि सकल वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी यांच्या मध्ये बैठक पार पडली. बैठकीच्या वेळी उपस्थित मंडळींनी जिल्हाधिकाऱ्यां समोर काही महत्वाचे मुद्दे उपस्थित करुन त्या संदर्भातील प्रश्नांची जिल्हाधिकाऱ्यांना विचारणा केली.

यावेळी वारकरी संप्रदायातील महाराज मंडळींनी उपस्थित केलेले मुद्दे तसेच सुचना पुढील प्रमाणे. संभाव्य कॉरीडॉरला सर्व वारकरी संप्रदाय महाराज मंडळींनी सध्याच्या प्रस्तावित विकास आराखड्यातील उद्धस्तीकरणाला ठाम विरोध दर्शविला. आम्ही दिलेल्या सुचनांचे दिलेल्या भुवैकुंठ विकास आराखड्याचे काय झाले ? हा प्रतिप्रश्न करण्यात आला. नागरीकांसोबतच माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी लोकांची घरेदारे पाडून कॉरीडॉर करण्याऐवजी नेमकं काय कारणं गरजेचे आहे हे सुचना करणारे पत्र तत्कालीन जिल्हाधिकारी यांना लिखित स्वरूपात दिले होते त्यासुचना का स्विकारल्या नाही हा प्रश्न देखील विचारण्यात आला.

विकासाला आमचा विरोध नाही फक्त तो विकास प्रथा, परंपरा यांचे पालन करत वारकरी संप्रदाय व पंढरपूर नागरिक यांच्या मार्गदर्शनाखाली व्हावा.

वाराणसी व पंढरपूर तुलना करुन विकास आराखडा नको. पंढरपुरची मुळ रचना, संस्कृती कायम ठेवून विकास आराखडा मांडला जावा. असा विकास आराखडा तयार करण्यासाठी वारकरी संप्रदाय, पंढरपुरचे नागरिक, लोकप्रतिनिधी, प्रशासकिय अधिकारी यांचा समावेश असणारी एक 'पंढरपूर विकास आराखडा अभ्यास समिती ' नेमावी व पंढरपूरचा विकास आराखडा नव्याने तयार करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी आग्रही मागणी लिखीत मौखिक स्वरूपात सर्वांनी केली.

सध्या शासन, वारकरी संप्रदाय व पंढरपूर नागरिक यांचा सर्वांच्या संमतीने विकास आराखडा तयार करण्यासाठी वारकरी संप्रदायातील मान्यवर प्रतिनिधी, पंढरपुर नागरिक प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी,व प्रशासकीय अधिकारी यांची एक 'पंढरपुर विकास आराखडा अभ्यास समिती ' तयार केली व त्या समितीच्या मार्गदर्शनाखाली पंढरपुर विकास आराखड्याची पुनर्मांडणी प्रयत्न झाला तर सर्वांना समाधान होईल असा पंढरपुर विकास करणे शक्य होईल. या साठी सदर समितीचे तात्काळ गठण होणे आवश्यक आहे.




### लग्नच ठरले नाही आणि तुम्ही हुंड्याची बात करता

शासनाच्या 'विकास' नावाच्या मुलाला आमच्या मंदिर परिसरातील 'भुमी' नावाची मुलगी पसंत पडली...तुम्ही लग्नाची मागणी घातली परंतू आम्ही नकार दिला....तरीही तुम्ही सध्या फक्त मोबदला दृष्टीने बोला असे म्हणता ते म्हणजे लग्नच ठरले नाही... हुंडा,किती रुखवतात काय काय घ्यायचं अशी तयारी शासनाची दिसते आहे अशी टिका देखील उपस्थित मठाधिपती, महाराज मंडळींकडून करण्यात आली.

### बैठकीस यांची होती उपस्थिती

यावेळी कॉरिडॉर विरोधी कृती समिती अध्यक्ष अभयसिंह इचगावकर, रामकृष्ण महाराज वीर, चैतन्य महाराज देगलूरकर, तुकाराम चिंचणीकर, गणेश लंके, भागवत चवरे महाराज, अँड सुधीर रानडे, दत्तात्रय (नाना)कवठेकर, व्यंकटेश कुलकर्णी, गणेश बडवे, डॉ सचिन लादे , कौस्तुभ गुंडेवार, अभय कुलकर्णी, मदन महाराज हरिदास, माजी नगरसेवक ऋषिकेश उत्पात आदी बैठकीस उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांना निवेदन

दरम्यान यावेळी श्री पंढरपुर तिर्थक्षेत्र बचाव कृती समिती आणि सकल वारकरी संप्रदाय यांच्या वतीने प्रस्तावित विकास आराखड्या संदर्भात मुख्यमंत्र्यांना एक निवेदन देखील देण्यात आले. या निवेदनाची प्रत माहितीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना देखील यावेळी देण्यात आली. या बरोबरच विभागीय आयुक्त यांना देखील हे निवेदन पाठविण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या निवेदनात मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी वारकऱ्यांना सुखसुविधा देण्यासाठी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पंढरपूर विकास आराखडा प्रस्तावित केला आहे. यास कॉरीडॉर अशी संबोधना शासनाकडून करण्यात आले आहे. शासनाच्या सदर प्रस्तावात अनेक त्रुटी असून सदरचा प्रस्ताव वारकरी संप्रदायातील मान्यवरांनी केलेल्या सुचना डावलून तसेच वारकऱ्यांचे प्रश्न वेगळे आणि उत्तरे वेगळी असा दिसून येत आहे. या मध्ये अनावश्यक भुसंपादन देखील दाखवण्यात आले आहे.यावरुन मोठा वादंग सुरु आहे. वारकरी संप्रदायातील सर्वांनी मिळून एक चांगला भुवैकुंठ विकास आराखडा शासनास सादर केला होता त्याचे काय झाले याचे उत्तर शासनाकडून मिळाले नाही.

### प्रशासनाच्या भूमिककडे सर्वांचे लक्ष

मध्यंतरी जिल्हाधिकारी रजेवर गेलेले होते. त्यावेळी त्यांच्या अनुपस्थिती मध्ये तीन उपजिल्हाधिकाऱ्यांनी संभाव्य कॉंरिडोर बाधित नागरिकांशी २५ जुलै ते ५ आँगस्ट या काळात चर्चा केली. त्या नंतर मंगळवारी (दि.१२) जिल्हाधिकाऱ्यांनी पुन्हा चर्चेसाठी शहरातील मठाधिपती, महाराज मंडळी आणि तिर्थक्षेत्र बचाव समितीच्या काही पदाधिकाऱ्यांना बोलाविले होते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून आता या नंतरची पुढची स्टेप काय असणार,? कारण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पंढरपूर कॉंरिडोर हा ड्रीमप्रोजक्ट आहे. सहाजिकच या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांवर आहे. त्यामुळे आजच्या बैठकीनंतर जिल्हाधिकारी नेमकी काय भूमिका घेणार याकडे पंढरपूर वासियांचे आता लक्ष लागलेले आहे.

या समितीच्या द्वाराच या प्रश्नावर तोडगा निघू शकतो असे आम्हा सर्वांना वाटते, आपण सकारात्मक निर्णय घ्यावा असे देखील या निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे.

# महापालिकेत ड्रेस कोडचे पालन न केल्यास कर्मचाऱ्यांना होणार ५०० रुपयांचा दंड

## कार्यालयात थुंकणाऱ्यांना हजार रुपये दंड

## गैरवर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना चाप

## आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

सोलापूर महापालिकेतील गैरवर्तन, बेशिस्तपणा करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. महापालिकेत ड्रेस कोडचे पालन न केल्यास कर्मचाऱ्यांना ५०० रुपयांचा दंड तर पान, तंबाकू, गुटका खावून कार्यालयात थुंकून कार्यालय अस्वच्छ करणाऱ्यास प्रत्येक वेळी १ हजार रुपये दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. या संदर्भात महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेश काढले आहेत. यामुळे आता गैरवर्तन करणाऱ्या कर्मचारी, अधिकाऱ्यांना चाप बसणार आहे.



शासकीय कर्मचारी हे शासन आणि नागरीक यामधील दुवा असून सोलापूर महानगरपालिकेवा प्रतिनिधी म्हणून कर्मचारी/अधिकारी यांचे कार्यालयामध्ये व समाजामध्ये वावरतांना शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार वर्तन असणे आवश्यक आहे. काही अधिकारी व कर्मचारी यांचे वर्तन तसे दिसून येत नाही, अथवा दिलेली कर्तव्य व्यवस्थितरित्या पार पाडत नाहीत. त्यामुळे यापूढे सोलापूर महापालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांनी गैरवर्तन केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

कर्तव्य कसूरता तपशील आणि दंडात्मक कारवाई याप्रमाणे करण्यात येणार असून यामध्ये ज्या अधिकारी/कर्मचारी यांना महापालिकेने गणवेश ठरवून दिले आहे, त्यांनी तो गणवेश परिधान न करता कर्तव्यावर हजर राहणे, अथवा शासन निर्देशानुसार विहित ड्रेस कोडचे पालन न करणे या संदर्भात प्रति वेळा ५०० रुपये दंड आकारण्यात येणार आहे. पान, तंबाकू, गुटका खावून कार्यालयात थुंकून कार्यालय अस्वच्छ करणाऱ्यास प्रति वेळा १ हजार रुपये दंडात्मक कारवाई केली जाईल.

कर्तव्यावर उशीर येणाऱ्या तसेच कर्मचाऱ्यांना निश्चित करून दिलेल्या वेळेनंतर बायोमेट्रीक प्रणालीनुसार कर्तव्यावर येत असल्यास त्यांची प्रती तीन लेट मार्क करीता एक दिवस याप्रमाणे रजा खर्ची घालण्यात येणार आहे. तसेच वरिष्ठांच्या आदेशाचे /सुचनांचे पालन न करणे (लेखी/टेलिग्राम, व्हाट्सअप, ईमेल/भ्रमणध्वनी वरील आदेश) यासाठी प्रति वेळा १ हजार रुपये दंड करण्यात येणार आहे.

सोलापूर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी अथवा कर्मचारी यांच्याकडून कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा, दुर्लक्ष किंवा चुकीचे वर्तन झाल्याचे तसेच बेजबाबदारपणा निर्देशनास आल्यास त्या विभागाचे विभाग प्रमुख यांनी कर्तव्य कसूरता च्या कारणास्तव संबंधितांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येवून संबंधिताकडून खुलासा मागविण्यात यावा.अधिकारी अथवा कर्मचारी यांच्याकडून आलेल्या खुलाशाबाबत शहानिशा करून विभागप्रमुख यांनी संबंधितावर नमूद केल्यानुसार दंडाची रक्कम व कारवाई करावी. दंडाची रक्कम व कारवाई करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६९ नुसार संबंधित विभागप्रमुख यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

### विना परवानगी कर्तव्यावर गैरहजर राहिल्यास ५०० रुपये दंड

विना परवानगी कर्तव्यावर गैरहजर राहिल्यास पहिले तीन वेळा ५०० रुपये दंड करण्यात येईल. त्यानंतरही गैरहजर राहिल्यास विना वेतन करण्यात येणार आहे. कार्यालयामध्ये उपस्थिती दर्शवून वरिष्ठांना कोणतेही पूर्व कल्पना न देता अनुपस्थित राहिल्यास संबंधितांना पहिले तीन वेळा ५०० रुपये दंड करण्यात यावा. त्यानंतरही गैरहजर राहिल्यास विना वेतन करण्यात येणार आहे, असेही या आदेशात आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी नमूद केले आहे.

# महाराष्ट्राची पैठणी व्हिक्टोरिया अल्बर्ट संग्रहालयामध्ये प्रदर्शित होणार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ ऑगस्ट -**

महाराष्ट्रातील पारंपारिक वस्त्र व जी सुंदर विणकामाचा एक अविष्कार आहे तसेच ज्याला साड्यांची महाराणी म्हणून ओळखले जाते अशी महाराष्ट्राची पैठणी आता लंडनच्या व्हिक्टोरिया अल्बर्ट संग्रहालयामध्ये प्रदर्शित होणार आहे. सांस्कृतीक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार यांनी केलेली विनंती संग्रहालयाने मान्य केली आहे.



शूर मराठा सरदार रघुजीराजे भोसले यांची ऐतिसाहिक तलवार ताब्यात घेण्यासाठी शेलार हे सध्या लंडन दौऱ्यावर आहेत. मंगळवारी त्यांनी लंडनच्या प्राचीन व्हिक्टोरिया अल्बर्ट संग्रहालयाला भेट देत संग्रहालयाचे संचालक मिस्टर हंट आणि त्यांचे कन्झर्वेटर यांच्यासोबत झालेल्या बैठकीत काही महत्त्वाच्या निर्णय झाले. शेलार यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचं प्रतीक असलेली वाघनखं आपल्याला जरूर तीन वर्षासाठी लोन वर मिळालेली आहेत. पण ती परत करावी लागतील अशा पद्धतीच्या गोष्टी यापुढे होता कामा नयेत म्हणून अशा ज्या काही महत्त्वाच्या गोष्टी विक्टोरिया अल्बर्ट म्युझियममध्ये आहेत, त्या यापुढे जास्त काळासाठी लोनवर मिळण्याबाबत सकारात्मक चर्चा आम्हा दोघांमध्ये झाली. मुंबईत बीकेसी येथे महाराष्ट्र सरकार जे राज्य संग्रहालय उभारणार आहे त्यासाठी सल्लागार तज्ञ म्हणून व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझियम आपल्याला सहकार्य करेल. या सहकार्याचा करार व्हावा या दृष्टीने सांस्कृतिक विभाग काम करीत आहे. व्हिक्टोरिया अल्बर्ट संग्रहालयामध्ये आपली महाराष्ट्रातील पैठणी ही प्रदर्शित केली जावी ही मागणी आम्ही केली ती त्यांनी मान्य केली आणि या पुढच्या काळामध्ये आपल्या पैठणी सोबतच हातमागावरची वस्त्रांचे प्रदर्शनही या संग्रहालयामध्ये होईल या दृष्टीने सकरात्मक बोलणी झाल्याचे त्यांनी सांगितले.

# ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनो 'आता थांबायचं नाही'

## 'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज' अभियानाची करा तयारी

## ७ घटकानुसार १०० गुणांचे मुल्यांकन होणार

## १८७८ ग्रामपंचायतसाठी १५८ कोटींची बक्षीसे

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

ग्रामीण भागातील विकासासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १७ शाश्वत विकास ध्येय व त्याअंतर्गत १६९ लक्ष व उद्दिष्टांची अंमलबजावणी सुरू केली असून ग्रामपंचायतीची कार्यक्षमता वाढवण्यासाठी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांअतर्गत ७ घटकानुसार १०० गुणांचे स्पर्धेत राज्यातील १८७८ ग्रामपचायतींना १५७ कोटी ९५ लाख रूपयांची बक्षीसे दिली जाणार आहेत.या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान असून ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी 'आता थांबायचं नाय' म्हणत सहभाग घेतला तर गावे यशाचे शिखर सहजपणे गाठू शकणार आहेत.

**या ७ घटकाअंतर्गत होणार मूल्यमापन**

१०० गुण मुल्यांकनासाठी असणार आहेत. यामध्ये (१) सुशासनयुक्त प्रशासनासाठी १६ गुण, (२)सक्षम प्रशासनसाठी १० गुण , (३)जलसमृध्द स्वच्छ व हरीत गावसाठी १९ गुण , (४)मनेरेगा व इतर योजनांशी अभिसरणसाठी ६ गुण , (५)गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण अंतर्गत १६ गुण , (६)उपजिवीका विकास व सामाजिक न्याय अंतर्गत २३ गुण , (७)लोकसहभाग श्रमदानातून चळवळ निर्माण करणे, यासाठी ५ गुण , याशिवाय नाविण्यपूर्ण उपक्रमासाठी ५ गुण असून याप्रमाणे १०० गुणांचे मुल्यमापन केले जाणार आहे.



### विभागनिहाय बक्षीसे


मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत पुरस्कारासाठी निवड झालेल्या तालुकास्तरीय ग्रामपंचायतीस- प्रथम १५ लाख, व्दितीय १२ लाख, तृतीय ८लाख, जिल्हस्तरीय- प्रथम ५० लाख, व्दितीय ३० लाख, तृतीय २० लाख, विभागस्तरीय- प्रथम १ कोटी, व्दितीय ८० लाख,तृतीय ६० लाख, राज्यस्तरीय- प्रथम ५ कोटी,व्दितीय ३ कोटी,तृतीय २ कोटी रकमेचा पुरस्कार विजेत्या ग्रामपंचायतींना दिला जाणार आहे. याशिवाय तालुकानिहाय प्रत्येक ग्राम पंचायतींना ५ लाखाचे दोन विषेश पुरस्कार दिले जाणार आहे.

शासकीय योजना गावपातळीवर प्रभावीपणे अंमलात याव्यात यासाठी शासनाच्या ग्रामविकास विभागाने ' मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान ' सुरू केले असून यामध्ये तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय बक्षीसे दिली जाणार आहेत. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ हा स्पर्धेचा कालावधी असून तालुकास्तरावर ११ ते २६ जानेवारी २०२६ दरम्यान मुल्यमापन होणार आहे. जिल्हास्तरीय २८ ते १५ फेब्रुवारी, विभागस्तरीय १७ ते २७ फेब्रुवारी तर राज्यस्तरीय ग्रामपंचायतीचे मुल्यमापन मार्च २०२६ मध्ये होणार आहे.

### अशी असणार तपासणी समिती

यासाठी सनियंत्रण समिती गठीत केली असून राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे सह १५ सदस्य असून राज्यस्तरीय मुल्यमापन समितीचे अध्यक्ष शासनाचे प्रधान सचिव,विभागस्तरीय मुल्यमापन समितीचे अध्यक्ष विभागीय आयुक्त, जिल्हास्तरीय मुल्यमापन समितीचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तर तालुकास्तरीय मुल्यमापन समितीचे अध्यक्ष गटविकास अधिकारी असणार आहेत.

पंचायत समिती व जिल्हा परिषदेला देखील शासन गौरवणार असून पंचायत समिती विभागस्तरीय- प्रथम १ कोटी,व्दितीय ७५ लाख,तृतीय ६० लाख,राज्यस्तरीय- प्रथम २ कोटी,व्दितीय १.५० कोटी, तृतीय १.२५ कोटी,जिल्हा परिषदांना राज्यस्तरीय प्रथम ५ कोटी,द्वितीय ३ कोटी व तृतीय २ कोटी याप्रमाणे १८७८ग्रामपंचायत,२१पंचायत समिती व ३ जिल्हा परिषद यांना एकुण २४५.२० कोटी रक्कम देवून गौरवले जाणार आहे.



शासनाचे 'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान' गावाला विकासात्मक दिशा देणारे आहेच पण ग्राम पंचायतीस बक्षीसाच्या माध्यमातुन माला-माल करणारे आहे. गावातील मतभेद, गट-तट बाजुला ठेवून 'माझ गांव आपला अभिमान' समजून सर्वांनी एकत्रीत काम करुन गांव समृध्द करण्यासाठी 'आता थांबायचं नाही' असा निश्चय केल्यास गावे समृध्द व अर्थपूर्ण होतील.

**- कविता घोडके-पाटील,**
**जिल्हाध्यक्षा, सरपंच परिषद,**

# लादेन-मुनीर एकाच नाण्याच्या दोन बाजू

## लष्करप्रमुखावर विश्वास ठेवू नका ● पेंटॉगॉनच्या माजी अधिकाऱ्याचा सल्ला

### पाकिस्तानला दहशतवादी देश घोषित करावा

◆ **वॉशिंग्टन, १२ ऑगस्ट**

पाकिस्तानला कितीही सवलत दिली, तरी त्याच्या विचारात बदल होणार नाही, दहशतवादाला पाठिंबा देणे आणि हल्ले घडवून आणणे तेथील लष्कराची रणनीती आहे. पाकिस्तान जबाबदार देश असल्याने राहण्याच्या लायकीचा नाही. ओसामा बिन लादेन आणि पाकचे लष्करप्रमुख असिम मुनीर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अमेरिकेने मुनीर यांच्यावर विश्वास ठेवू नये आणि पाकिस्तानला दहतशवादी देश घोषित करावे, असे पेंटॉगॉनचे माजी अधिकारी मायकल रुबिन यांनी म्हटले आहे.





अमेरिकेच्या भूमिवरून भारताला अण्वस्त्राची धमकी देणाऱ्या असिम मुनीर यांचा समाचार घेताना रुबिन एका कार्यक्रमात म्हणाले, असिम मुनीर लष्कराच्या गणवेशातील ओसामा बिन लादेन आहे. त्यांची भाषा लादेनच्या भाषणांची आठवण करून देते. त्यांची टिप्पणी चिथावणी देणारी आणि दहशतवादी नेत्यासारखी आहे. पाकिस्तानला दिलेला प्रमुख गैरनाटो सहयोगी देशाचा दर्जा तत्काळ काढून घ्यावा आणि त्याला दहशतवादाला पुरस्कृत करणाऱ्या देशांच्या यादीत टाकायला हवे. मुनीर यांच्यापासून अमेरिकेने सावध राहायला हवे. मुनीर अणुबॉम्बच्या धमक्या देतात, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अमेरिकेच्या भूमीवर पाकिस्तानी लष्करप्रमुखाकडून दिल्या जाणाऱ्या धमक्या पूर्णपणे अस्वीकारार्ह आहे.

**सेंट्रल कमांडचे सदस्यत्व काढून टाकावे**

अमेरिकेवर हल्ला करणाऱ्या लादेनला पाकिस्तानने सुरक्षा पुरवली होती, हे विसरून चालणार नाही. दहशतवादाला पुरस्कृत करणारा देश म्हणून पाकिस्तानला सूचिबद्ध करायला हवा. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडचे सदस्य राहण्याचा अधिकार पाकिस्तानला राहिलेला नाही. अमेरिकेच्या भूमीवरून अण्वस्त्रांची धमकी देणाऱ्या मुनीर यांना देशाबाहेर काढायला हवे होते, त्यांच्यासोबतची बैठक रद्द लष्करी अधिकाऱ्यांनी रद्द करायला हवी होती असे रुबिन म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### दहशतवादाला करतात आर्थिक मदत

अण्वस्त्रांची धमकी देणाऱ्या मुनीर यांना अमेरिकेत पर्सोना नॉन ग्रेटा म्हणून घोषित करावे आणि त्यांना अमेरिकेचा व्हिसा देऊ नये. पाकिस्तानला सवलत देणे दहशतवादाला पाठिंबा देण्यासारखे आहे. आजच्या घडीला पाकिस्तानात अनेक सक्रिय दशतवादी संघटना आहेत. लष्कर त्यांना आर्थिक मदत करते, हे जगाला माहीत आहे. त्यामुळे अमेरिकेने मुनीर यांना अधिक महत्त्व देणे जगातील शांतता धोक्यात टाकण्यासारखे आहे. ■



स्वातंत्र्य दिनापूर्वी श्रीनगर येथील दल सरोवरापासून मंगळवारी काढण्यात आलेल्या तिरंगा यात्रेत पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या काश्मिरी तरुणी


# ‘बीएलए’ जागतिक दहशतवादी संघटना घोषित

## मुनीर यांच्या अमेरिका भेटीदरम्यान ट्रम्प यांची घोषणा

◆ **वॉशिंग्टन, १२ ऑगस्ट**

पाकिस्तानी लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या अमेरिका भेटीदरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बलुचिस्तान लिबरेशन आर्मी अर्थात् बीएलए आणि माजिद ब्रिगेडला जागतिक दहशतवादी संघटना घोषित केले. पाकिस्तानात दहशतवाद पसरविणे आणि देशाच्या सार्वभौमत्वाला आव्हान देण्याचा आरोप या संघटनेवर करण्यात आला.





अमेरिकेच्या परराष्ट्र व्यवहार सचिव मार्को रुबियो यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पाकिस्तानातील बीएलए आणि माजिद ब्रिगेडला जागतिक दहशतवादी संघटना घोषित केले आहे. २०१९ पासून बीएलएने पाकिस्तानात अनेक मोठ्या हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली आहे. अलीकडेच जाफर एक्सप्रेसचे अपहरण केले, यात शेकडो नागरिक आणि सैनिकांना प्राण गमवावे लागले. या संघटनेच्या नेत्यांना अटक करण्यासाठी अमेरिका पाकिस्तानला मदत करणार आहे. बीएलएने कराची विमानतळ आणि ग्वादर पोर्ट अथॉरिटी कॉम्प्लेक्सजवळील आत्मघाती हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली. बीएलएच्या दहशतवादी हल्ल्यामुळे पाकिस्तानच नव्हे, तर संपूर्ण प्रदेशाच्या सुरक्षा आणि स्थिरता धोक्यात आली. दहशतवादाला होणारा निधी आणि पाठिंबा थांबवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

### मालमत्ता करणार जप्त, आर्थिक मदत थांबणार

बीएलए आणि माजिद ब्रिगेडला जागतिक दहशतवादी संघटनो घोषित केल्याने अमेरिकन सरकार आता अमेरिकेतील त्यांची मालमत्ता जप्त करू शकते. या संघटनेला आर्थिक किंवा थेट पाठिंबा देणे हा गुन्हा ठरेल. अमेरिका इतर देशांशी सहकार्य करून या संघटनेच्या कारवायांना पायबंद घालू शकते आणि बीएलएच्या नेत्यांना पकडण्यासाठी पाकिस्तानला अमेरिकेची मदत मिळणार आहे. अलीकडच्या काळात अमेरिका आणि पाकिस्तानमधील संबंध सौहार्दपूर्ण झाले. याचा परिणाम म्हणून अमेरिकेने बीएलएला दहशतवादी संघटना घोषित केले आहे. ■

### मालवाहू विमानाच्या इंजिनला हवेतच आग

**चेन्नई** : चेन्नई विमानतळावर उतरण्यापूर्वी हवेतच एका मालवाहू विमानाच्या इंजिनला आग लागली. वैमानिकाच्या सतर्कतेमुळे विमान सुरक्षित विमानतळावर उतरले आणि या घटनेत जीवितहानी झालेली नाही. चेन्नई विमानतळ प्रशासनाने सांगितले की, मंगळवारी सकाळी क्वालालंपूर शहरातून येणारे मालवाहू विमान विमानतळावर उतरण्याच्या तयारीत असताना इंजिनला आग लागली. ■

# हमासवर दया दाखवणे लज्जास्पद

## इस्रायलची प्रियांका वढेरांवर टीका

◆ **नवी दिल्ली, १२ ऑगस्ट**

गाझापट्टीत इस्रायलने हमासचा सर्वनाश केला, उपासमारीमुळे शेकडो लोकांचा बळी घेतला असून, हा एक प्रकारचा नरसंहार असल्याचे काँग्रेस नेत्या प्रियांका वढेरा यांनी म्हटले. यावर तीव्र आक्षेप घेत हमासवर दया दाखवण्याचा प्रकार लज्जास्पद असल्याची टीका भारतातील इस्रायलचे राजदूत रुवेन अझर यांनी प्रियांका वढेरा यांच्यावर केली.

अझर यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, इस्रायलवर हल्ला करून नागरिकांचे अपहरण करणारे आणि त्यांना अमानुष यातना देणारे हमासचे दहशतवादी निष्पाप असूच शकत नाही. इस्रायलवर हल्ला करणाऱ्या २५ हजार हमासच्या सदस्यांना आम्ही यमसदनी पाठविले. इस्रायलने गाझामध्ये २० लाख टन अन्न पोहोचवले, तर हमास ते ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्यामुळे उपासमारीचे संकट निर्माण झाले. हमासकडून जारी करण्यात येणाऱ्या चित्रफीत आणि निवेदनावर विश्वास ठेवून इस्रायलविरोधात प्रियांका वढेरा यांनी केलेल्या टिप्पणीचा आम्ही निषेध करतो. हमासवर दया दाखविणे लज्जास्पद आहे.

**प्रियांका यांचे आरोप काय ?**

प्रियांका यांनी ‘एक्स’वरील पोस्टमध्ये म्हटले की, इस्रायल गाझात नरसंहार करीत आहे. त्यांनी १८,४३० मुलांसह ६० हजारांहून अधिक लोकांचा बळी घेतला. उपासमारीने मृत्यूचा धोका वाढला आहे. यावर भारत सरकारचे मौन नरसंहाराला पाठिंबा देण्यासारखे आहे. ‘अल जझीरा’च्या पाच पत्रकारांची क्रूर हत्या हा पॅलेस्टाईनच्या भूमीवर केलेला आणखी घृणास्पद गुन्हा आहे. विशेष असे की, इस्रायली सैन्याने हल्ल्यात ठार झालेले पत्रकार अनस अल-शरीफ यांना हमासचा दहशतवादी घोषित केले होते. ◂(वृत्तसंस्था)

# चीनवरील टॅरिफला ९० दिवसांची स्थगिती

## डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय, १० नोव्हेंबरपासून अंमलबजावणी

◆ **वॉशिंग्टन, १२ ऑगस्ट**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादलेले ११५ टक्के आयात शुल्क अर्थात् टॅरिफला ९० दिवसांची स्थगिती दिली. आता १० नोव्हेंबरपासून चीनवर टॅरिफ लागू होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


टॅरिफसंदर्भात मुदतवाढीचा निर्णय जाहीर करताना ट्रम्प यांनी त्यांच्या समाज माध्यमावर लिहिले की, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि माझे चांगले संबंध आहेत. आम्ही आता पुढील ९० दिवसांसाठी चीनसाठी टॅरिफमधून स्थगिती दिली आहे. यापूर्वी १२ ऑगस्टपासून चीनकडून आयात करण्यात येणाऱ्या वस्तूंवर टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला होता. व्यापारासंदर्भात वाटाघाटीसाठी वेळ मिळावा यासाठी त्यांना ९० दिवसांची मुदत दिली जात आहे. दरम्यान, चीननेदेखील अमेरिकेच्या वस्तूंवरील शुल्काला ९० दिवसांची स्थगिती दिली आहे. ही मुदत आता १० नोव्हेंबरला रात्री १२ वाजेपर्यंत आहे. एप्रिल महिन्यात ट्रम्प यांनी चीनवरील टॅरिफ १४५ टक्के वाढवले होते. त्यानंतर चीनने अमेरिकेच्या वस्तूंवर १२५ टक्के शुल्क वाढवले आणि अमेरिकन उत्पादकांसाठी महत्त्वाच्या असलेल्या दुर्मिळ खनिजांच्या निर्यातीवर निर्बंध घातली. मे महिन्यात झालेल्या ९० दिवसांच्या मूळ करारानुसार, चिनी वस्तूंवरील शुल्क ३० टक्क्यापर्यंत कमी केले, तर चीनने अमेरिकन उत्पादनांवरील शुल्क १० टक्क्यापर्यंत कमी केले होते. ◂(वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मिरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जम्मू जिल्ह्यात अखनूरजवळ जम्मू-पूंछ महामार्गावर दरड कोसळली. यामुळे वाहतूक खोळंबून कित्येकांना अडकून राहावे लागले

## चित्रपट वार्ता

### रजनीकांतचा ‘कुली’ प्रदर्शनाआधीच सुपरहिट



**हैदराबाद** : रजनीकांतने आपण बॉक्स ऑफिसचा ‘थलयवा’ असल्याचे पुन्हा सिद्ध केले आहे. त्याच्या ‘कुली’ या सिनेमाने रिलीज होण्यापूर्वी जगभरात ५० कोटी रुपयांची कमाई केली आहे. या सिनेमाने रिलीजच्या चार दिवस आधीपासूनच ॲडव्हान्स बुकिंगने नवा रेकॉर्ड बनवला आहे. लोकेश कनगराज यांच्या दिग्दर्शनात बनलेला हा सिनेमा सध्या चांगलाच चर्चेत आहे. सिनेमाच्या प्री सेल्स (ॲडव्हान्स बुकिंग) जेव्हा परदेशात सुरू झाले त्यावेळी त्याला प्रचंड मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळालेला दिसून आला. जगभरात बुकिंगचा आकडा ५० कोटी पार केला आहे. केवळ विदेशी बाजारातील कलेक्शन ४१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. हे कलेक्शन कमल हसनच्या ठग लाईफच्या एकूण विदेशी कलेक्शनपेक्षा तुलनेने जास्त आहे. यावरून ‘कुली’च्या एकूणच प्रभावाची कल्पना येत आहे. ■

### मृणाल म्हणते, धनुष फक्त एक चांगला मित्र!



**मुंबई** : गेल्या काही दिवसांपासून दाक्षिणात्य सुपरस्टार धनुष आणि अभिनेत्री मृणाल ठाकूर यांच्यातील अफेअर चर्चेत आहे. धनुष ‘सन ऑफ सरदार-२’ चित्रपटाच्या स्क्रीनिंगमध्येही दिसला होता. बऱ्याच काळाच्या चर्चेनंतर आता अभिनेत्रीने धनुषसोबतच्या तिच्या नात्याबद्दल स्पष्टीकरण दिले आहे. मृणाल ठाकूरने एका मुलाखतीत धनुषबद्दल म्हटले की, धनुष हा फक्त माझा चांगला मित्र आहे. मला माहिती आहे की आम्ही एकत्र असल्याबद्दल अनेक प्रकारच्या बातम्या पसरवल्या जात आहेत. जेव्हा मी त्यांना पाहिले तेव्हा मला ते खूप मजेदार वाटले. ‘सन ऑफ सरदार’च्या कार्यक्रमासाठी त्याला अजय देवगणने आमंत्रण दिले होते. ■

### भारतात बंदी, मात्र जगभरात प्रदर्शित होणार ‘अबीर गुलाल’



**मुंबई** : ‘खूबसूरत’ आणि ‘ऐ दिल है मुश्किल’सारख्या हिंदी चित्रपटांमध्ये काम करणारा पाकिस्तानी अभिनेता फवाद खान ‘अबीर गुलाल’ या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पुनरागमन करणार होता. त्याचा चित्रपट ९ मे रोजी प्रदर्शित होणार होता, परंतु २२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानी कलाकारांवर पूर्ण बंदी घालण्यात आली, ज्यामुळे चित्रपटाला तीव्र विरोध झाला आणि निर्मात्यांना त्याचे प्रदर्शन पुढे ढकलावे लागले. आता दीर्घ वादानंतर, ‘अबीर गुलाल’ हा चित्रपट २९ ऑगस्ट रोजी जगभरात प्रदर्शित होत आहे. मात्र, बंदीमुळे हा चित्रपट भारतात प्रदर्शित होणार नाही. वाद आणि बंदीमुळे, चित्रपटातील मुख्य अभिनेत्री वाणी कपूरने तिच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून चित्रपटाशी संबंधित सर्व सामग्री काढून टाकली आहे. ■

# उरलेल्या अन्नाची घरातच विल्हेवाट लावा

## कुत्र्याच्या चावा घेण्याच्या मुद्यावरून सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला



◆ **नवी दिल्ली, १२ ऑगस्ट**

दिल्ली-एनसीआर रस्त्यांवरील भटक्या कुत्र्यांना कायमचे आश्रयस्थानांमध्ये स्थलांतरित करण्याचा निर्देश दिल्यानंतर एका दिवसानंतर, सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी एक परिपत्रक जारी करीत प्राण्यांच्या चाव्यापासून बचाव करण्यासाठी न्यायालयाच्या आवारात उरलेल्या अन्नाची पूर्णपणे विल्हेवाट लावण्याचा आदेश दिला.

या पत्रकात सर्वोच्च न्यायालयाच्या कॉरिडॉरमध्ये आणि आवारात लिफ्टमध्ये भटक्या कुत्र्यांच्या फिरण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ अधोरेखित झाली आहे.

सर्व उरलेल्या अन्नपदार्थांची केवळ योग्यरीत्या झाकलेल्या कचऱ्याच्या डब्यातच विल्हेवाट लावली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत अन्न उघड्या जागेत किंवा उघड्या कंटेनरमध्ये टाकू नये. प्राण्यांना अन्नाकडे आकर्षित होण्यापासून आणि अन्नासाठी कचराकुंडीत जाण्यापासून रोखण्यासाठी हे उपाय महत्त्वाचे आहेत. यामुळे चाव्याचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो आणि स्वच्छता मानके राखली जातात. या निर्देशाची अंमलबजावणी करण्यात तुमचे सहकार्य सर्वांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे, असे परिपत्रकात म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी निरीक्षण नोंदवले की कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांमुळे ‘अत्यंत गंभीर’ परिस्थिती निर्माण झाली आहे आणि दिल्ली-एनसीआरमधील सर्व भटक्या कुत्र्यांना ‘लवकरात लवकर’ कायमचे स्थलांतरित करण्याचा आदेश दिला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### कुत्रा चावण्याच्या घटनेत ७० टक्के वाढ

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या ‘डिसीज सर्व्हिलन्स प्रोग्रॅम’ या विभागाच्या विश्लेषणानुसार देशभरात कुत्र्यांचा चावाच्या घटनेत तब्बल ७० टक्के वाढ झाली आहे. आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार १५ वर्षाखालील मुलांच्या चाव्याची प्रकरणे देशभरात मोठ्या प्रमाणात नोंदवली जात आहेत. बहुतेक हल्ले हे शाळा किंवा मुले मैदानावर खेळताना झाले आहेत. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अभ्यासानुसार, भटक्या कुत्र्यांमध्ये खाण्याच्या पदार्थांवरून जास्त आक्रमकता निर्माण होते. त्यातूनच ही भटकी कुत्री चावा घेतात, असे स्पष्ट झाले आहे. ■

### राजस्थानातही कुत्र्यांना हटवण्याचा आदेश

सर्वोच्च न्यायालयाच्या दिल्लीतील निर्णयानंतर राजस्थानच्या उच्च न्यायालयानेही स्वतःहून या विषयाची दखल घेत भटक्या कुत्र्यांवर कारवाईचा आदेश दिला. यामुळे आता महाराष्ट्रात विशेषकरून मुंबई, पुण्यासारख्या शहरांत अशाप्रकारचा आदेश कधी जारी होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांत अनेकदा रस्त्यावरून चालत जाणारे लोक, रहिवासी, स्कूटरस्वार जखमी झालेले आहेत. अपघात झालेले आहेत. लहान मुलांचे लचके या भटक्या कुत्र्यांनी तोडलेले आहेत. यामुळे रेबीज वाढत चालला आहे. काही वर्षांपूर्वी एका मुलाला त्याचा बाप मांडीवर घेऊन असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. हा मुलगा कुत्र्यासारखा भुंकत, ओरडत होता. त्या मुलाने बापाच्या मांडीवर प्राण सोडले होते. तक्रारी केल्या तरी पालिका प्रशासन अशा भटक्या कुत्र्यांवर काहीच कारवाई करीत नाही, यामुळे आता न्यायलयेच स्वतः दखल घेऊ लागली आहेत. राजस्थान उच्च न्यायालयाने बातम्यांची दखल घेतल्याने सरकारला न्यायलयीन मित्रांच्या अहवालावर उत्तर देण्यासाठी वेळ देण्यात आली आहे. ■

### श्वानदंशाचा सर्वाधिक फटका उत्तरप्रदेशात

### सहा वर्षांत तब्बल दोन कोटी लोकांचे तोडले लचके

भटक्या कुत्र्यांनी देशाभरात हैदोस घातला आहे. सर्वाधिक लचके उच्चरप्रदेशात तोडण्यात आले. मागील सहा वर्षात तब्बल २ कोटी ७८ लाख लोकांचे लचके तोडले आहेत. महाराष्ट्रात २९ लाख लोकांना कुत्रे चावले. २०२१ ते २३ या तीन वर्षांत कुत्रा चावण्याच्या सर्वाधिक घटना महाराष्ट्रात घडल्या. यापूर्वीच्या तीन वर्षांत (२०१८ ते २०) तामिळनाडू देशात पहिल्या स्थानी होते. उत्तरप्रदेश ५३,४१,५९२, तामिळनाडू ३४,६०,८९९, महाराष्ट्र २९,६८,५९१, गुजरात २०,८०,०८०, प. बंगाल १८,१९,८४५, आंध्रप्रदेश १७,३३,५१५, राजस्थान १५,६८,०६५, कर्नाटक १३,५६,२४२, तेलंगणा १३,२१,२२३, नवी दिल्ली २,४६,०९९, अशी आकडेवारी आहे. ही आकडेवारी अतिशय चिंताजनक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# कुत्र्यांच्या हैदोसाचे गांभीर्य

१९८५ मध्ये एक चित्रपट आला होता. त्याचे नाव होते 'तेरी मेहरबानियां.' नायक होता जॅकी श्रॉफ आणि सहनायक 'ब्राऊनी' उपाख्य मोती. त्यातला मोती हा कुत्रा होता. तो नायकाला कसा साथ देतो आणि खलनायकांशी लढता-लढता शेवटी तोच कसा नायक बनतो, अशा आशयाची कथा त्या चित्रपटात होती. 'हाथी मेरे साथी', 'मैं और मेरा हाथी' असे कितीतरी चित्रपट सांगता येतील, ज्यांत प्राणी हा माणसाचा मित्र किंवा साथीदार असल्याचे दाखविले आहे. प्राण्यांच्या निष्ठेच्या कथा सांगणारी गाणी आहेत. याचे कारण आपल्या भूतदयेच्या परंपरेत दडलेले आहे. आपण नाटक-सिनेमातून माणसांना शत्रू दाखवीत आलो, पण पशूंना आपले शत्रू म्हणून फारसे चित्रित केले नाही. आता मात्र परिस्थिती बदललेली आहे. 'जब कुत्ते की मौत आती हैं तो वो शहर की ओर भागता हैं' असा एक फेमस डायलॉग आहे. परंतु, कुत्रेच मृत्यूचे दूत म्हणून हिंडू लागले आहेत. 'तुझे कुत्ते की मौत मारुंगा' असे वाक्य कित्येक नायकांनी किंवा खलनायकांनी सिनेमात वापरले. पण, सरकारी नियमांचा अडसर असल्यामुळे कुत्र्यांना मारताही येत नाही. कुत्र्यांना मात्र कुणालाही चावण्याची आणि लचके तोडण्याची मुभा आहे. त्यामुळेच दिल्लीतील कुत्र्यांना शहराबाहेर न्या, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाला द्यावा लागला. कुत्र्यांचा, त्यातही भटक्या कुत्र्यांचा प्रश्न केवळ दिल्लीपुरता मर्यादित नाही; तो संपूर्ण भारतात आहे. महाराष्ट्रात गेल्या सहा वर्षांत भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याने तब्बल ३० लाख लोक जखमी झाल्याचे सरकारी आकडेवारी सांगते. म्हणजे दररोज सुमारे १,३०० नागरिक कुत्र्यांच्या हल्ल्यांना बळी ठरतात. ही फक्त एका राज्याची स्थिती असेल तर संपूर्ण भारतात ही समस्या किती विकोपाला गेली असेल, याची कल्पना करा. रस्त्यावरून चालताना पाच-सहा कुत्र्यांचे टोळके आक्रमक नजरेने पाहत आहे आणि संधी मिळाली की तुटून पडत आहे, हा अनुभव गावागावांत सामान्य झाला आहे. दिवसाढवळ्या मुलांवर, वृद्धांवर, अगदी सकाळी फिरायला जाणाऱ्यांवर कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, जगभरात रेबीजमुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी तब्बल ३६ टक्के मृत्यू फक्त भारतात होतात. दरवर्षी १८ ते २० हजार लोकांचा जीव रेबीजमुळे जातो आणि त्यात बहुसंख्य बळी छोट्या मुलांचे असतात. रेबीज एकदा झाल्यावर त्यावर कोणताही इलाज नाही; त्यामुळे कुत्र्यांच्या चाव्याचा संबंध थेट मृत्यूच्या शक्यतेशी आहे. भारतात भटक्या कुत्र्यांची समस्या नवीन नाही. २००१ मध्ये एक नियमावली जारी करण्यात आली. त्यानुसार भटक्या कुत्र्यांना मारण्यास बंदी घालण्यात आली. त्याऐवजी त्यांची नसबंदी व लसीकरण करणे एवढेच यंत्रणांच्या हातात उरले. या धोरणामागे प्राणी हक्कांचा सन्मान, अनावश्यक हिंसा टाळणे आणि दीर्घकाळात कुत्र्यांची संख्या नैसर्गिकरीत्या कमी करणे हा उद्देश होता हे खरे आणि योग्यही. परंतु, आता लक्षात येते आहे ते असे की, कुत्र्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढते आहे आणि कुणाच्याही अंगावर कुत्री धावून जात असल्याच्या घटनांमध्येही सतत वाढ होते आहे. कुत्र्यांच्या जगण्याच्या अधिकाराला मान्यता देणाऱ्या नियमाच्या अंमलबजावणीत सरकार आणि त्याच्या सर्व यंत्रणा सपशेल अपयशी ठरल्या. महानगर पालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडे आवश्यक निधी, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधा नाहीत. परिणामी, कुत्र्यांच्या नसबंदीच्या मोहिमा अपुऱ्या राहतात. एकेका शहरात सर्व कुत्र्यांची नसबंदी करतो म्हटले तर सध्याची गती आणि संसाधने यांचा विचार केला तर हे काम पूर्ण करायला किती तरी वर्षे लागतील आणि तोपर्यंत कुत्र्यांची संख्या दुप्पट-तिप्पट किंवा त्याहून अधिक झालेली असेल. त्यामुळे यावर तातडीने व वेगवान उपाय जरुरी आहेत.

भटक्या कुत्र्यांचा विषय चर्चेत आला की समाज दोन गटांत विभागला जातो, हेही नेहमीचे. एक गट प्राणिप्रेमींचा. त्यांचा असा ठाम विश्वास असतो की, कुत्रे हिंस्र होत नाहीत; माणसांचे वर्तन, उपासमार किंवा छळ यामुळेच ते आक्रमक होतात. नसबंदी, लसीकरण आणि नागरिकांना योग्य वर्तनाचे प्रशिक्षण हाच यावरील उपाय असे त्यांचे मत. कुत्र्यांना मारणे अमानुष आहे आणि मानवी सभ्यता अशा कृत्याला मान्यता देऊ नये, असा त्यांचा युक्तिवाद. दुसरा गट मानवी सुरक्षिततेला प्राधान्य देणाऱ्यांचा. त्यांच्या मते, एखाद्या प्राण्याचा जीव वाचवण्यासाठी मानवी जीव धोक्यात घालणे ही दांभिकता. रेबीजसारख्या रोगाची भयावहता, लहान मुलांच्या मृत्यूंचे आकडे आणि वृद्धांवर झालेले घातक हल्ले पाहता, कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर उपाय आवश्यक आहेत. खरे तर भारताने यातला भावातिरेक टाळून जगात काय चालले आहे, हेही पाहिले पाहिजे. सिंगापूरमध्ये भटक्या कुत्र्यांना लगेच पकडून त्यांची आरोग्य तपासणी केली जाते. दत्तक देता येत नसेल किंवा योग्य ती सोय करता येत नसेल तर त्यांना शांतपणे मृत्यू दिला जातो. परिणामी, रस्त्यावर भटक्या कुत्र्यांची संख्या नगण्य आहे. ऑस्ट्रेलियात भटक्या कुत्र्यांवर कठोर कारवाई केली जाते. युरोपातील बहुतेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर नसबंदी आणि दत्तक कार्यक्रम चालविले जातात. त्याचबरोबर पाळीव प्राण्यांच्या नोंदणीसाठी आणि जबाबदारीसाठी नागरिकांना जबाबदार धरणारे कठोर कायदे आहेत. भारतात नियम आहेत, पण यातले काहीही होत नाही. लोकसंख्या प्रचंड आहे. शहरांतील कचरा व्यवस्थापन अत्यंत निकृष्ट आहे आणि पाळीव प्राणी सोडून देण्याची सवय अजूनही रूढ आहे. भटक्या कुत्र्यांचा परिणाम केवळ माणसांवरच नव्हे तर पर्यावरणावरही होतो. कुत्रे जंगली भागात जाऊन हरिण, काळवीट, नीलगाय यांसारख्या प्राण्यांवर हल्ले करतात. ते पक्ष्यांची अंडी, संकटग्रस्त कासवांची पिलेदेखील खातात. त्यामुळे स्थानिक जैवविविधतेला धोका निर्माण होतो. ऑस्ट्रेलियात कुत्र्यांबद्दल जी ठोस कारवाई होते, त्यामागे जैवविविधता हे महत्त्वाचे कारण आहे. भारतात कायदा साथीला नाही आणि कुत्र्यांना आवर घालण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पैसाही नाही. नसबंदी आणि लसीकरण मोहिमा मोठ्या प्रमाणावर राबविण्यासाठी लागणारा निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळत नाही. त्यांना फक्त नियमानुसार कुत्रे सांभाळण्याची (किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याची) जबाबदारी तेवढी मिळालेली आहे. कुत्र्यांना सुरक्षितपणे पकडणे, लसीकरण करणे यासाठी प्रशिक्षित पथकांची पुरेशी व्यवस्था नाही. पाळीव कुत्र्यांची नोंदणी बंधनकारक असूनही बहुतेक मालक नोंदणी करीत नाहीत. उघड्यावर टाकलेला कचरा कुत्र्यांसाठी खाद्याच्या स्वरूपात सहज उपलब्ध असल्याने त्यांचे जीवनमान सुधारते आणि त्यांची संख्या वाढते. या प्रश्नावर भावनिकतेच्या पलीकडे जाऊन व्यावहारिक उपाय केले पाहिजेत. त्यातील पहिला उपाय आहे जलद नसबंदी व लसीकरण आणि दुसरा म्हणजे कुत्र्यांसाठी शहरांच्या बाहेर शेल्टर्स. हे काम केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीत न ठेवता, राज्य आणि केंद्र सरकारने थेट निधी देऊन त्यात खाजगी पशुवैद्यक संस्थांनाही सामील करून घेतले पाहिजे. पाळीव कुत्रा सोडून दिल्यास किंवा नोंदणी न केल्यास मोठा दंड आणि शिक्षा करण्याच्या तरतुदी गरजेच्या आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे- भटक्या कुत्र्यांचा प्रश्न हाताळताना मानवी सुरक्षितता हा प्राधान्याचा विषय असायला हवा. एखादा लहान मुलगा शाळेत जाताना कुत्र्याच्या हल्ल्याचा बळी ठरतो आणि एखादी वृद्ध व्यक्ती रक्तबंबाळ होऊन रुग्णालयात दाखल होते, या घटनांकडे पाहताना भूतदया बाजूला ठेवावीच लागेल. प्राण्यांशी निर्दयतेने वागणे सभ्य समाजाला शोभत नाही, हे खरेच. पण, कुठे तरी समतोल हवाच. या प्रश्नावर जेव्हा केव्हा चर्चा होते तेव्हा केंद्र, राज्य आणि स्थानिक संस्था एकमेकांवर जबाबदारी ढकलतात. एखादी भयंकर घटना घडली की, 'हा विषय आमच्या अधिकारात नाही' असे सांगून मोकळे होण्याची भारतात पद्धतच आहे. तेच कुत्र्यांच्या बाबतीत सुरू आहे. त्यामुळे आधीच असंख्य समस्यांनी त्रस्त असलेल्या भारतीयांना गल्लीबोळात, रस्त्यावर कुत्र्यांचा हैदोस किती काळ सहन करावा लागेल आणि किती जणांचे जीव गेल्यावर सरकारी यंत्रणांना जाग येईल, हे सध्या तरी कुणालाही सांगता येणार नाही.

---

## प्रासंगिक

**- संकेत कुलकर्णी (लंडन)**

# '११ ऑगस्ट २०२५' इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा दिवस

नागपूरच्या रघोजी भोसले (प्रथम) ह्यांची राज्यशासनाने लिलावात विकत घेतलेली तलवार भारतात पुन्हा नेण्यासाठी आपल्याकडे सुपूर्द करण्यात आली. ही घटना विशेष कारण आपल्या देशाच्या इतिहासांत हे पहिल्यांदाच घडत होतं. २९ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्यशासनाने विशेष व्यवस्था करून लंडनमधे एका जाहीर लिलावात भाग घेतला आणि एका शासनमान्य मध्यस्थाद्वारे ही तलवार विकत घेतली. ती तलवार ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री ड आशिष शेलारसाहेब आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय खात्याचे उपसंचालक हेमंत दळवी लंडनला आले होते. ह्या तलवारीचा भारतात पाठवायच्या आधी स्थिती परीक्षण अहवाल बनवला जाणार होता आणि त्यासाठी मला पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय ह्यांच्याकडून आमंत्रण होतं. ही तलवार ठेवली होती लंडनच्या उत्तरेला 'वारे' नावाच्या गावातल्या एका वेअरहाऊसमधे. शुक्रवारी मी आणि दळवीसाहेब जाऊन तलवारीची पाहणी करून आणि मोजमापं वगैरे घेऊन आलो होतो. संदर्भ म्हणून काही फोटोजही काढले होते. सोमवारी सकाळी शेलारसाहेब व भारतीय दूतावासाचे काही अधिकारी ह्यांच्यासोबत शेवटची पुन्हा एकदा पाहणी करून ती तलवार ब्रिटीश कस्टम्सकडे सोपवायची होती. शेलारसाहेबांसोबत सकाळी ९ वाजता आम्ही त्या तलवार ठेवलेल्या वारेला पोहोचलो. बाहेर गर्दी होती पण आतमध्ये जास्त लोकांना प्रवेश नव्हता. हातमोजे घालून आम्ही पुन्हा एकदा मापं व फोटो घेतले. शेलारसाहेबांनी छोटंसं भाषण केलं व संबंधित लोकांचे आभार मानले. साहेबांना आम्ही तलवारीचे बारकावे समजावून सांगितले. आणि सकाळी १० वाजता ती तलवार पॅक होऊन ब्रिटीश कस्टम्सच्या ताब्यात आम्ही सुपूर्द केली.



वारेहून लंडनला परत येताना शेलारसाहेबांनी सावरकरांच्या इंडीया हाऊस बद्दल चौकशी केली. इंडीया हाऊस व डॉ. आंबेडकरांचं लंडनमधलं घर १५ मिनीटांच्या अंतरावर आहे असं समजताच आम्ही साहेबांनी तिथे जायची इच्छा दर्शवली. सावरकरांच्या 'इंडीया हाऊस'चं दर्शन घेतलं. श्यामजी कृष्ण वर्मा व त्यांच्या कार्याचा इतिहास साहेबांना सांगितला. इंडीया हाऊसची वैशिष्ट्यं व १९०५ सालच्या उद्घाटनाच्या वेळचे प्रसंग त्यांना सांगितले. तिथून पुढे आम्ही डॉ आंबेडकरांच्या घराकडे जायला निघालो. जेव्हा २०१५ मधे बाबासाहेबांचं लंडनमधलं घर लिलावात निघालं होतं तेव्हा शेलारसाहेब पहिले आमदार होते ज्यांनी केंद्रात अरूण जेटलींना हे घर घेता येईल का ह्याबद्दल चौकशी करायला सुचवलं होतं. शेलारसाहेबांनी तो संपूर्ण घटनाक्रम आम्हाला सांगितला. बाबासाहेबांसमोर नतमस्तक होऊन आम्ही लंडनमधल्या भारतीय दूतावासाकडे निघालो. तिथे भारतीय उच्चायुक्त विक्रम दोराईस्वामींसोबत पुढची मिटींग होती. दोराईस्वामींसोबत भरपूर गप्पा झाल्या. लंडनमधे विक्रीला येत असलेल्या पुरातन भारतीय वस्तूंबाबत काय करता येईल ह्याबद्दल चर्चा झाली. इथल्या संग्रहालयांत किंवा प्रायव्हेट कलेक्शनमधे असणाऱ्या गोष्टींबाबत काय करता येईल हाही विषय झाला. (बाकी गोपनीय विषय झाले - यथावकाश त्यांवर काम होईलच - त्यांबद्दल इथे लिहून शकत नाही!) त्यांचा निरोप घेऊन पुढे निघालो. यापुढची मिटींग व्हिक्टोरिया ल्बर्ट वस्तुसंग्रहालयाच्या संचालकांसोबत होती. एकूणच संग्रहालये हा माझा आवडता विषय. आपल्याकडे असलेली महाराजांची वाघनखं त्यांनीच सध्या कराराने दिलेली आहेत. त्यांच्यासोबत नव्या संग्रहालयांबद्दल चर्चा झाली. मुंबईत नवं संग्रहालय विकसित करायला ते काही करू शकतात का व त्यान्वये अजून काही 'आपल्या' गोष्टी भारतात येऊ शकतात का ह्याबद्दल बोलणी झाली. (बाकी गोपनीय विषय झाले - यथावकाश त्यांवर काम होईलच - त्यांबद्दल इथे लिहून शकत नाही!) त्यांनी आम्हाला त्यांच्या टेक्स्टाईल कन्झर्वेशन विभागाची एक छोटी सहल घडवली. आणि आम्ही बाहेर पडलो.

सकाळी ६ वाजता सुरु झालेला दिवस. सतत प्रवास व मिटींग्जची धावपळ रात्री १०-१०:३० वाजता संपली. दिवसभर शेलारसाहेब व दळवीसाहेब ज्या झपाट्याने कामं करत होते ते पाहून खरंच आश्चर्य वाटलं. त्यांच्या चेहऱ्यावर थकव्याचा लवलेशही नव्हता. ब्रेकफास्टपासून रात्रीच्या जेवणापर्यंत आम्ही एकत्र होतो. अवांतर गप्पाही भरपूर झाल्या. मुंबईत आल्यावर भेटीचे वायदे झाले आणि मग मी घरी जायला निघालो. परतीच्या ट्रेनमध्ये विचार करत होतो - काळ कसा बदलला आहे पहा. जगभरात पूर्वीपासून हे असे भारतातून चोरून नेलेल्या गोष्टींचे लिलाव होत आलेले आहेत. तेव्हा आपण देश किंवा सरकार म्हणून निषेध व्यक्त करण्यापलीकडे काहीच फारसं केलं नाही. पण पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील नवीन भारत मात्र आता ह्या अश्या भारतातूनच चोरून नेलेल्या वस्तूंची जगाकडे आशाळभूतपणे भीक मागत नाहीये, तर सरळ त्या बाजारभावाने विकत घेऊन सन्मानाने भारतात पुन्हा परत घेऊन जातोय - हा किती मोठा सकारात्मक बदल आहे. अश्या अनेक गोष्टी भविष्यात भारतात पुन्हा आणल्या जातीलही पण त्याची सुरुवात ह्या तलवारीपासून झाली. आणि तोच हा कालचा दिवस. ह्या अश्या ऐतिहासिक दिवसाचा प्रत्यक्ष साक्षीदार व्हायचं भाग्य मला लाभलं ह्यातच मी कृतकृत्य!

---

## वेध

**गिरीश शेरेकर**

# अमरावती पानमसाला, गुटख्याची राजधानी

अमरावती शहर व जिल्हा विदर्भाची सांस्कृतिक राजधानी म्हणून जसा ओळखला जातो तसाच तो आता प्रतिबंधित पानमसाला व गुटख्याची राजधानी म्हणून नावारूपास आला आहे. अलिकडच्या काळातल्या काही घटना तर अमरावतीच्या सांस्कृतिकपणाला कलंकित करणाऱ्या ठरल्या आहेत. सांस्कृतिकपणाचे हे बिरुद नामशेष होण्याची भीती मनात असतानाच गुटख्याच्या चक्रव्यूहात अमरावती अडकली आहे. गुटखा, तंबाखू मिश्रित पानमसाल्याचे सेवन मानवी शरीरातल्या प्रत्येक अवयवावर प्रचंड दुष्परिणाम करते. वैद्यकीय क्षेत्रातल्या वेगवेगळ्या संशोधनातून ते समोर आले आहे. विशेषत्वाने युवा पिढीवर त्याचे गंभीर परिणाम होत असल्याने राज्य सरकारने २०१२ पासून गुटखा व पानमसाला विक्री, उत्पादन, वितरण, साठवणुकीवर बंदी घातली आहे. ही बंदी कितपत यशस्वी झाली, याचे उत्तर राज्य शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने आजपर्यंत दिले नाही. राज्यकर्त्यांनी सुद्धा छाती ठोकून ते कधी सांगितले नाही. राज्यातल्या कोणत्याही शहरात व गावात फेरफटका मारल्यावर लक्षात येते की, बंदी फक्त कागदावरच आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकलच्या संशोधनातून वेळोवेळी गुटखा व तंबाखूचे गंभीर वास्तव समोर आल्यानंतरही शासन व प्रशासन जनजागृतीच्या पलीकडे काहीच करायला तयार नाही, याचे प्रचंड आश्चर्य आहे.



राज्यातले एकही असे गाव नाही की, जेथे गुटखा व पानमसाला मिळत नाही. बंदी घालण्यापूर्वी जी स्थिती अमरावतीसह पश्चिम विदर्भातल्या अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये होती तीच आजही कायम आहे. बंदीनंतर काही वर्ष नागपूरसह पूर्व विदर्भातल्या जिल्ह्यांमध्ये गुटखा फारसा मिळत नव्हता. कारण, याच काळात नागपुरी खर्र्याने अनेकांच्या मनात राज्य केले होते. आता नागपुरी खर्र्याची भीषणता पदोपदी समोर येत असल्याने गुटखा व पानमसाला नागपूरसह वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये सहज मिळायला लागला आहे. परिणाम मात्र दोघांचेही सारखेच आहेत. हीच स्थिती राज्यातल्या अन्य जिल्ह्यांमध्ये आहे. अमरावती तर गुटखा व पानमसाला तस्करीचे, वाहतुकीचे, निर्मितीचे मुख्य केंद्रच झाले आहे. विशेष म्हणजे गुटख्याचे अनेक नवे ब्रॅण्ड अमरावतीत तयार झाले असून विदर्भासह राज्याच्या कानाकोपऱ्यात बिनबोभाटपणे पोहोचत आहे. अमरावती मुख्य केंद्र होण्यासाठी लगतचे मध्य प्रदेश कारणीभूत ठरले आहे. तिथे बंदी नसल्याने धारणी, बहिरम, पांढुर्णा या तीन व अकोला मार्गाने मोठ्या प्रमाणात गुटखा व पानमसाला अमरावतीत येतो. अचलपूर, वरुड, धारणी, चांदूर बाजार, अंजनगाव, मोर्शीत तो साठविला जातो. येथून तो अन्य जिल्ह्यांमध्ये वितरित होतो. सांगायचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मध्य प्रदेशसह देशातल्या अन्य भागातला ब्रॅण्ड म्हणून ओळखला जाणारा गुटखा व पानमसाला अमरावती जिल्ह्यातच हुबेहूब बनावट तयार केला जातो. अत्यंत निकृष्ट साहित्य त्यात वापरले जाते. मूळ कंपनीच्या गुटखा व पानमसाल्याच्या पुड्यांसोबत सरमिसळ करून तो विकला जातो. विदर्भासह राज्यातल्या अन्य भागांत जो काही गुटखा व पानमसाला विकला जातो, त्यातला बहुतांश माल अमरावतीत तयार झालेला असतो, असे सांगितले जाते. कोट्यवधीची ही उलाढाल असल्याने अमरावतीला राजधानीचा दर्जा मिळाला आहे.

उपरोक्त माहिती काही गुपित नाही. ते उघड सत्य असून संबंधित विभागाचे अधिकारी व पोलिसांना त्याची कल्पना आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाकडे मनुष्यबळाची कमतरता आहे आणि पोलिसांना त्यांचा दैनंदिन व्याप आहे. याचाच फायदा गुटखा किंग घेत आहेत. अर्थात त्यांना छुप्या पद्धतीने राजकीय पाठबळ असल्याने त्यांचे फावत आहे. दिवसागणिक अतिशय गंभीर होत चालेली गुटख्याची समस्या अनेकांच्या जीवावर उठली आहे. गेल्या पाच वर्षात मुख कर्करोगाचे सर्वाधिक रुग्ण अमरावतीसह पश्चिम विदर्भातल्या अन्य जिल्ह्यांमध्ये आढळले आहेत. नागपूर विभागासह राज्यातल्या अन्य भागांतही प्रमाण वाढले आहे. अनेकांचे मृत्यू झाले असून अन्य आजार देखील बळावत आहेत. तरी सुद्धा या समस्येकडे संवेदनशीलपणे पाहण्याची कोणाची तयारी नाही. आता तर गुटख्या इतकेच एमडी व इतर अमली पदार्थ प्रत्येक शहरात सहजतेने मिळायला लागले आहे. कागदावरच्या गुटखाबंदीने महसूल बुडण्याचा संताप नाही पण, दुर्धर आजाराचे परिणाम भोगावे लागत असल्याचे दुःख आहे. तस्करी असल्याने गुन्हेगारी वाढत आहे. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच या प्रकरणात लक्ष घालण्याची गरज आहे. इतर विषयांप्रमाणे या विषयातली साखळी त्यांनी समजून घेतली तरच मुळापर्यंत जाता येईल. चांगल्या परिणामाची प्रतीक्षा करूया!

९४२०७२१२२५

---

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# श्रीगीता : ज्ञानकर्मसंन्यास योग

श्रीमद्भगवद्गीतेचा चौथा अध्याय ज्ञानकर्मसंन्यास योग नावाने परिचित आहे. आत्मस्वरूपाच्या सत्य ज्ञानाने साधक सर्वकर्मसंन्यास स्थिती प्राप्त करू शकतो, असे भगवान अर्जुनास सांगतात.

**'ज्ञानेन कर्मसंन्यासः इति ज्ञानकर्मसंन्यासः ।'**

ज्ञान प्राप्त झाले तर मनुष्य कर्मामध्ये निवृत्त होत जातो म्हणून हा ज्ञानकर्मसंन्यासयोग आहे.

तिसऱ्या अध्यायात कर्ममीमांसा सांगताना जिज्ञासूंनी निष्काम वृत्तीने कर्म केले पाहिजे; याला नैष्कर्म अवस्था म्हटले आहे. चौथ्या अध्यायात भगवान ज्ञानाचा महिमा सांगताना सद्गुरूंच्या मार्गदर्शनात कर्मत्याग न करताही निष्काम कर्म करणे याला निवृत्ती अवस्था म्हणतात. एका अर्थाने हा कर्मसंन्यास आहे. वैराग्य भावाने केलेले कर्म अर्थात कर्मात गुंतून न राहता कर्म करणे. त्याच वेळी ज्ञानासाठीचे अनुष्ठान सुरू ठेवायचे. सद्गुरूंच्या अनुग्रहाने ज्ञानग्रहण सुरू असताना ज्ञानप्राप्ती होईपर्यंत कर्मत्याग न करता निष्काम कर्मयोगाचे अनुष्ठानही सिद्ध करावे, असे भगवंताचे तात्पर्य आहे. ज्ञानप्राप्ती झाली तर आपल्याला आपल्या 'स्व'ची जाणीव होते. त्यामुळे कर्मात संन्यस्त वृत्ती येते म्हणून हा ज्ञानकर्मसंन्यासयोग आहे. या अध्यायात भगवंताने निर्माण केलेल्या सनातन धर्माविषयी वैशिष्ट्ये सांगितली आहेत. सनातन धर्म मनुष्यनिर्मित नसून तो ईश्वरनिर्मित आहे. सनातन ज्ञान हे गुरुशिष्य परंपरेने आले असून श्रीगुरुकृपेनेच यथार्थ ज्ञान प्राप्त होते. गुरुशिष्य परंपरा सांगताना भगवंत चौथ्या अध्यायाचा प्रारंभ करतात.

**'इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।**
**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ।'**

मी हा योग कल्पारंभी विवस्वानाला म्हणजे भगवान सूर्यनारायणाला सांगितला. विवस्वान सूर्यनारायणाने हा योग आपला पुत्र मनूला आणि मनूने आपला पुत्र इक्ष्वाकूला सांगितला. या परंपरेने प्राप्त योग राजर्षींनी जाणला होता. परंतु कालांतराने हा योग लुप्त झाला. अर्जुना! तोच योग मी तुला सांगतो आहे. कारण तू माझा सखा आहे. म्हणून हा अत्युत्तम आणि अत्यंत गुह्य असा योग मी तुला सांगतोय. ज्ञानाची गुरुशिष्य परंपरा स्वतः भगवंतांनी विशद केली. हे ऐकल्यावर अर्जुन त्या ठिकाणी भगवंताजवळ शंका विचारतात की, सूर्याचा जन्म तर कितीतरी आधी झालेला आणि तुम्ही तर आता जन्माला आले. मग हा योग कल्पारंभी तुम्हीच सांगितला असे मी कसे मानू? भगवंत म्हणतात-

**'बहूनि मे व्यतीतानि जन्मानी तव चार्जून ।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥'**

हे अर्जुना, माझे आणि तुझेही अनंत जन्म होऊन गेले आहेत. फक्त तुला ते आठवत नाहीत, पण मला सर्वांची जाणीव आहे. खरं तर, मी जन्मरहित, अविनाशी आणि जीवसृष्टीचा अधिपती आहे. तरीदेखील मी प्रकृतीच्या स्वाधीन होऊन योगमायेने जन्म घेतो. जन्म का घेतो, याचेही उत्तर भगवंत देतात.

**'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥'**

हे धनंजया, ज्यावेळी धर्माला ग्लानी येते, अधर्म बोकाळू लागतो त्यावेळी मी अवतीर्ण होतो. साधूंचे रक्षण, दुष्टांचे निर्दालन करून धर्म संस्थापनेसाठी मी जन्म घेतो. भूतलावरील जो जीव माझ्या अवताराचे महत्त्व जाणतो तो उच्चकोटीचा साधक बनतो. तो पुन्हा जन्माला येत नाही तर माझ्याच स्वरूपाला प्राप्त होतो.

**'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।**
**मम वत् र्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥'**

जे भक्त ज्या इच्छेने मला भजतात मी त्यांना तसेच फळ देतो, हे सांगून भगवान सांगतात की, सर्व जीव सर्वार्थाने माझ्याच मार्गाचे अनुसरण करतात.

**'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं, गुणकर्मविभागशः ।'**

हा सुप्रसिद्ध श्लोक भगवंतांनी अर्जुनाला सांगितला की चातुर्वर्ण्य मीच निर्माण केला, पण तो गुण आणि कर्माच्या आधारे. हा अत्यंत महत्त्वाचा श्लोक असून चातुर्वण्य हा कायम चिकटलेला नसून तो गुण आणि कर्मावर अवलंबून असे.

**'शूद्रोपि गुणसंपनौ विद्वान ब्राह्मणो भवेत ।'**

एखादा जातीने शूद्र असेल, पण तो गुणसंपन्न असेल तर तो ब्राह्मण आहे. एखादा जातीने ब्राह्मण आहे, पण तो पापकर्म करीत असेल तर तो शूद्र ठरतो. म्हणून भगवंतांनी त्या काळात वर्ण व्यवस्था जन्मजातीवर नसून ती गुण आणि कर्मावर असल्याचे स्पष्ट केले. पुढे भगवान हेही स्पष्ट करतात की, 'मी वर्णव्यवस्थेचा निर्माता असूनही मी अकर्ता आहे.'

'न मे कर्मफले स्पृहा ।' 'तरुण भारत'चे हे ब्रीदवाक्य याच अध्यायातील आहे. मला कर्मफळात स्पृहा नसल्यामुळे कर्म मला चिकटत नाहीत; तद्वतच तुमचेही होऊ शकते. फक्त त्यासाठी माझे ज्ञान महत्त्वाचे आहे. भगवंतांनी कर्म, अकर्म आणि विकर्म विचारही त्याला समजावून सांगितला. जो कर्मामध्ये अकर्म आणि अकर्मामध्ये कर्म पाहतो तो खरा ज्ञानी; तोच खरा योगी आणि तोच खरा कर्म संन्यासी.

थोडक्यात ज्ञानकर्मसंन्यास सांगताना आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले तर आपण सर्वकर्मसंन्यास अवस्थेपर्यंत पोहोचू शकतो. या अध्यायात ज्ञानाचे महिमान सांगताना ज्ञानप्राप्तीत सद्गुरूंचे महत्त्वही सांगितले आहे. शेवटच्या श्लोकात भगवान सांगतात की, हे अर्जुना! अज्ञानाने निर्माण झालेल्या अंतःकरणातील आत्म्याविषयीच्या संशयाला ज्ञानखड्गाने छेदून समत्वबुद्धीरूप योगामध्ये स्थिर हो आणि युद्धासाठी तयार हो!

भगवान युद्धासाठी प्रवृत्त करताहेत म्हणजे कर्तव्यभाव सांगताहेत. कर्मयोगाच्या मतीने केलेले कर्तव्य हे आत्मोन्नतीचा मार्ग प्रशस्त करते. हाच कर्म संन्यास आहे.

सद्गुरूंच्या कृपेने स्व-स्वरूपाचे ज्ञान झाले आणि कोण मी? याची जाणीव झाली म्हणजे ज्ञान प्राप्ती झाली. असे ज्ञान एकदा मिळाले की आपले नित्यकर्म हे कर्म राहत नाहीत. तो फक्त सोपस्कार बनतो. म्हणजे त्या कर्मात आपण कर्म संन्यस्त बनून कर्म करतो. 'ज्ञानेन कर्म संन्यासः !' म्हणून हा ज्ञानकर्मसंन्यासयोग!

९८२२२६२७३५

---

## मोकाट जनावरांचा रहदारीला अडथळा

एक जुलै रोजी नांदेड मधील पुंडलिक वाडीत घडलेली घटना.एका शाळकरी मुलाला बैलाने शिंगावर घेतले. त्याला खाली पाडून जखमी केले.अशा प्रकारच्या घटना सोलापुरातही घडू शकतात,कारण सोलापूर- विजापूर रोडसह इतरही ठिकाणी मोकाट जनावरांमुळे वाहतुकीचा कोंडमारा होत आहे. येथे मोकाट जनावरांच्या वाढत्या वर्दळीमुळे, पादचारी,वाहनधारक,विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिक हैराण झाले आहेत.रस्ता ओलांडताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागते. दुपारपर्यंत गाई- गुरांची संख्या थोडी कमी असते; पण जस- जशी रात्र होईल तस- तशी ही संख्या वाढतच जाते. गायींचा उपयोग दुधापुरता करुन घेऊन त्या गाईंना मोकाट सोडले जाते की काय? असा संशय व्यक्त केला जातोय. तरी अशा प्रकारे गैरप्रकार करणाऱ्यांचाही शोध घ्यावा आणि




या मोकाट गायी-गुरांचा बंदोबस्त करुन, रहदारीला रस्ते खुले करुन द्यावेत,अशी मागणी या परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

**- अरुण बा. धुमाळ, सोलापूर**
**९८९०९०२९२३**

## वाचक पत्रे

### नागपूर-पुणे वंदे भारत

आजपर्यंत नागपूर येथून पुण्याकडे जाणाऱ्या गरीबरथ, नागपूर-पुणे, आझाद हिंद एक्सप्रेस आणि अजून एक-दोन अशा रेल्वे उपलब्ध होत्या. या गाड्या कायम विद्यार्थी, नोकरदार वर्ग किंवा मध्यमवयीन पालकांनी भरलेल्या असतात. कारण बऱ्याच जणांची मुले-मुली या ना त्या कारणाने पुण्यात आहेत. हीच नड लक्षात घेता विदर्भातील जनतेसाठी वंदे भारत ट्रेन नुकतीच सुरू झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांनी अद्ययावत, सर्व सुविधांनी युक्त संपूर्ण वातानुकूलिन अशी ट्रेन अवघ्या १२ तासात आता पुण्याला पोहोचते. पंतप्रधानांनी हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. मुख्य थांब्यांवर ही ट्रेन थांबणार आहे. जसे वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, जळगाव आणि दौंड इत्यादी थांबे आहेत. मुख्य म्हणजे विदर्भातून शेगाव येथे नियमित जाणारे अनेक भाविक आहेत. त्यांच्यासाठी ही ट्रेन लाभदायक आहे. यामुळे इतर गाड्यांची गर्दी थोडी होईल. फक्त यात गैरफायदा असा आहे की,



तिकिटाचे दर जास्त पडतात आणि नागपूर-पुणे-नागपूर या दोन्ही वेळी प्रवासाची वेळ संपूर्ण दिवसभराची असल्यामुळे विद्यार्थ्यांचे अथवा नोकरदारांचे दोन दिवस अतिरिक्त वाया जातील. त्यामुळे या वेळांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तरीदेखील छोट्या प्रवासासाठी किंवा प्रवासाची मजा लुटण्यासाठी एक छान अनुभव कधी घ्यायला काहीच हरकत नाही. ही ट्रेन सुरू केल्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### नौदलाची ताकद वाढणार

भारतीय नौदलाच्या ताफ्यात उदयगिरी (एफ ३५) आणि हिमगिरी (एफ ३४) या दोन युद्धनौका एकाच वेळी समाविष्ट होणार असल्याने भारतीय नौदलाची ताकद कैकपटीने वाढणार आहे. भारत-पाकिस्तानमधील तणावाच्या पृष्ठभूमीवर या युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात समाविष्ट होत असल्याने पाकिस्तानचे धाबे दणाणले आहे. या युद्धनौका डिझेल किंवा गॅस प्रपोल्शन प्लांटद्वारे चालवल्या जाऊ शकतात. यात सुपरसॉनिक क्षेपणास्त्रे, मध्यम श्रेणीची हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे, ७६ मिमी एमआर तोफा, ३० मिमी आणि १२.७ मिमी क्लोज इन वेपन सिस्टिम आणि अँटी सबमरीन पाण्याखालील शस्त्र प्रणालींचे संयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही नौका भारतीय बनावटीच्या आहेत तसेच त्या भारतातच बांधण्यात आल्या आहेत. मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत उपक्रम संरक्षण क्षेत्रात यशस्वी होत असल्याचेच हे निदर्शक आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# स्वेरी पॉलिटेक्निकमध्ये 'एआय व डेटा सायन्स' वरील प्रशिक्षणाचे उद्घाटन

## 'एमएसबीटीई'तर्फे आठवडाभर चालणार हा उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ ऑगस्ट-**

येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) मधील इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व कॉम्प्युटर इंजिनिअरिंग या विभागांच्या वतीने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तर्फे आयोजिलेल्या 'इमर्जिंग ट्रेंड्स इन एआय अँड डाटा सायन्सः हँड्स ऑन एक्सप्रेन्स वूईथ इंडस्ट्री ५.०' या विषयावर एक आठवड्याचा फॅकल्टी डेव्हलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम (एफडीटीपी) सुरू झाला असून त्याचे उदघाटन करण्यात आले.

एमएसबीटीई अर्थात महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तर्फे आयोजिलेला हा उपक्रम १६ ऑगस्ट २०२५ पर्यंत चालणार आहे. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांमधील २७ प्राध्यापकांनी सहभाग घेतला आहे. यासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रोअझ्युर सॉफ्टवेअर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडचे प्रकल्प व्यवस्थापक (प्रोजेक्ट मॅनेजर) बापूजी अरकस हे लाभले होते. दीपप्रज्वलनानंतर इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे विभागप्रमुख प्रा.अमेय भातलवंडे व कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा. प्रशांत भंडारे यांनी स्वागत करून आठवडाभर चालणाऱ्या या प्रशिक्षणाचे स्वरूप स्पष्ट करून 'या प्रशिक्षणातून नवनवीन गोष्टी शिकून त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी करावा' असे आवाहन केले. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महाविद्यालयात विद्यार्थ्यांना नवनवीन गोष्टी शिकवण्यासाठी कोणत्या पद्धतींचा अवलंब करता येईल याबाबत माहिती दिली. तर स्वेरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ यांनी 'डेटा सायन्स' म्हणजे मोठ्या प्रमाणातील डेटामधून उपयुक्त माहिती, नमुने आणि निर्णय घेण्यासाठी लागणारा आधार मिळवण्याचे विज्ञान आहे. यामुळे कार्यक्षमता वाढते, चुका कमी होतात आणि निर्णय क्षमतेचा वेग वाढतो.' असे सांगून या प्रशिक्षण कार्यक्रमातून मिळणारे ज्ञान विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कसे उपयुक्त ठरेल, याबाबतही त्यांनी विचार मांडले. प्रमुख अतिथी बापूजी अरकस यांनी 'ए आय' आणि 'डाटा सायन्स' हे सध्या सर्वच क्षेत्रात वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान असून कमी वेळेत अधिक काम पूर्ण करण्याची क्षमता, मानवी त्रुटी टाळून अचूक निकाल देण्याची क्षमता, श्रम व खर्चात बचत, तसेच आरोग्य, विज्ञान, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात संशोधनाला गती मिळवून देणारे हे तंत्रज्ञान आहे.' असे सांगून 'ए आय' आणि 'डाटा सायन्स' याबाबत सविस्तर माहिती दिली. एकूणच या 'ए आय' आणि 'डाटा सायन्स' विषयावरील एक आठवड्याच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम (एफडीटीपी) ला प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा. पांडुरंग वलटे, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा.श्रीधर कुलकर्णी हे उपस्थित होते. प्रा. ऐश्वर्या सावंत यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रशिक्षणाच्या समन्वयिका प्रा. रेश्मा मलगोंडे यांनी मानले.

# सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स राबविणार हर दुकान तिरंगा अभियान : राजू राठी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१२ ऑगस्ट-**

''हर घर तिरंगा'' अभियान महाराष्ट्रात राबविण्याचा राज्यशासनाने निर्णय घेतला असून त्या आवाहनानुसार हर घर तिरंगा आणि हर दुकान तिरंगा अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष राजू राठी यांनी दिली.

सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अॅण्ड् अॅग्रीकल्चर सुध्दा या ''हर घर तिरंगा'' अभियानात सर्व संघटना, व्यावसायिक, कारखानदार, उद्योजक , नागरिक सहभागी होणार आहेत.त्याप्रमाणे सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने सर्वांना १३ ते १५ ऑगस्ट. २०२५ ''हर घर तिरंगा'' व हर दुकान तिरंगा हा उपक्रम राबवावा, असे आवाहन अध्यक्ष राजू राठी व सचिव धवल शहा, कोअर कमिटी, सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ व संलग्न संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



## स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभक्ती समूह गान स्पर्धा

**सोलापूर : शिवस्मारक मंडळाच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीवर समूह गान स्पर्धेचे आयोजन शिवस्मारक सभागृहात मंगळवारी करण्यात आले होते. त्याप्रसंगी टिपलेले छायाचित्र.**

# नावात बदल

**माझे जुने नाव मनोजकुमार नानासाहेब निकम असे होते ते आता बदलून मनोज नानासाहेब निकम असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर प्रतिज्ञा पत्र क्र. ४३६०/२०२५ दिनांक- १२/०८/२०२५**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २२/२०२५
नि.नं. ७

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**श्री. मुबारक मैनोद्दिन पठाण - अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही - सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदारांने अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात अर्जदारची आजी मयत मालनबी मौला पठाण यांचे दि. ०२/०२/२००६ रोजी मौजे कुरनूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर मयत झाले असून, मालनबी मौला पठाण हीस कोणतेही अपत्ये नसून, त्यांच्या पश्चात कायदेशीर वारसदार या नात्याने अर्जदार यांचे नांवे मिळण्याकामी या मे. कोर्टाकडे वारसा दाखला प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा नेमलेल्या तारखेस दिनांक २५/०८/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केले दिनांक : १५/०७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सह. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**

# श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय :- ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर. ४१३००२.
मार्केट यार्ड शाखा :- डी-६ सिध्देश्वर मार्केट यार्ड, सोलापूर. ४१३००६

## जाहीर टेंडर पद्धतीने तारण मालाची विक्रीची नोटीस

### जशी आहे तशी या तत्वावर मालाची विक्री

श्री महावीर अर्बन को-ऑप. बँक लि., मार्केट यार्ड शाखा सोलापूर येथे खालीलप्रमाणे शेंगा माल तारण आहे व तो माल 'आहे त्या ठिकाणी आणि आहे त्या अवस्थेत' टेंडर पद्धतीने विक्री करण्याचे ठरले आहे. सदर माल विविध वेअर हाऊसमध्ये असून त्याचे नमुना (Sample) मार्केट यार्ड शाखा, सोलापूर येथे पहावयास उपलब्ध आहे.

| मालाचे नाव | पोती/नग |
|---|---|
| घुंगरू शेंगा | १३४४ |
| गुजरात बोल्ड शेंगा | ८६९ |

टीप :- सदरील माल श्री महावीर अर्बन को-ऑप. बँक.लि., सोलापूर यांसी तारण आहे. सदरील मालाची योग्य किंमत आणि वेअरहाऊसचे भाडे हे माल घेणाऱ्याने भरणे या पद्धतीने व टेंडर पद्धतीने विक्री करण्याचे ठरले

**नियम व अटी :-**

१) टेंडरमध्ये भाग घेणाऱ्याने लिलावापुर्वी डिपॉझिट रु ५,०००/- बँकेच्या मार्केट यार्ड शाखा येथे जमा करावी.
२) लिलावात भाग घेण्यास इच्छुकांनी आपले टेंडर बँकेच्या डी-६ मार्केट यार्ड शाखा, सोलापूर येथे दि. १८/०८/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत बंद पाकीट मध्ये जमा करावे.
३) सदरील टेंडर दि. १९/०८/२०२५ रोजी सायंकाळी. ४.०० वाजता मार्केट यार्ड शाखा, येथे सर्वांसमोर ओपन करण्यात येईल.
४) टेंडर मंजूर करणे, स्थगित करणे अथवा कोणतेही कारण न देता रद्द करणे इ.चे सर्व अधिकार बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांचेकडे राखीव आहेत.
५) टेंडरच्या अटी आणि शर्तीसाठी व अधिक माहितीसाठी बँकेच्या मार्केट यार्ड शाखा सोलापूर येथे संपर्क साधावा फोन नं.०२१७-२३७३०१०, मोबाईल. नं. ९०२८८६८०००,
६) सदरील माल श्री साई कोल्ड स्टोअरेज, सोलापूर येथे असून रि.नं. २७८६, २७८९, २७९०, २७९१, २७९२, २७९३, २७९४, २७९५, २७९६, २७९७, २७८७, २७८८, २७९८, २७९९, २७८५. व इको फ्रेश कोल्ड स्टोअरेज येथे असून रि.नं. १२५, १२६, १२७, १२८, १३०, १३१, १३२, १३३, १३४, १३५ आहे.

**स्थळ :- सोलापूर**
**दि. ११/०८/२०२५**

**सही/-**
**कृष्णहरी मैसूर**
**अधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को. ऑप. बँक.लि., सोलापूर**

# सद्गुरु ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

## स्थावर मालमत्तेचा तिसरा फेर जाहीर लिलाव

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ मधील तरतुदीनुसार सद्गुरु ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर या पतसंस्थेच्या ज्या थाकबाकीदार कर्जदार व जमीनदार यांचे विरुद्ध कलम १०१ अनुसार वसुली दाखले प्राप्त झालेले होते. अशा कर्जदार / जमीनदारांच्या जप्त केलेल्या खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव संस्थेच्या कार्यालयात शुक्रवार, दिनांक १९/०९/२०२५ रोजी दुपारी १ वाजता ठेवण्यात आलेला आहे. तरी इच्छुक व्यक्ती व संस्था यांनी सदर लिलावात भाग घ्यावा.

| अ. नं. | कर्जदार / जमीनदार यांचे नाव व पत्ता | जप्त केलेल्या स्थावर मालमतेचे वर्णन गाव, गट नं. व क्षेत्र (हे. आर.) | कर्जदाराकडील येणे बाकी (मुद्दल, व्याज व इतर) | राखीव किमत |
|---|---|---|---|---|
| १ | **श्री. राजेश विलास माने,** रा. पेनूर - कर्जदार | पेनूर ता. मोहोळ येथील गट नं. १०१२/१ क्षेत्र ०.७५.०० हे.आर. | ११,२८,४९९/- | १५,८७,०००/- |
| २ | **श्री. सुधीर हनुमंत चवरे,** रा. पेनूर - जामीनदार | पेनूर ता. मोहोळ येथील गट नं. ४३५/४/अ क्षेत्र १.२६.०० हे.आर. | ११,२८,४९९/- | २३,१७,०००/- |
| ३ | **श्री. विजय लक्ष्मण माने,** रा. पेनूर - जामीनदार | पेनूर ता. मोहोळ येथील गट नं. ८५८/१ पैकी क्षेत्र ०.४३.०० हे. आर. विजय माने यांचे हिश्याची | ११,२८,४९९/- | २७,८१,०००/- |
| ४ | **श्रीमती. शहीदा करीम नाईकवाडी,** रा. मोहोळ - कर्जदार | मोहोळ ता. मोहोळ येथील गट नं.९१६ व ९१७/९० क्षेत्र १.०० हे. आर. चौ.मी. | १२,८३,८१०/- | १,८०,०००/- |
| ५ | **श्रीमती. शहनाज सुलेमान मुलाणी,** रा. मोहोळ - जामीनदार | मोहोळ ता. मोहोळ येथील गट नं.९३९/९/ब/३ क्षेत्र ०.०१.०० हे. आर. चौ.मी. | १२,८३,८१०/- | १,९०,०००/- |
| ६ | **श्री. राजाराम नाना रसाळ,** रा. मोहोळ - कर्जदार | घाटणे ता. मोहोळ येथील गट नं. ९६/३/क क्षेत्र ०.४८.०० हे. आर. | २२,२३,७७९/- | ३,४०,०००/- |
| ७ | **श्री. सुधीर ज्ञानदेव गायकवाड,** रा. मोहोळ - जामीनदार | मोहोळ ता. मोहोळ येथीलगट नं. २८८/२ क्षेत्र १.२४ व पो.ख. ०.१६ एकूण १.४०.०० हे. आर. | २२,२३,७७९/- | ४०,३२,०००/- |
| ८ | **श्री. दत्तात्रय मनोहर व्होळगुंडे,** रा. औंढी - कर्जदार | औंढी ता. मोहोळ येथील गट नं. २०९/३ मधील क्षेत्र ०.३९.०० हे. आर. | ३,६४,१४५/- | ६,९०,०००/- |
| ९ | **श्री. सुरेश केराप्पा व्होळगुंडे,** रा. औंढी - जामीनदार | औंढी ता. मोहोळ येथील गट नं. २०९/१/क क्षेत्र ०.५०.०० हे. आर. | १,७१,७३४/- | ७,६०,०००/- |
| १० | **श्री. जयसिंग विजयसिंग देशमुख** रा. भांबेवाडी - कर्जदार | मोहोळ ता. मोहोळ येथील गट नं. १२५४/३/अ/६५ क्षेत्र ०.०१.६८ हे. आर. | १४,०४,९८१/- | ३,२०,०००/- |
| ११ | **श्री. जयसिंग विजयसिंग देशमुख** रा. भांबेवाडी - कर्जदार | मोहोळ ता. मोहोळ येथील गट नं. १२५४/३/अ/६६ क्षेत्र ०.०१.६८ हे. आर. | १४,०४,९८१/- | ३,२०,०००/- |
| १२ | **श्री. सयाजी जगदेवराव देशमुख** रा. मोहोळ - जामीनदार | मोहोळ ता. मोहोळ येथील गट नं. १२५४/३/अ/५३ क्षेत्र ०.०१.५४ हे. आर. | १४,०४,९८१/- | २,९०,०००/- |

**टीप :-** लिलावाच्या अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

**ठिकाण - मोहोळ**
**दिनांक : १२/०८/२०२५**

**सही/-**
**(नितीन रोहिदास जाधव)**
**विशेष वसूली व विक्री अधिकारी**
**सद्गुरु ग्रामीण बिगरशेतीसहकारी पतसंस्था म. मोहोळ**

देशभक्ती१-१३

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे वाखरी, ता. पंढरपूर येथील आसपासचे लोकांना याद्वारा खाली सही करणार भारत अनंतराव बहिरट, ॲडव्होकेट, अभिमान, रा. ३०८१, काळा मारूती, पंढरपूर यांजमार्फत कळविण्यात येते की :- डि. सोलापूर सब डि. व ता. पंढरपूर पैकी मौजे वाखरी येथील शेतजमीन गट नं. ४७५/२, क्षेत्र हे. ३.६२ आर, पो.ख. हे. ०.०८ आर पैकी हे. ०.८२ आर, पो.ख. हे. ०.०८ आर ही मिळकत हल्ली सुनिल किसनराव गायकवाड यांचे नावे गावचे हक्कपत्रकी ७/१२ स नोंदविले आहे. सदर मिळकत उपरोक्त सुनिल गायकवाड यांनी आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून त्याप्रमाणे व्यवहार निश्चित केला आहे. इसारा दाखल रक्कम आमचे अशिलाने सुनिल गायकवाड यांना दिली आहे. सदरील मिळकत निष्कर्जी, निजोखमी व स्वतंत्र व निष्कलंक मालकीची असल्याची खात्री उपरोक्त सुनिल गायकवाड यांनी आमचे अशिलास दिली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी उपरोक्त मिळकतीबाबत कोणाची गहाण, दान, लिज, पोटगी बोजा वा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत त्यांनी अस्सल कागदपत्रानिशी आमचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन आमची खात्री पटवून द्यावी. तसे न घडल्यास कोणाची हरकत नाही असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

म्हणून ही जाहिर नोटीस प्रसिध्द केली तारीख १२/०८/२०२५

**सही/-**
**भारत अनंतराव बहिरट**
**एम.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट**
**'अभिमान', ३०८१, काळा मारूती, पंढरपूर**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे बोरगांव (झाडी), ता. बार्शी येथील व त्या परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - बोरगांव (झाडी) येथील जमीन गट नं. ८९ पैकी उत्तरेकडील बाजूची जमीन क्षेत्र ०२ हे. १७ आर + पो.ख. ०० हे ०४ आर असे एकूण क्षेत्र ०२ हे २१ आर आकार ०२ रू. ९७ पैसे, ही जमीन, आमचे अशिलांचे वडिलार्जित मालकीची व कब्जेवहीवाटीची आहे. सदर जमीनीबाबत लता रामेश्वर उर्फ रामभाऊ अडसूळ, रा. म्हाडा कॉलनी, धाराशिव व त्यांच्या बहिणी कमल शहाजी जामदाडे आणि उमा गोविंद शिंदे वगैरे लोकांनी बार्शी येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. ७५/२०१६ चा वाटपाचा दावा दाखल केला होता. सदर दाव्यातील हुकूमनाम्याचे दरखास्तीनुसार वर नमुद केलेले क्षेत्र वरील लोकांना वाटपाने आलेले आहेत.

सदर गटातच दक्षिणेकडील बाजूचे ०१ हे ३५ आर आकार ०१ रु. ८५ पैसे ही जमीन, आमचे अशिलांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची आहे. वरील लोकांनी सदरचे क्षेत्र विक्रीस काढले असल्याचे आमचे अशिलास नुकतेच समजले आहे. सदरची जमीन आमचे अशिलांचे वडिलार्जीत मालकीची असल्याने, तसेच त्या गटात आमचे अशिलाचे वरीलप्रमाणे क्षेत्र असल्याने, प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार, सदरची जमीन खरेदी घेण्याचा, आमचे अशिलास अग्रगण्य, प्रथमप्राधान्य, हक्क (Right of Pre-emption) होता व आहे. सदरची जमीन आमचे अशिल हे चालू बाजार भावाप्रमाणे खरेदी घेणेस तयार होते व आहेत. परंतु वरील लोक मुद्दाम व खोडसाळपणाने आमचे अशिलास विक्री न करता, त्रयस्थ व्यक्तींना विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याबाबत अलहिदा आमचे अशिल कायदेशीर कारवाई करत आहेत.

तेव्हा सदर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद केलेली जमीन ही आमचे अशिलाचे वडिलार्जीत मालकीची व कब्जे वहिवाटीची असल्याने, तसेच सदर गटात आमचे अशिलाचे मालकीचे क्षेत्र असल्याने, सदर जमीन खरेदी करण्याचा आमचे अशिलास अग्रगण्य हक्क असल्याने, सदर जमीनीवावत, वरील लोकांशी, कोणीही गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, बक्षिसपत्र, खरेदी, वहीवाटीचे हक्क, फेडपत्र, तसेच अन्य हस्तांतरणाचे स्वरूपाचे व्यवहार आणि कर्ज बोजाचे स्वरूपाचे व्यवहार करू नयेत. केलेस ते बेकायदेशीर व रद्दबातल होतील, तसेच आमचे आशिलाचे हक्क हिश्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तशा स्वरूपाचे व्यवहार करणाऱ्यावर आमचे आशिल कायदेशीर कारवाई करतील मग खर्चाची व परिणामाची संपूर्ण जबाबदारी त्यांचेवरच राहील. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली. कळावे ता. ११/०८/२०२५

**सही**
**ॲड. श्री. गुंड एस.एम. (लाडोळेकर)**
**ॲड. श्री. गुंड ए. एस. (लाडोळेकर)**
**ॲडव्होकेटस बार्शी 'सदानंद' ७३०/२/३७**
**विकास लक्ष्मण लंगोटे वगैरे**
**रा. झरेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**तर्फे ॲडव्होकेट्स**


# PRECISION CAMSHAFTS LIMITED

PRECISION

Regd. Office : D5, M.I.D.C. Chincholi, Solapur, MH, 413255
CIN: L24231PN1992PLC067126

**Extract of unaudited consolidated financial results for the quarter ended June 30, 2025 [(Regulation 47(1)(b) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015]**

(Rs. in lakhs),except Earnings Per Share)

| Sr. No. | Particulars | Consolidated | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended June 30, 2025 (Unaudited) | Year ended March 31, 2025 (Audited) | Quarter ended March 31, 2025 (Refer Note 4) |
| 1. | **Revenue From Operations** | **19,500.33** | **86,536.22** | **19,042.76** |
| 2. | Profit Before Exceptional Item & Tax | 2,721.76 | 4,820.76 | 1,936.24 |
| 3. | Profit Before Tax | 2,721.76 | 8,313.37 | 5,305.64 |
| 4. | Profit for the Period / Year | 1,881.63 | 5,410.51 | 4,044.30 |
| 5. | Total Comprehensive Income (after tax) for the period | 1,394.48 | 5,365.06 | 3,908.46 |
| 6. | Paid up Equity Share Capital (Equity Share of 10/- each) | 9,498.58 | 9,498.58 | 9,498.58 |
| 7. | Earnings per share (of Rs.10/- each) | - | - | - |
| | Basic : | 1.98 | 5.70 | 4.26 |
| | Diluted : | 1.98 | 5.70 | 4.26 |

**Notes:**

1. The above financial results for the quarter ended June 30, 2025 have been subjected to limited review by the statutory auditors of the Group and reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Holding Company at the meeting held on August 11, 2025.
2. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the Securities and Exchange Board of India ('SEBI') (Listing Obligations and Disclosure Requirements ('LODR')) Regulations, 2015. The full format of the audited Standalone & Consolidated Financial Results of the Company are available on the Stock Exchange's website **(www.bseindia.com and www.nseindia.com)** and also on the Company's website - **www.pclindia.in**.
3. These Financial Results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ("Ind AS") prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules issued there under and in terms of Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular no. CIR/CFD/FAC/62/2016 dated 5th July, 2016.
4. Figures for the quarter ended March 31, 2025 are the balancing figures between the audited figures in respect of full year and published year to date figures of nine moths ended December 31, 2024 which were subject to limited review by the statutory auditors of the Group.
5. Key Standalone Financial information

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Standalone | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended June 30, 2025 (Unaudited) | Year ended March 31, 2025 (Audited) | Quarter ended March 31, 2025 (Refer Note 4) |
| 1 . | **Revenue From Operations** | **13,670.07** | **61,200.09** | **13,717.15** |
| | Profit Before Exceptional Item and Tax | 3,395.62 | 7,159.45 | 1,455.13 |
| | Profit Before Tax | 3,395.62 | 3,651.45 | (2,176.08) |
| | Profit for the period/Year | 2,562.84 | 735.73 | (3,436.74) |
| 2. | Total Comprehensive Income (after tax) for the period | 2,566.08 | 758.65 | (3,434.53) |

**Place : Solapur**
**Date : August 11, 2025**

**For and on behalf of the Board of Directors**

**Sd/-**
**Ravindra R. Joshi**
**Whole-time Director & CFO**

# राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक भारतीय खेळांमध्ये परिवर्तन घडवणार

### व्यापक चर्चेनंतर राज्यसभेत मंजूर

**◆ नवी दिल्ली, १२ ऑगस्ट**

संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेले राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक हे भारतातील क्रीडा प्रशासनात सुधारणा आणि मानकीकरण करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे. लोकसभेने मंजुरी दिल्यानंतर एका दिवसानंतर, मंगळवारी राज्यसभेने व्यापक चर्चेनंतर हे विधेयक मंजूर केले.

वृत्तसंस्थेने त्याच्या प्रमुख वैशिष्ट्यांचा आढावा सादर केला. जे देशातील खेळाडू आणि प्रशासक दोघांसाठीही क्रीडा प्रशासन आणि तक्रार निवारण प्रणालीच्या अनेक पैलूंमध्ये मोठा बदल घडवून आणण्याचे आश्वासन देते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल. त्यानंतर सरकार राजपत्रात अधिसूचना जारी करेल.



**वय आणि कार्यकाळ मर्यादा**

या विधेयकात क्रीडा महासंघांमध्ये अध्यक्ष, सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष पदांसाठी सलग तीन टर्मचा कालावधी एकूण १२ वर्षांपर्यंत मर्यादित केला आहे. वयोमर्यादा ७० वर्षे निश्चित करण्यात आली आहे जी आंतरराष्ट्रीय सनद आणि संबंधित खेळाच्या नियमांद्वारे परवानगी मिळाल्यास नामांकनाच्या वेळी ७५ वर्षांपर्यंत वाढवता येते.

कोणत्याही क्रीडा संघटनेच्या कार्यकारी समितीच्या सदस्यांची कमाल संख्या १५ पर्यंत मर्यादित करण्यात आली आहे जेणेकरून महासंघावर जास्त आर्थिक भार पडू नये. कार्यकारी समितीला किमान दोन उत्कृष्ट खेळाडू आणि चार महिलांचा समावेश करणे बंधनकारक असेल.

**राष्ट्रीय क्रीडा मंडळ**

या विधेयकाचे सर्वांत चर्चेचे वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्रीय क्रीडा मंडळ ज्याला सर्व राष्ट्रीय क्रीडा महासंघांना मान्यता देण्याचे किंवा निलंबित करण्याचे आणि खेळाडूंच्या कल्याणासाठी आंतरराष्ट्रीय महासंघांशी 'सहयोग ' करण्याचे सर्वोच्च अधिकार असतील.

या समितीच्या इतर सदस्यांमध्ये भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक, राष्ट्रीय क्रीडा संस्थेचे अध्यक्ष, महासचिव किंवा कोषाध्यक्ष राहिलेले दोन क्रीडा प्रशासक आणि द्रोणाचार्य, खेलरत्न किंवा अर्जुन पुरस्कार जिंकणारा एक प्रख्यात खेळाडू यांचा समावेश असेल. केवळ मान्यताप्राप्त क्रीडा संघटनाच केंद्र सरकारकडून अनुदान किंवा इतर कोणतीही आर्थिक मदत मिळविण्यास पात्र असतील. ◂(वृत्तसंस्था)

**राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण**

क्रीडा मंत्रालयाच्या मते, निवडीपासून निवडणुकीपर्यंत देशातील विविध न्यायालयांमध्ये ३५० हून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत, ज्यामुळे खेळाडू आणि राष्ट्रीय क्रीडा महासंघांच्या प्रगतीत मोठ्या प्रमाणात अडथळा येत आहे. राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणाच्या स्थापनेमुळे ही समस्या कायमची संपेल कारण त्याला दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील. त्यात एक अध्यक्ष आणि इतर दोन सदस्य असतील. न्यायाधिकरणाचे प्रमुख सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा निवृत्त न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असतील. त्यांच्या नियुक्त्या केंद्र सरकारच्या हाती असतील ज्या समितीच्या शिफारशींवर आधारित असतील. या समितीचे अध्यक्ष सरन्यायाधीश किंवा भारताचे मुख्य न्यायाधीश यांनी शिफारस केलेले सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश असतील आणि त्यात क्रीडा सचिव आणि कायदा आणि न्याय मंत्रालयाचे सचिव यांचा समावेश असेल.



## विद्यार्थ्यांनी शारीरिक तंदुरुस्तीकडे लक्ष द्यावे : ॲड. श्रीनिवास क्यातम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

शरीरामधील प्रत्येक अवयव महत्त्वाचा आहे. त्याची योग्य हालचाल होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मैदानामध्ये जाऊन कसरतीचे खेळ खेळावेत आणि त्याचबरोबर नियमित व्यायाम करावा. यामुळे हॉस्पिटलमध्ये जाण्याची वेळ येत नाही. आरोग्याकडे दुर्लक्ष करु नये. असे प्रतिपादन पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम यांनी केले.

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयांमध्ये संस्थेचे अध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम यांच्या हस्ते ओपन जिमचे उद्घाटन झाले. त्याप्रसंगी ते विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर डॉ. तुकाराम शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर राजे, डॉ. कविता मुरूमकर, सौ. सविता मल्लाडे व डॉ. नवले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शंकर राजे यांनी केले.

### महत्त्वाचे

**वर्ल्ड स्कूल व्हॉलिबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा उद्या**

**सोलापूर** : शांग्लूओ चीन या ठिकाणी ४ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत आंतरराष्ट्रीय शालेय खेळ महासंघाद्वारे १५ वर्षांखालील मुले व मुलींची वर्ल्ड स्कूल व्हॉलिबॉल चॅम्पियनशिप होणार आहे. या स्पर्धेत भारतीय संघ सहभाग घेणार आहे. भारतीय संघाची निवड करण्यासाठी भारतीय शालेय खेळ महासंघाने राष्ट्रीय निवड चाचणीचे आयोजन २५ ते ३० ऑगस्ट या कालावधीत श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी पुणे या ठिकाणी केले आहे. राष्ट्रीय निवड चाचणीकरिता राज्याचे खेळाडू सहभागी होणार असून राज्य निवड चाचणीकरिता थेट विभागीय निवड चाचणीचे आयोजन १४ ऑगस्ट रोजी केले आहे. जिल्ह्यातील इच्छुकांनी महाराष्ट्र मंडळाचे चंद्रशेखर आगाशे महाविद्यालय पुणे येथे सकाळी ८.०० वाजेपर्यंत उपस्थित राहावे. निवड चाचणीकरिता जाताना संबंधित खेळाडूंनी वयाचा पुरावा जन्म दाखला, आधारकार्ड, शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेला जनरल रजिस्टरची छायांकित प्रत घेऊन जावे. या निवड चाचणीकरिता सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे. ■

### म्हैसूर ओपनमध्ये संधूची आघाडी

**मैसूर** : मंगळवारी येथे झालेल्या पीजीटीआय म्हैसूर ओपनच्या पहिल्या दिवशी चंदीगडचा गोल्फर युवराज संधूने ९ अंडर ६१ चा उत्कृष्ट फटका मारत आघाडी घेतली. बांगलादेशचा जमाल हुसेन आठ अंडर ६२ चा फटका मारून दुसऱ्या स्थानावर राहिला. ओम प्रकाश चौहान आणि हनी बैसोया यांनी सात अंडर ६३ चा फटका मारून तिसऱ्या स्थानावर बरोबरी साधली. स्थानिक खेळाडू ध्रुव बोपण्णा आणि बंगळुरूचा एस. चिक्करंगप्पा यांनी सहा अंडर ६४ चा फटका मारून पाचव्या स्थानावर बरोबरी साधली.

### डोपिंग प्रकरणी गगनदीपला तीन वर्षांची शिक्षा

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय खेळांचा डिस्कस थ्रो सुवर्णपदक विजेता गगनदीप सिंगसह अनेक खेळाडूंवर राष्ट्रीय डोपिंग विरोधी एजन्सीने तीन वर्षांची बंदी घातली आहे. डोपिंगचा आरोप झाल्यानंतर २० दिवसांच्या आत या खेळाडूंनी त्यांचा गुन्हा मान्य केला होता, ज्यामुळे त्यांची शिक्षा चार वर्षांवरून तीन वर्षांपर्यंत कमी करण्यात आली. लष्कराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गगनदीपने १२ फेब्रुवारी रोजी उत्तराखंड राष्ट्रीय खेळांमध्ये पुरुषांच्या डिस्कस थ्रोमध्ये ५५.०१ मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर तो डोपिंग चाचणीत पॉझिटिव्ह आढळला. त्याच्या नमुन्यात टेस्टोस्टेरॉन मेटाबोलाइट्सची पुष्टी झाल्यानंतर त्याला तात्पुरते निलंबित करण्यात आले. गगनदीपचे राष्ट्रीय खेळांचे पदक परत घेतले जाईल. हरयाणाचा खेळाडू निर्भय सिंगचे रौप्य पदक आता सुवर्णपदकात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. या तरतुदीचा फायदा इतर दोन ट्रॅक अँड फील्ड खेळाडू सचिन कुमार आणि जैनू कुमार यांनाही मिळाला आहे. या अंतर्गत, त्यांचा बंदीचा कालावधी एक वर्षाने कमी करण्यात आला आहे. सचिनची तीन वर्षांची बंदी १० फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे, तर जैनूची ही तारीख २० फेब्रुवारी आहे.

### कोठारी आणि अरोरा उपांत्यपूर्व फेरीत

**चेंगडू (चीन)** : भारताचे सौरव कोठारी आणि शिवम अरोरा यांनी येथे झालेल्या जागतिक क्रीडा स्पर्धेत त्यांच्या संबंधित क्यू स्पोर्ट्स स्पर्धांमध्ये उपांत्यपूर्व फेरी गाठली. कोठारीने त्याच्या शेवटच्या लीग सामन्यात ग्रेट ब्रिटनच्या डॅरिल हिलकडून १-२ असा पराभव पत्करला. पराभव असूनही, तीन खेळाडूंमधील बरोबरीनंतर भारतीय खेळाडूने चांगल्या फ्रेम सरासरीने (+१) अंतिम आठ टप्प्यात प्रवेश केला. पहिल्या दिवशी कोठारीकडून ०-२ असा पराभव पत्करलेल्या जॅक कॉस्करने त्याच्याच देशाच्या हिलचा २-० असा पराभव करून भारतीय खेळाडूच्या मागे दुसरे स्थान पटकावले. कॉस्करने (०) चांगल्या फ्रेम सरासरीच्या आधारे हिल (-१) ला हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. हेबॉलमध्ये राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक विजेता अरोरा, प्री-क्वार्टर फायनलमध्ये केविन झरेकानीचा ५-१ असा पराभव केला. तथापि, स्पर्धेत सहभागी असलेल्या इतर दोन भारतीय खेळाडू, कमल चावला आणि नताशा चेतन, गट टप्प्याच्या पुढे प्रगती करू शकल्या नाहीत. ■

### सेंट लुईस रॅपिड आणि ब्लिट्झ स्पर्धा

**◆ सेंट लुईस (यूएसए), १२ ऑगस्ट**

गतविजेता डी गुकेशने अमेरिकेच्या लेव्हॉन ॲरोनियनकडून पहिल्या फेरीत झालेल्या पराभवानंतर पुनरागमन केले, ग्रिगोरी ओपरिन आणि लिम ले क्वांग यांना पराभूत केले आणि ग्रँड चेस टूर अंतर्गत खेळल्या जाणाऱ्या सेंट लुईस रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेच्या पहिल्या दिवशी संयुक्त तिसऱ्या स्थानावर राहिला.



## पोदार स्कूलच्या विपसना दुडेची राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलची विपसना दुडे हिची आसाम येथे होणाऱ्या राष्ट्रीय सबज्युनियर फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. मुंबई येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य सब जुनियर निवड चाचणीतून तिची निवड झाली. तिला क्रीडाशिक्षक करण शिंदे, साक्षी मारेडी आणि ऐश्वर्या गिरे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे मुख्याध्यापक समरेंद्र पानिग्राही यांनी अभिनंदन केले.



## १४ व १५ ऑगस्टला सोलापूर अल्ट्रा आझादी रन

- चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशनचा स्वातंत्र्यदिनानिमित्त सलग ७८ किमी रनिंगचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

सोलापूर अल्ट्रा आझादी रन १४ व १५ ऑगस्टला आयोजित केली आहे. स्वातंत्रदिनानिमित्त चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशनचा 'रन फॉर नेशन' हा सलग ७८ किमी रनिंगचा अनोखा उपक्रम सलग चौथ्या वर्षी होत आहे.

देशाला मानवंदना देण्याचा, देश प्रेम आणि फिटनेसबद्दल महत्व वाढवणे हा या रनमागचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी महाराष्ट्रातून निरनिराळ्या भागातून रनर येणार असल्याचे संयोजक अतिश शहा यांनी सांगितले. ३ किमी ते ७८ किमीपर्यंत अशा ८ प्रकारात हा रनिंगचा उपक्रम आहे. १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता सिद्धेश्वर वनविहार परिसरातील पोदार स्कूलजवळून याची सुरवात होईल. पोलीस आयुक्त एम. राजकुमार आणि मोनिका सिंघ यांच्या हस्ते याचे उद्घाटन होईल. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता या उपक्रमाची समाप्तीही तेथेच होईल. त्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बसे यांच्या हस्ते याचे पारितोषिक वितरण होईल.



## बुद्धिबळ स्पर्धेने अक्कलकोट तालुका शालेय क्रीडा स्पर्धेस सुरुवात

### तालुक्यातून २४० खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ ऑगस्ट-**

येथील फत्तेसिंह क्रीडा संकुलात तालुकास्तरीय शालेय पावसाळी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन बुद्धिबळ खेळाने तहसीलदार विनायक मगर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी तालुका क्रीडा प्रमुख उमेश नेवाळे, उदय वगरे दत्तात्रय हिळी, परमेश्वर व्हसुरे, रवीकिरण इंगळे, सोनल जाजू, अविनाश राठोड, ज्योती नवले, बाबू पवार, अमर पराड, सर्जेराव माशाळे, नागराज कलबुर्गी, पंच उदय वगरे, दयानंद दनुरे, भाईदास कोकणी, सोयल शेख, सिद्धेश्वर घुगरे, जितेंद्र राठोड, शरदचंद्र गंगोंडा आदी उपस्थित होते. या स्पर्धेत तालुक्यातुन २४० खेळाडू सहभागी झाले होते.

यात मंगरुळे प्रशाला, नूतन प्रशाला पानमंगरूळ, एस जी परमशेट्टी प्रशाला दुधनी, शारदाम ता प्रशाला, शहाजी हायस्कूल, सौ सुरेखा कल्याणशेट्टी, इंडियन मॉडेल स्कूल, ग्रामीण विद्या विकास प्रशाला चपळगाव, शंकरलिंग प्रशाला हत्तीकणबस, जे पी हायस्कूल गौडगाव, सी बी खेडगी कॉलेज, श्री स्वामी समर्थ प्रशाला आरळी विश्व अॅकेडमी, शिवचलेश्वर प्रशाला मैंदर्गी, एस. जी. परमशेट्टी हायस्कूल दुधनी, शेळके प्रशाला वागदरी, शासकीय निवासी शाळा, बसवेश्वर प्रशाला काझीकणबस, माध्यमिक आश्रम हांजगी आदी शाळांनी भाग घेतला.

## वर्ल्ड स्कूल व्हॉलीबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा; उद्या विभागीय निवड चाचणी पुण्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

शांग्लूओ चीन या ठिकाणी ४ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत आंतरराष्ट्रीय शालेय खेळ महासंघाव्दारा १५ वर्षांखालील मुले व मुलींची वर्ल्ड स्कूल व्हॉलीबॉल चॅम्पियनशिप होणार आहे.

या स्पर्धेत भारतीय संघ सहभाग होणार आहे. भारतीय संघाची निवड करण्यासाठी भारतीय शालेय खेळ महासंघाने राष्ट्रीय निवड चाचणीचे आयोजन २५ ते ३० ऑगस्ट या कालावधीत श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी पुणे या ठिकाणी केले आहे. राष्ट्रीय निवड चाचणीकरिता राज्याचे खेळाडू सहभागी होणार असून राज्य निवड चाचणीकरिता थेट विभागीय निवड चाचणीचे आयोजन १४ ऑगस्ट २०२५ रोजी केले आहे. जिल्ह्यातील इच्छुकांनी महाराष्ट्र मंडळाचे चंद्रशेखर आगाशे महाविदयालय पुणे येथे सकाळी ८.00 वाजेपर्यत उपस्थितीत रहावे. निवड चाचणीकरिता जाताना संबंधित खेळाडूंनी वयाचा पुरावा जन्म दाखला, आधारकार्ड, शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेला जनरल रजिस्टरची छायांकित प्रत घेऊन जावे. या निवड चाचणीकरिता सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

निवड चाचणीकरिता मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड (मो. नं. ७२१९१५५२५२) यांच्याशी संपर्क साधावा.

## जिल्हा खो-खो च्या विकासासाठी कटिबद्ध : गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १२ ऑगस्ट-**

सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्यानूतनसचिवपदी झालेल्या निवडीबद्दल उमाकांत गायकवाड यांचा सत्कार वेळापूरचे माजी उपसरपंच व अर्धनारी नटेश्वर खो-खो क्रीडा मंडळाचे अध्यक्ष जावेद मुलाणी यांच्या हस्ते करण्यात आला.



या कार्यक्रमात गायकवाड यांच्या खेळाडू, प्रशिक्षक व संघटक या तिन्ही भूमिकांतील योगदानाचा गौरव करण्यात आला. यावेळी जावेद मुलाणी म्हणाले, उमाकांत गायकवाड यांच्या नेतृत्वामुळे जिल्हा खो-खोचा विकास अधिक गतीने होईल. खेळाडूंना योग्य मार्गदर्शन व संधी मिळवून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना आमचे पूर्ण सहकार्य राहील.

सत्काराला उत्तर देताना गायकवाड म्हणाले, सचिव म्हणून माझे ध्येय जिल्ह्यातील खो-खो खेळाडूंची संख्या वाढवणे, ग्रामीण भागात लहान वयातील खेळाडूंना प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे आणि महिला खो-खो संघांना प्रोत्साहन देणे आहे. जिल्हा स्तरावर नियमित स्पर्धा, कॅम्प व प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय पातळीवर पोहोचविण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

यावेळी उत्कर्ष क्रीडा मंडळाचे अजित शिंदे, वेळापूर ग्रामपंचायतीचे लिपिक धनंजय धांडोरे, पोलीस कर्मचारी परवेज शेख, बंडू घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## ओंकार शुगर कॉर्पोरेशनला विजेतेपद; सहकार महर्षी शुगर उपविजेता

- पहिली महाराष्ट्र शुगर क्रिकेट लीग
- आवाडे शुगर व सिताराम शुगर विभातून तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १२ ऑगस्ट-**

ओंकार शुगर कॉर्पोरेशन लिमिटेडने पहिल्या महाराष्ट्र शुगर क्रिकेट लीग स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी सहकार महर्षी शुगरचा पराभव केला. तृतीय क्रमांक आवाडे शुगर व सीताराम शुगर यांना विभागून देण्यात आला. क्रिकेटचा थरार, कामगारांमधील मैत्री आणि प्रेक्षकांचा जल्लोष अशा रंगीबेरंगी वातावरणात महाराष्ट्र शुगर क्रिकेटचा पहिला पर्व उत्साहात झाला.

साखर उद्योगातील कारखान्यांमधील बंधुभाव वाढवण्यासाठी आणि उद्योगाची सकारात्मक प्रतिमा निम र्णि करण्यासाठी सुयोग गायकवाड यांच्या संकल्पनेतून ही अनोखी लीग आयोजित करण्यात आली होती. याचा उद्घाटन सोहळा हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर पार पडला. या वेळी साखर उद्योगातील मान्यवरांसह मराठी सिनेसृष्टीतील कलाकारांनी हजेरी लावून सोहळ्याची शोभा वाढवली. लीगचे सामने दयानंद महाविद्यालय मैदानावर तर अंतिम दोन दिवसांचे सामने माध्यमिक आश्रम प्रशाला, बालाजीनगर मंगळवेढा येथे झाले. पारितोषिक वितरण धनश्री सिताराम व आष्टी शुगरचे सर्वे सर्वा शिवाजीराव काळुंगे, श्री. श्री. सद्गुरू साखर कारखाना चेअरमन राव, सहकार महर्षी साखर कारखान्याचे चौगुले, ओंकार शुगर म्हैसगावचे जनरल मॅनेजर बंडगर व इतर साखर कारखान्याचे प्रतिनिधी उपस्थित होते. एकूण २० संघांच्या सहभागातून रोमांचक सामने रंगले.



**ओंकार शुगरचे डॉ. गायकवाड मालिकावीर**

विजेत्या ओंकार शुगर कॉर्पोरेशनला ३ लाख, उपविजेत्या सहकार महर्षीस २ लाख, तर तृतीय क्रम ांकाच्या आवाडे शुगर व सीताराम शुगर यांना १ लाख रुपयांचे पारितोषिक विभागून देण्यात आले. ओंकार शुगर कॉर्पोरेशन लिमिटेडचे डॉ. गायकवाड यांना मालिकावीर किताब मिळाला. सर्वोत्कृष्ट फलंदाजाचे पारितोषिक विक्रम गाडे, गोलंदाजाचे डॉ. गायकवाड, क्षेत्ररक्षकाचे बालाजी रूपनेर यांना देण्यात आले.

## १६ ऑगस्टपासून सोलापूर जिल्हा ज्युनिअर मैदानी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने सोलापूर जिल्हा मुले व मुलींची ज्युनिअर मैदानी व निवड चाचणी स्पर्धा शनिवार १६ व १७ ऑगस्ट रोजी सोरेगाव येथील एस.आर. पी.एफ. ॲथलेटिक्स मैदान येथे होईल. स्पर्धा प्रवेशिका शनिवारी १६ ऑगस्ट रोजी स्पर्धेठिकाणी सकाळी ९ वाजेपर्यंत स्वीकारले जातील.

या स्पर्धा १४, १६, १८ व २० वर्षे वयोगटासाठी आहेत. वयोगट १४ वर्षे साठी (१५/१०/२०११ ते १४/१०/२०१३), १६ वर्षे साठी (१५/१०/२००९ ते १४/१०/२०११), १८ वर्षे साठी (१५/१०/२००७ ते १४/१०/२००९) तर २० वर्षेसाठी (१५/१०/२००५ ते १४/१०/२००७) या दरम्यान जन्मलेले खेळाडू या स्पर्धेसाठी पात्र आहेत. यासाठी महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायत व १०वी बोर्ड सर्टिफिकेटवरील जन्म तारीख ग्राह्य धरले जाईल.

ह्या स्पर्धेतील पात्र खेळाडूंची २ ते ५ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य मैदानी स्पर्धासाठी निवड होणार आहे. राज्य स्पर्धासाठी निवड झालेल्या खेळाडूंची ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाचे युआयडी आवश्यक आहे, असे सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी यांनी कळविले आहे. आधिक माहितीसाठी (मो.९३२६०५५९४०) या मोबाईलवर संपर्क साधावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### श्री शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा

**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

पद्मश्री एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन श्री शिवाजी महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती ग्रंथालयात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. बिरा पारसे तर अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ.शशिकांत गायकवाड हे उपस्थित होते. प्रास्ताविक करताना ग्रंथपाल प्रा. एम.डी. टिपरसे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राहुल पालके यांनी केले तर आभार डॉ. विजयकुमार भांजे यांनी मानले. याप्रसंगी प्रा. विजयश्री गवळी, मंजुषा श्रीमंगल, सहाय्यक ग्रंथपाल एच.एन. घावटे, जे. वाय. पवार उपस्थित होते.





### बार्शी तालुक्यात आढळले दुर्मिळ सिवेलकॅट प्रजातीचे मांजर

**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

मौजे कळंबवाडी येथील शेतकरी पांडुरंग मुंढे यांच्या शेतात सिवेलकॅट मांजर जखमी असल्याची माहिती वन विभागाला समजली. बार्शी वन विभागाच्या टीमने सदर ठिकाणी जाऊन मांजराची पाहणी करुन, जखमी मांजरास ताब्यात घेऊन, पशुवैद्यकीय दवाखाना बार्शी येथे नेऊन त्याच्यावर उपचार करण्यात आले. उपचारानंतर सदर मांजरास रिस्क्यु टीम बावधान पुणे येथे पाठवण्यात आले. या मोहिमेमध्ये गांगरडे (वनपरीक्षेत्र अधिकारी बार्शी), सुलतान शेख (फ़ॉरेस्ट ऑफिसर बार्शी), सिद्धेश्वर जाधव (वाहन चालक), पांडुरंग मुंढे (शेतकरी) तसेच गावकऱ्यांनी मोलाची कामगिरी केली. हा सस्तन प्राणी राखाडी किंवा तपकिरी रंगाचा दिसतो. त्याचे शरीर पातळ असते, त्यावर लहान ठिपके आणि पट्टे असतात तसेच त्याला लांब शेपटी असते. सिव्हेट निसर्गात निशाचर असतात. त्यांच्या नेहमीच्या आहारात लहान पक्षी, फळे आणि कीटक खात असतात. मांजर ही लुप्त होण्याच्या मार्गांवर असल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



### नागनळळी येथील आश्रमशाळेत केळी वाटप

**अक्कलकोट, दि. १२ ऑगस्ट-**

येथील थोर सुपी संत शेख नरुद्दीन चिस्ती यांच्या उरूस निमित्त आश्रम शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे सचिव जावेद पटेल यांच्या हस्ते केळी वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य मुजावर आय एम, मुख्याध्यापक आर. जी. शेख, प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### बोरी कुरनूर मध्यम प्रकल्पातून विसर्ग झाला कमी

**अक्कलकोट, दि. १२ ऑगस्ट-**

बोरी कुरनुर मध्यम प्रकल्प (ता.अक्कलकोट) येथून पूर नियंत्रणासाठी बोरी मध्यम प्रकल्पातून एकूण २००० क्युसेकने सुरू असलेला पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला आहे सध्याचा पाण्याचा विसर्ग कमी करून १५०० क्युसेक एवढा करण्यात आला आहे. बोरी कुरनुर मध्यम प्रकल्पाच्या खालील भागातील बोरी नदी पात्राच्या किनाऱ्यावरील ग्रामस्थाना याद्वारे सर्वांना याद्वारे विनंती करण्यात येते की बोरी नदी काठच्या गावांतील कोणीही नदी लगत जाऊ नये. .कोणत्याही पुलावरून पाणी वाहत असताना पूल ओलांडू नये व योग्य ती खबरदारी घेऊन पाटबंधारे विभागास सहकार्य करावे. असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित ग्रामपंचायत यांना विसर्गाबाबत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

## निधन वृत्त...

### महेमूद नालबंद



**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

शनिवार पेठ तालीम येथील महेमूद म.युसूफ नालबंद (वय ७२) यांचे मंगळवार १२ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी जडेसाब मुस्लीम कब्रस्तान येथे दफन करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. माजी महापौर ख्वाजादाऊद नालबंद यांचे ते बंधू होत.

### व्यंकटेश कुलकर्णी



**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

कुंभारी ता. दक्षिण सोलापूर येथील व्यंकटेश दत्तात्रय कुलकर्णी यांचे सोमवारी ११ ऑगस्ट रोजी अकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी, नातवंडे व सुना आहेत. पोलीस हवालदार विवेक सांजेकर यांचे ते सासरे होत.

# शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी, कर्मचाऱ्यांचे सामूहिक रजा आंदोलन स्थगित

### मागण्या मान्य करण्याबाबत सकारात्मक चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

शिक्षणमंत्री दादा भुसे व प्रधान सचिव रनजित सिंह देओल यांच्यासमवेत शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व सर्व शिक्षण संचालक, सहसंचालक यांची सकारात्मक चर्चा झाल्याने सामूहीक रजा आंदोलनाला यश आल्याचे सांगण्यात येत आहे.

नागपूर विभागासह सर्व बोगस शालार्थ प्रकरणांची चौकशी विशेष चौकशी समितीकडे वर्ग करावी, विनाचौकशी कोणत्याही अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमबाह्य अटक करु नये, शालार्थ प्रकरणी निलंबित झालेले सर्व अधिकारी यांना सेवेत पुनर्स्थापित करण्यात यावे, अतिरिक्त कामांच्या ताणाबाबत कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त




होणाऱ्या व्ही.सी. बंद करावे या मागण्यांबाबत शिक्षणमंत्री व संघटना प्रतिनिधी यांचेसोबत मंत्रालयात बैठकीत झाली. संघटनेच्या सर्व मागण्यांबाबत सकारात्मक विचार केला जाईल . संघटनेच्या मागण्यांचे निवेदनाबाबत पोलीस विभागाला शासन स्तरावरुन कळविण्यात येणार आहे. कोणत्याही निरपराध अधिकारी व कर्मचारी यांच्यावर चुकीची कारवाई होणार नाही, अशा प्रकारचे असे आश्वासन मंत्री व प्रधान सचिव यांनी दिले आहे. त्यामुळे संघटनेचे ८ ऑगस्टपासून पासून सुरु असलेले बेमुदत सामुहिक रजा आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात येत आहे. संघटनेचे आंदोलन यशस्वी करण्यासाठी राजपत्रित अधिकारी महासंघ, अराजपत्रित अधिकारी कर्मचारी संघटना, विस्तार अधिकारी संघटना, केंद्रप्रमुख संघटना, शिक्षक-शिक्षकेतर संघटना, लोकप्रतिनिधी, अशा विविध संघटनांचे सहकार्य तसेच शिक्षण आयुक्त सच्चिद्रप्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य व वरिष्ठ अधिकारी पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले.

> विनाचौकशी नियमबाह्य पध्दतीने अटक झाल्यास स्थगित केलेले आंदोलन कोणतीही पूर्वसूचना न देता पुन्हा सुरु केले जाईल. त्यामुळे सर्व शिक्षणसेवा राजपत्रित अधिकारी व कर्मचारी यांनी बुधवार दि.१३.०८.२०२५ पासून पूर्ववत कामावर रुजू व्हावे, असे आवाहन अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाच्या वतीने करण्यात येत आहे.
>
> **- सचिन जगताप,**
> माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर

## आंदेवाडी येथील पुलावरून वाहून गेलेल्या युवकाचे प्रेत सापडले

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ ऑगस्ट-**



अक्कलकोट तालुक्यातील आंदेवाडी ज येथील पुलावरून वाहून गेलेल्या युवकाचे प्रेत आज मंगळवारी सकाळी आठ वाजता बबलाद केटीवेअर बंधाऱ्यात मिळाले. अक्कलकोट तालुक्यातील बबलाद येथील २७ वर्षीय युवक रेवणसिद्ध बिराजदार हा आंदेवाडी ज येथील पुलावरून मोटार सायकल वरून दुधनीकडे रविवारी दि. १० ऑगस्ट सकाळी दहा वाजता निघाला होता. पण आंदेवाडी ज येथील पुलावरून बोरी नदीच्या पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने मोटार सायकलसह तो पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला होता.

दोन दिवसांपासून त्या बेपत्ता तरुणाचा शोध महसूल प्रशासन पोलीस प्रशासनाद्वारे सुरू होता. त्या तरुणाच्या शोधासाठी एनडीआरएफ च्या जवानांना बोलावण्यात आले होते. अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आंदेवाडी ज येथील पुलाची पाहणी करून बेपत्ता तरुण रेवणसिद्ध बिराजदार यांच्या शोधासाठी प्रशासना सूचना केल्या होत्या. बबलाद केटीवेअर येथे बांधलेल्या जाळीमुळे प्रेत त्यात अडकल्याने मंगळवारी सकाळी आठ वाजता मिळाले. दरम्यान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी स्वतः शोध मोहिमेच्या बोटी मधून पाण्यात जाऊन या शोध कार्यात भाग घेतला होता. तसेच माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनीही आंदेवाडी ज येथील पुलास भेट देऊन या घटनेची माहिती घेतली होती.



## लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त होम मिनिस्टर स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

साहित्य सम्राट डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विकी खलसे मित्रपरिवार यांच्यावतीने होम मिनिस्टर खेळ रंगला पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण सभागृह, बार्शी येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून उद्योजक राकेश बाळासाहेब तातेड, गायक चंदन कांबळे, रोहित खलसे महाराष्ट्र उपाध्यक्ष लहुजी शक्ती सेना, सुनील अवघडे जिल्हाध्यक्ष दलित महासंघ, अध्यक्ष सपना लवटे, सचिव काबरा, गौरी रसाळ प्रोजेक्ट चेअरमन, संदीप आलाट दलित महासंघ शहराध्यक्ष, उमेश पवार पत्रकार, रील स्टार किरण मस्तानी बार्शीकर, चंद्रकांत चव्हाण पीएसआय रिटायर, स्मार्ट अकॅडमीचे संचालक सचिन वायकुळे, लक्ष्मण भोसले, उमेश पंडित, कार्यक्रमाचे अध्यक्ष विकी खलसे, रवी क्षीरसागर, नागेश कसबे, विशू खलसे, अभी पवार, अलीम तांबोळी, रोहन खलसे, आवेश पठाण, सागर कसबे, सुदर्शन खंडागळे, निखिल रसाळ, सुजित राऊत, रवी जळके यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रथम पारितोषिक प्रीती पवार यांना पैठणी व फर्निचर कॉर्नर पीस, स्वप्नाली घोलकर यांना सोन्याची नथ, स्नेहल पानगावकर यांना चांदीचा छल्ला, पूजा बारंगुळे यांना चांदीची पैंजण, मनीषा निरंजन यांना समई, दिपाली अडसूळ यांना फॅन, पौर्णिमा अवघडे यांना एलईडी टीव्ही आदी बक्षिसांचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

### खुनी हल्ल्याच्या गुन्ह्यात एकास जामीन मंजूर

**मंद्रूप, दि. १२ ऑगस्ट-**

मंद्रुप पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या खुनी हल्ल्याच्या गुन्ह्यातील आरोपी राजशेखर श्रीमंत मायनाळे यास सोलापूर येथील प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी जामीन मंजूर केला. दि. १० जुलै रोजी रात्री मळसिद्ध ख्याडे आणि त्यांचा भाऊ सिद्धाराम ख्याडे यांच्यावर मंद्रुप गावातील प्रमोद जोडमोटे यांनी आपल्या ताब्यातील हत्याराने डोक्यात व डाव्या हातावर जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने मारहाण करून गंभीर दुखापत केली, अशी फिर्याद मंद्रुप पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. आरोपीस पोलिसांनी अटक करून पोलीस कोठडी नंतर न्यायालयीन कोठडीत पाठविले होते. कोठडीत असताना आरोपीच्या वतीने ॲड. नागेश मेंडगुदले यांनी जामिनासाठी युक्तिवाद केला, न्यायालयाने युक्तिवादातील मुद्दे ग्राह्य धरून आरोपी मायनाळे यास जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. नागेश मेंडगुदले, ॲड. अभिजीत इटकर व ॲड. लवटे यांनी काम पाहिले.




## ए.जी. पाटील तंत्रनिकेतनमध्ये ग्रंथपाल दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

शांती एज्युकेशन संचलित ए. जी. पाटील तंत्रनिकेतन मध्ये ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३३ व्या जयंतीचे औचित्य साधून ग्रंथालय विभागाकडून ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून संगमेश्वर कॉलेजचे माजी उपप्राचार्य प्रो. डी.एम.मेत्री यांनी 'लायब्ररी: डायनामिक सेंटर ऑफ नॉलेज' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दरवर्षी ग्रंथालयाकडून शिक्षक व विद्यार्थ्यांमधून बेस्ट लायब्ररी यूजर अवॉर्ड दिला जातो. त्यात बुक्स सर्क्युलेशन, डिजिटल लायब्ररीचा वापर, जर्नल सेक्शनचा वापर तसेच रीडिंग रूमचा वापर या निकषाद्वारे हा अवॉर्ड दिला जातो. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील शिक्षकांमधून पहिले बेस्ट लायब्ररी यूजर अवॉर्ड सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील प्रा. व्हटकर स्वप्नाली, दुसरे अवॉर्ड इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रा. कोरे भाग्यश्री, तिसरे अवॉर्ड इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रा. शेख करिष्मा यांना प्रमुख अतिथी प्रा. डी. एम. मेत्री यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुस्तक देऊन गौरविण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांमधून पहिले बेस्ट लायब्ररी युजर अवॉर्ड बुकवाले एम. यु. (मेकॅनिकल इंजिनिअरिंग), दुसरे बेस्ट लायब्ररी यूजर अवॉर्ड मुल्ला अनिसा (तृतीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग), तिसरे बेस्ट लायब्ररी यूजर अवॉर्ड कोटा अक्षरा (तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) यांना देण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य प्रो. एस. के. मोहिते, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही.पोतदार, एस. एन. गवंडी, एम. एम. कुलकर्णी, एन. बी. पवार, . टी. एल. पाटील, एस. एस. लिगाडे, एस. आर. बागबान, आर. एस. मोटगी, ही. आर. आवटे हे उपस्थित होते. सूत्रसंचालन तृतीय वर्ष कॉम्प्युटर विभागातील विद्यार्थिनी अंकिता चव्हाण व निकिता ठक्का यांनी केले.अतिथींचा परिचय सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील प्रा. व्हटकर एस. एस. यांनी करून दिला. सहा. ग्रंथपाल कस्तुरे एस. व्ही. यांनी आभार मानले. कोकणे एस.आर. व खवेकर एस. एस. यांचेही सहकार्य लाभले.

## पानगावात श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

श्रीकृष्ण प्रतिष्ठान, पानसे मंडळ, पानगांव यांनी यंदा श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमचे उद्घाटन सतीश कुलकर्णी यांच्या हस्ते झाले तर प्रमुख पाहुणे मिलिंद पाटील होते. महाभारत या महग्रन्थात्मक मालिकेत भगवान श्रीकृष्णाची भूमिका साकारलेले अभिनेते नितीश भारद्वाज यांच्या कृष्णलीला या विषयावरील व्याख्यानाने सप्ताहची सुरवात झाली.




व्याख्यानात नितीश भारद्वाज यांनी विश्वात सर्वश्रेष्ठ असणाऱ्या भारतीय संस्कृती, अध्यात्म, परंपरा व जीवनमूल्यांचा संबंध हा प्रभू श्रीराम व श्रीकृष्ण यांच्या अलौकिक जीवनाशी असल्याचे सांगितले. भगवत गीता व ज्ञानेश्वरी हे ग्रंथ माणसाला आदर्श जीवन व सर्वव्यापी मानवता धर्माची, निष्काम कर्माची व समर्पणाची शिकवण देणारे महान ग्रंथ आहेत हे सांगून त्यांनी त्यांचे महत्व सांगितले. कार्यक्रमासाठी बार्शी रा.स्व. संघचालक आनंद सोमाणी, कार्यवाह अरुण ग्रामोपाध्ये, सूर्यकांत देशमुख, ॲड. राहुल देशमुख, विश्व हिंदू परिषदेचे बापूसाहेब कदम, वनवासी कल्याण आश्रमचे अनिल पाटील व संघ परिवारातील कार्यकर्ते तसेच पानगांवमधील प्रतिष्ठित व्यक्ती जयसिंगराव देशमुख, विद्याधर गव्हाणे, दत्तात्रय काळे, तानाजी ढेरे, संतोष कानगुडे, प्रसाद पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन नंदकुमार पानसे, प्रास्ताविक विक्रम पानसे, सन्मानवाचन मधुरा पानसे तर आभार संपदा पानसे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, वैभव पानसे, सचिन पानसे, अमोल पानसे, किशोर पानसे, प्रथमेश पानसे, यश पानसे, ऋषिकेश पानसे, सौरभ पानसे, सुशील पानसे, संदीप पानसे यांनी प्रयत्न केले.

## संतोष गुळमिरे प्राथमिक विद्यामंदिरात तिरंगा ध्वज रॅली

**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

आज 'आजादी का अमृत महोत्सव' व हर घर तिरंगा उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर संतोष गुळमिरे प्राथमिक विद्यामंदिर, वाणी प्लॉट, आगळगाव रोड येथे तिरंगा ध्वज रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रॅलीत विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा घेऊन देशभक्तीपर घोषवाक्यांचा गजर करत उत्साहाने सहभाग घेतला. रॅलीचे उद्घाटन मुख्याध्यापकांच्या हस्ते करण्यात आले. रॅली शाळा परिसरातून निघून आगळगाव रोड, वाणी प्लॉट परिसरातून फिरुन पुन्हा शाळेत परतली. विद्यार्थ्यांनी



'भारत माता की जय', 'वंदे मातरम', 'जय हिंद' अशा घोषणांनी वातावरण दुमदुमवले.



## कॉंग्रेसची नव्याने बांधणी करणार

**कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार; कार्यकर्त्यांची बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ ऑगस्ट-**

सांगोला तालुका जरी माढा लोकसभा मतदारसंघात असला तरी पुढील काळात निष्ठावंत व पक्षाचे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी देणार आहोत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत इच्छुक असणाऱ्यांनी आपापल्या प्रभाग, गट, गणात जाऊन वातावरण निर्मिती करावी. आगामी काळात सांगोला तालुक्यात कॉंग्रेस पक्ष बळकट झाल्याचे दिसेल, असे प्रतिपादन जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केले.

सांगोला शहर व तालुका कॉंग्रेस कार्यकर्त्यांची बैठक आज कर्मवीर नगर सांगोला येथे संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजकुमार पवार, मोतीराम चव्हाण, व्ही.जे. एन.टी.विभागाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, जिल्हा संघटक रमेश हसापूरे, सिद्राम पवार, सांगोला शहर अध्यक्ष तोहीद मुल्ला, अजयसिंह इंगोले-पाटील सुनील नागणे- पाटील, श्रीशैल रणखांबे उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा उपाध्यक्ष राजकुमार पवार यांनी केले. याप्रसंगी सातलिंग शटगार यांची सोलापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सांगोला शहर तालुका कॉंग्रेस कमिटीच्यावतीने सत्कार करण्यात आला. बैठकीस श्रीशैल रणखांबे, चंद्रकांत तमशेट्टी, ज्ञानेश्वर जन्मले, खंडेराव लांडगे, लक्ष्मण सुतार, सिद्धेश्वर देशमुख, पांडुरंग माने, शेखलाल शेख, प्रशांत जावीर उपस्थित होते.

## अंगारिका चतुर्थीनिमित्त पखालपूरला जत्रेचे स्वरुप

**● श्री गणेशाच्या दर्शनासाठी पहाटे पासूनच भाविकांची गर्दी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ ऑगस्ट -**

अंगारक चतुर्थी निमित्ताने पखालपूर येथील प्रसिध्द गणपतीच्या दर्शनासाठी मंगळवारी पंढरपूर शहर आणि पंचक्रोशीतील भाविकांची मोठी गर्दी झाली होती. अंगारकी चतुर्थी असल्यामुळे भाविकांच्या गर्दीमुळे पखालपूरला जत्रेचे स्वरुप प्राप्त झालेले दिसत होते.

सध्या श्रावण महिना सुरु आहे. त्यातच या वर्षातील अंगारिका चतुर्थीचा योग आला आहे. त्यामुळे पखालपूर येथील प्रसिध्द गणपती मंदिरात श्री गणेशाच्या दर्शनासाठी पहाटे पासूनच भाविकांची गर्दी झालेली होती. अनेक जवळपासचे भाविक येथील चंद्रभागा नदीमध्ये स्नान उरकून विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेऊन पखालपूर येथे गणपतीच्या दर्शनासाठी जात असल्याचे दिसत होते. राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने येथील एसटी स्थानकातून भाविकांना पखालपूर येथे जाण्यासाठी सकाळ पासूनच एसटी बसची सोय करण्यात आलेली होती.



भाविकांच्या गर्दीमुळे पखालपूर येथील मंदिरातील दर्शन मंडप भरुन सुमारे एक ते दीड किलोमीटर लांब अंतरापर्यंत दर्शनाची रांग गेलेली होती. तरीपण भाविकांना गणरायाचे दर्शन सुलभरितीने घडत होते.

पखालपूर भागात भाविकांच्या दुचाकी, चारचाकी वाहनांमुळे सतत वाहतुकीची कोंडी होत होती. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिलांना वाहतूक कोंडीतून कसरत करीत पखालपूर गाठावे लागत होते. यावेळी चोख बंदोबस्त ठेवण्यात आलेला होता.पंढरपूरच्या सात सेवाधारी मंडळांपैकी डिंगरे आडनावांच्या मंडळाचा हा गणपती आहे. हे गणेशस्थान या डिंगरेचा कुलदैवत आहे. पंढरपूरपासून अवघे ४ कि.मी. च्या अंतरावर आहे. हे तसे थोडेसे आड जागीच आहे. या मंदिरात एकूण २२ कोरीव खांब आहेत यास शिखर आणि गाभारा नाही.

### गणरायावरील श्रध्देमुळेच भाविकांची गर्दी

पखालपूर येथील श्री गणेशाचे मंदिर हे अतिशय प्राचिन आहे. या ठिकाणच्या गणेशाची मुर्ती अत्यंत देखणी अशी आहे. या ठिकाणी गणेशाजवळ भक्तानी मनोभावे एखादी इच्छा बोलली तर ती निश्चितपुर्ण होते अशी भाविकांची श्रध्दा आहे. येथील गणरायावरील या श्रध्देमुळेच दर चतुर्थीला येथे भाविकांची गर्दी होत असते. विशेष म्हणजे अंगारकी चतुर्थीला तर येथे मोठ्या जत्रेचे स्वरुप येत असते.



सोलापूर : दैनिक तरुण भारतला वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना निवृत्त सहायक पोलिस आयुक्त दिपक आर्वे आणि सौ. आवै.

# शक्तीपीठ प्रकल्प पूर्ण करण्यावर राज्य सरकार, एमएसआरडीसी ठाम

## ● सोलापूर जिल्ह्यातील बाधित शेतकरी संभ्रमावस्थेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

राज्यातील धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने अनेक जिल्ह्यांना जोडणारा, महाराष्ट्रातील तिसऱ्या क्रमांकाच्या बहुचर्चित शक्तिपीठ महामार्गासाठी सोलापूर जिल्ह्यात जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. या मार्गाला काही जिल्ह्यातून शेतकऱ्यांचा विरोध होत असला तरी महाराष्ट्र सरकार आणि एमएसआरडीसी शक्तीपीठ हा प्रकल्प पूर्ण करण्यावर ठाम असल्याचे दिसून येत आहे; कारण त्यांचा महामार्ग भूसंपादनाचा वेग वाढला आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील ५ तालुक्यातील ५२ गावातून हा महामार्ग जाणार असून, या ठिकाणच्या बाधित गावकऱ्यांना मोजणीच्या तारखाही दिल्या आहेत.




मात्र या जमिनींचा मोबदला नेमका किती आणि कसा मिळणार? याविषयी शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था असल्याचे सध्या दिसून येत आहे. सोलापूर जिल्ह्यातील जवळपास पाच तालुक्यांतील ५२ गावांतून हा राष्ट्रीय महामार्ग जाणार आहे. या महामार्गासाठी आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्यासाठी शासनाच्या वतीने मोजणी फी भरण्यात आली आहे.

त्यामध्ये जवळपास ४१ गावांतील शेतकऱ्यांना मोजणीच्या तारखाही देण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात येते. सोलापुरातील बार्शी ९ गावे, उत्तर सोलापूर ३, मोहोळ ९, पंढरपूर ११ तर सांगोला २० अशा जवळपास ५२ गावांतून हा शक्तिपीठ महामार्ग जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. तर १० गावांतील मोजणी पूर्ण झाली आहे.

शेतकऱ्यांच्या शेकडो हेक्टर जमिनी या राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित केल्या जाणार आहेत. मात्र या जमिनींचा मोबदला नेमका किती आणि कसा मिळणार? याविषयी शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था आहे. त्यामुळे काही ठिकाणच्या शेतकऱ्यांनी सुरुवातीपासूनच या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला विरोध दर्शवला आहे. तर अनेक भागात शेतकरी तयार नसल्याचेही सांगण्यात येत आहे.

**● शेतकऱ्यांचा विरोध आणि आव्हाने काय आहेत? :** या महामार्गासाठी भूसंपादनाला काही जिल्ह्यांमध्ये तीव्र विरोध होत आहे. विशेषतः कोल्हापूर आणि परभणी जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला कडाडून विरोध केला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, या महामार्गामुळे त्यांच्या चांगल्या जमिनी जातील आणि त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होईल. सरकारने बाजारभावाच्या तिप्पट दराने जमीन खरेदी करण्याचे आश्वासन दिले असले, तरी काही शेतकरी या मोबदल्यावर समाधानी नाहीत मात्र सरकार आणि MSRDC मात्र हा प्रकल्प पूर्ण करण्यावर ठाम आहेत.

**● महामार्गाचे फायदे आणि निष्कर्ष :** हा महामार्ग पूर्ण झाल्यावर विदर्भ आणि मराठवाड्यासारख्या भागांना विकासाची मोठी संधी मिळेल. या जिल्ह्यांना चांगल्या कनेक्टिव्हिटीमुळे स्थानिक व्यापार, पर्यटन आणि रोजगाराच्या संधी वाढतील. हा प्रकल्प महाराष्ट्राच्या विकासासाठी महत्त्वाचा असला तरी, भूसंपादनामुळे बाधित होणाऱ्या शेतकरी आणि स्थानिकांच्या प्रश्नांवर लक्ष देणे आवश्यक आहे. सरकारला या लोकांचा विश्वास संपादन करूनच पुढे जावे लागेल.

## महत्वाचे...



### गुरूकुलमध्ये रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात

**अक्कलकोट, दि. १२ ऑगस्ट-**

श्री कालिकाभवानी कल्याणकारी संस्था संचालित विद्याभारती विद्यालय गुरुकुलाश्रम संगोगी (ब), ता. अक्कलकोट येथे रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमप्रसंगी संस्थापक अध्यक्ष परम पूज्य सद्गुरु देवीदास महाराज, प्रमुख पाहुणे म्हणून नितीन कवठेकर (संचालक, डॉ. हेडगेवार ब्लड बँक) उपस्थित होते. श्री कवठेकर हे आपल्या मनोगतामध्ये म्हणाले की, बहिणीचे रक्षणाबरोबर देशाचे रक्षणही महत्त्वाचे आहे. त्यामुळे देशाप्रती अभिमान बाळगणे, देशाबद्दल प्रेम बाळगणे, देश सेवा करणे, हे महत्वाचे आहे. कारण देश टिकेल तरच आपण राहणार आहोत. त्यामुळे देश महत्त्वाचे आहे. रक्षाबंधनानिमित्य बहिणीचे रक्षणाबरोबर देशाचे रक्षणही महत्त्वाचे आहे, हे सर्वांनी नोंद करून घेणे घ्यावे.कार्यक्रमास उपस्थित मान्यवर नितीन कवठेकर यांच्यासमवेत त्यांची धर्मपत्नी, सौ. प्रिया पाटील, सौ. वदरवडे, तुकाराम दुरुगकर गुरुजी, सिद्धप्पा पुजारी सर, अमृत बिराजदार, रविंद्र वाघमोडे, शावरप्पा करमल, चंद्रशा पुजारी, शंकर सुतार, महादेव बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्याध्यापक चांगभले एस.डी. यांनी अतिथींचं मनःपूर्वक स्वागत केलं.कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करवीर बी. बी. सर यांनी केली.





### शिक्षण, आरोग्य विभागाची तपासणी; गैरहजर कर्मचाऱ्यांना विनावेतनचे आदेश

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी मंगळवारी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आणि आरोग्य विभागाला भेट देऊन कामचुकार कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेऊन गैरहजर कर्मचाऱ्यांचे विनावेतन करण्याचे आदेश दिले आहेत. शिक्षण विभागाच्या कारभाराने त्रस्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सीइओकडे तक्रार करीत आहेत. तिन्ही विभागातील कामचुकार कर्मचार्यांची दखल घेत सीईओ जंगम यांनी मंगळवारी या विभागात अचानक तपासणी केली. अधिकाऱ्यांची हजेरी घेऊन विभागात फिरून टेबलावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामांबरोबर त्यांच्यावर असलेल्या जबाबदारीची त्यांनी माहिती घेतली. प्रलंबित कामाबाबत त्यांनी कर्मचाऱ्यांना फैलावर घेतले. जे कर्मचारी जागेवर हजर नव्हते त्यांच्याबाबत चौकशी करून त्यांच्यावर विना वेतनाची कारवाई करण्याचे आदेश दिले. माध्यमिक शिक्षण विभागात अधिकारी आंदोलनावर असल्याचे सांगण्यात आले. माध्यमिक शिक्षण विभागात दिलेल्या कर्मचाऱ्यांचे कामकाज व जबाबदाऱ्यांची तपासणी केली. आरोग्य विभागातही फेरफटका मारून कर्मचार्यांच्या कामकाज तपासणी केली. सीईओ कुलदीप जंगम यांच्या अचानक भेटीमुळे शिक्षण व आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे. सीईओ जंगम यांनी दांडी बहाद्दरांची गंभीर दखल घेतली आहे.



### सार्थक सेवा सन्मान पुरस्काराने शिक्षक परमेश्वर काळे यांचा गौरव

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

संस्कार संजीवनी फाउंडेशनच्या सामाजिक कामाला सार्थक वेल्फेअर फाउंडेशन पुणे या संस्थेकडून दिला जाणारा मानाचा ''सार्थक सेवा सन्मान पुरस्कार येथील परमेश्वर काळे यांना प्रदान करण्यात आला.शाल, सन्मान पत्र, धनराशीचा धनादेश व भेट वस्तू असे या पुरस्काराचे स्वरूप होते. रमेश खरमाळे, सार्थकच्या संस्थापिका स्वाती नामजोशी, संस्थापक संचालक प्रदीप नामजोशी आदींच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला. गेली १५ वर्षे या फाउंडेशनचे परमेश्वर काळे आणि त्यांची पत्नी अरूणा या तळागाळातील, भटक्या, वंचित, मुलांसाठी हगलूर येथे आश्रम चालवत आहेत. शिक्षण, संगोपन, संस्कार ही त्रिसूत्री त्यांच्या कामाचा आधार आहे. पुरस्कारार्थी काळे हे छत्रपती शिवाजी प्राथमिक शाळेत सहशिक्षक आहेत.



# मध्य रेल्वे विभागाकडून हर घर तिरंगा यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट -**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १२ ऑगस्ट रोजी रेल्वे मंत्रालयाच्या 'हर घर तिरंगा' मोहिमे अंतर्गत डीआरएम कार्यालय ते सोलापूर रेल्वे स्टेशनपर्यंत एक उत्साही तिरंगा यात्रा आयोजित केली होती.

या यात्रेचा उद्देश नागरिकांना त्यांच्या घरी राष्ट्रध्वज फडकविण्यासाठी आणि अभिमानाने प्रदर्शित करण्यासाठी प्रेरित करणे, देशभक्तीची भावना निर्माण करणे, एकता आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या आदर्शांना प्रोत्साहन देणे हा होता. यात्रेत सहभागींनी उत्साहाने तिरंगा फडकावला, यात्रेचा मार्ग आनंद आणि एकतेच्या वातावरणाने भरला होता. यात्रेचे नेतृत्व सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक व अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी केले.

# हरी सर्वोत्तमा वायु जीवोत्तमाच्या जयघोषात निघाला महारथोत्सव

## शहरातील हजारो भविक भाविकांनी घेतला प्रसादाचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

शहरात हरी सर्वोत्तमा वायु जीवोत्तमाच्या जयघोषात भाविकांच्या उपस्थितीत श्री राघवेंद्र स्वामी यांचा महारथोत्सव झाला. श्री. राघवेंद्र स्वामी मठातर्फे आयोजित तीन दिवसीय आराधना महोत्सवाचा समारोप मंगळवारी झाला. त्यानिमित्त मुरारजी पेठ आणि डफरीन चौक येथील श्री. राघवेंद्र स्वामी मठांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम झाले.

मंगळवारी पहाटे ५.३० वाजता सुप्रभात, सकाळी ६ वाजता निर्माल्य विसर्जन करण्यात आले. सकाळी ७.३० वाजता भाविकांच्या उपस्थितीत अष्टोत्तर पारायण झाले. सकाळी ८ वाजता पाद्यपूजा झाल्यानंतर सकाळी ९ वाजता पंचामृत अभिषेकास प्रारंभ झाला. यानंतर सकाळी ११ वाजता मुरारजी पेठ येथील श्री राघवेंद्र स्वामी मठापासून श्री राघवेंद्र स्वामी यांच्या महारथोत्सवास प्रारंभ झाला. प्रारंभी पालखी पूजन झाले. यावेळी भाविकांनी एकमेकांना गुलाल लावून आनंद साजरा केला. रंगीबेरंगी फुलांनी सजविलेल्या



चांदीच्या रथात श्री राघवेंद्र स्वामी यांची मूर्ती कोरलेले वृंदावन ठेवण्यात आले होते. भाविकांनी मिरवणूक मार्गावर रथ ओढला.

मिरवणूक मार्गावर भाविकांनी रांगोळ्यांच्या तसेच फुलांच्या पायघड्या अंथरून रथ मिरवणुकीचे स्वागत केले. या रथ मिरवणुकीत भाविकांनी श्री राघवेंद्र स्वामी यांच्यावरील विविध भजने आणि गीते सादर केली. मिरवणूक मठात आल्यानंतर तुळशी अर्चना करुन नैवेद्य दाखवण्यात आला. हस्तोदक, अलंकार, महामंगलारती झाल्यानंतर भाविकांना तीर्थप्रसादाचे वाटप करण्यात आले. यानंतर हजारो भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.



# पद्मशाली युवजन संघमतर्फे पारायण, भरतनाट्यम् उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

पद्मशाली समाजाचे कुलदैवत मार्कंडेय महामुनी यांच्या रथोत्सव निमित्त अ.भा. पद्मशाली युवजन संघमतर्फे विष्णू-शिवसहस्त्रनाम पारायण, भरत नाट्यम् यासह विविध उपक्रम राबविले.

संघमतर्फे कुचन हायस्कूल स्कूल येथे भव्य मार्कंडेय चित्रकृती सादर करण्यात आली. भव्य सामुदायिक विष्णुसहस्त्रनाम व शिव सहस्त्रनाम पारायणचा कार्यक्रम पद्मशाली समाजाचे पुरोहित श्री संतोष चन्ना पंतुलू यांच्या अधिपत्याखाली तसेच पुष्पलता संगा, वज्रेश्वरी गाजुल, सत्यवा रवा, सौ. भारती आडम, मीरा आडम, स्वरूपा अलवाल, लक्ष्मी कोडम, विमल कन्ना यांच्या प्रयत्नातून भक्तीमय वातावरणात करण्यात आला. त्यानंतर नृत्य शिक्षक रघुनाथ गड्डम व श्र मोनिका देवनपल्ली यांच्या विद्यार्थ्यांनी भरतनाट्यम नृत्य सादर केले. नर्तक महेश गोली यांच्या भरतनाट्यम नृत्याने कार्यक्रमात रंगत आणली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे हैदराबादचे अखिल भारत पद्मशाली संघमचे राजकीय विभागाचे अध्यक्ष शिवा बोल्ला, तेलंगणा जिल्हा उपाध्यक्ष श्रवण गुर्रम, महिला विभागाच्या उपाध्यक्ष पद्मा बासानी, सरिता वडनाल, तेलंगाना महिला जिल्हाध्यक्षा वरूपा गुंटुक, सेक्रेटरी शशिकला मडूर, सल्लागार सुजाता अर्शनपल्ली, मेडचल जिल्हा अध्यक्षा प्रवलिका बोम्मा, ग्रेटर हैदराबादचे अध्यक्ष राकेश चिन्नी उपस्थित होते.

त्यांचा सत्कार अखिल भारत युवजन संघमचे अध्यक्ष श्रीनिवास संगा व सचिव महेश जिंदम ड. संदीप संगा, श्री प्रतिष्ठानचे संतोष संगा व अमर बोडा, अशोक सामल, तुषार जक्का, सचिन कामुनी, अंबादास कुडक्याल, किसन पासकंटी यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन बालाजी श्रीचिप्पा यांनी केले.

# हर घर तिरंगा थीमवर रांगोळी स्पर्धेस प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या हर घर तिरंगा मोहिमेच्या अंतर्गत आज महापालिका कॉन्सिल हॉल आवारात आयोजित रांगोळी स्पर्धेत विविध बचत गटातील ५५ महिलांनी सहभाग नोंदवला. हर घर तिरंगा या थीमवर महिलांनी तिरंगा राष्ट्रध्वज, स्वातंत्र्य संग्रामातील महत्त्वपूर्ण प्रसंग, राष्ट्रनायकांचे चित्र, देशभक्तीपर संदेश अशा विविध विषयांवर कलात्मक रांगोळ्या साकारल्या.



यावेळी सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी कॉन्सिल हॉल येथील रांगोळी स्पर्धेच्या ठिकाणी भेट दिली. याप्रसंगी अतिरक्त आयुक्त रवी पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, महापालिका शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी यांची उपस्थिती होती. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महापालिकेचे समुदाय संघटक प्रियांका इंगळे, शशिकांत वाघमारे, अरविंद महाले, वसिम शेख यांच्यासह सर्व संघटक यांनी परिश्रम घेतले. या स्पर्धेचे परीक्षण आसावरी गांधी यांनी केले.

# जीवनदान देणा-या नातलगांचा योगीन गुर्जरांकडून सन्मान

**▸▸ श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि पद्मशाली सखी संघमचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

देहदान, नेत्रदान व अवयवदान यामध्ये ढोबळ स्वरुपात तीन भाग आहेत. अवयवदान व देहदान -नेत्रदान यामध्ये फरक आहे. देहदान हे नैसर्गिक मृत्यू झाल्यावरच केले जाते. सदरच्या व्यक्तीला कुठल्याही प्रकारच्या शस्त्रक्रिया केली नसावी. तसेच गंभीर स्वरुपाचे आजार किंवा कँसर वैगेरे असू नयेत. अशा व्यक्तीचेच देहदान संबंधित यंत्रणेकडून स्वीकारले जाते. त्याचबरोबर नेत्रदानही मृत्यूनंतरच डोळे संपूर्ण न काढता केवळ वीस मिनिटात विशिष्ठ प्रकारात काढून एका मृत व्यक्तीचे किमान चार गरजू व्यक्तींना नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने लावतात. यासंदर्भात तज्ञ डॉक्टर्स सोलापूरात मोजकेच आहेत. त्यापैकी डॉ. तन्वांगी जोग आहेत. अवयवदान हे मेंदू मृत (ब्रेन डेथ) झालेल्या




व्यक्तीचेच केला जातो. यासंदर्भात समाजामध्ये समज - गैरसमज आहेत. याची माहिती प्रत्येकांने घेऊन या संदर्भात चळवळ उभे करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन देहांगदान जीवनदान समाजसेवी संस्था व दधिची अवयवदान प्रचारक संघ या संस्थेचे सक्रीय कार्यकर्ते योगीन गुर्जर यांनी केले आहे.

१३ ऑगस्ट रोजी जागतिक अवयवदान दिन म्हणून साजरा करतात. याचे औचित्य साधून, सोलापूरातील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि पद्मशाली सखी संघमच्या वतीने आयोजित केलेल्या उपक्रमात जीवनदान देणा-या नातलगांचे सन्मान कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर जोग नेत्रपेढीच्या डॉ. तन्वांगी जोग, वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, अरविंद चिनी, फाउंडेशनचे उपाध्यक्ष नागेश सरगम, सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम यांची उपस्थिती होती. गुर्जर पुढे बोलताना म्हणाले, मेंदू मृत झाल्यास किंवा व्हेंटीलेटरवर असलेल्या व्यक्तीचेच अवयवदान करण्यात येत असल्याने मृत व्यक्तीचे इच्छा किंवा कुटूंबाचा निर्णय असल्यास रितसर पध्दतीने करण्यात येतो.

यावेळी जोग नेत्रपेढीच्या डॉ. तन्वांगी जोग म्हणाल्या, पैशांने श्रीमंत असण्याची आवश्यकता नाही, फक्त मनाने श्रीमंती आणि दान देण्याचे भाव असणे फार महत्वाचे आहे. म्हणून नेत्रदान, अवयवदान व देहांगदान हे सध्याच्या परिस्थितीत काळाची गरज आहे. कुटुंबातील सदस्यांचे सत्काराचे कार्यक्रम हे स्तुत्य उपक्रम आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सखी संघमच्या समन्वयिका कला चन्नापट्टण यांनी केले. फाउंडेशनचे उपाध्यक्ष नागेश सरगम यांनी आभार मानले.

शुक्र.१५ ऑगस्ट सायं.७ वा.
हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
महाराष्ट्र शासनाच्या अनुदानास पात्र नाटक
रंगनील निर्मित
सौ.कल्पना विलास कोठारी सादर करीत आहे
गोष्ट तिच्या घटस्फोटाची!
That's The Spirit

लेखक- डॉ.नरेश नाईक दिग्दर्शक- राजन ताम्हाणे
सूत्रधार- गोट्या सावंत ९८६९४ ३८८८७
अदिती देशपांडे, संग्राम समेळ, राजन ताम्हाणे
तिकीट फोन बुकींग संपर्क
गुरु वठारे 9011474400

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## हरिभाई देवकरण प्रशालेत राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा



**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**
येथील हरिभाई देवकरण प्रशालेत राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी मुख्याध्यापिका दीपा फाटक, पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, पर्यवेक्षक गणेश नेवरे आणि पर्यवेक्षक डॉ. मारुती शहाणे यांच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगानाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक ग्रंथपाल महारुद्र कते यांनी केले. तसेच ग्रंथपाल सौरभ कुलकर्णी यांनी भारतीय राष्ट्रीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगानाथन यांच्या जीवनकार्याचा आढावा सादर करून उपस्थितांचे आभार मानले.



## ▶▶ महत्वाचे...

### झटापटीत चाकू लागून एकजण जखमी

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**
चाकूने मारण्याचा प्रयत्न करताना झालेल्या झटापटीत चाकू लागून एकजण जखमी झाला आहे. हा प्रकार जय मल्हार नगर परिसरात घडला. याप्रकरणी अश्वजीत विजयकुमार व्हटकर (वय ३७, रा. क्षिरसागर नगर, बार्शी रोड, बाळे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलिसात सुरेश बोराडे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता आरोपी हा हातात चाकू घेऊन फिर्यादीला शोधत होता. फिर्यादीला ही बाब माहित झाल्याने तोच जय मल्हार नगर येथे गेला. आरोपीने फिर्यादीला 'तुझ्या भावाने तुझी पत्नी घेऊन गेला आहे, तिला परत आण' असे म्हणत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. फिर्यादीने त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने कंबरेला लावलेला चाकू काढून मारण्यासाठी उगारला. मात्र, फिर्यादीने त्याचा हात पकडल्याने झटापट झाली. या झटापटीत आरोपीच्या हातातील चाकू फिर्यादीच्या डाव्या हाताच्या मनगटाजवळ खरचटून जखम झाली. पोलिसांनी संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेत वृद्ध जखमी

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**
अक्कलकोट रोड परिसरात दुचाकी स्वाराने दिलेल्या धडकेत ७५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकास गंभीर दुखापत झाली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांत दुचाकीस्वार सागर सोनटक्के (रा. मु. पो. रामपूर, ता. दक्षिण सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. फिर्यादी अयान समद पिरजादे (वय २०, रा. संगम नगर, मुळेगाव रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ९ ऑगस्ट रोजी मणिधरनी रेसीडेन्सी परिसरात त्यांचे आजोबा याहीहीन पिरजादे (वय ७५) हे पायी चालत रस्ता ओलांडत होते. त्याचवेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील दुचाकी (क्र. -१४ -५३३२) ही अतिवेगाने व निष्काळजीपणे चालवून त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात याहीहीन पिरजादे हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातात दुचाकीस्वार सागर सोनटक्केही जखमी झाला आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली आहे. हवालदार अटक तपास करत आहेत.

### पाठलाग करून शाळकरी मुलीचा विनयभंग

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**
शाळकरी मुलीचा पाठलाग करून विनयभंग केल्याची घटना घडली याप्रकरणी आरोपी विरुद्ध फौजदार चावडी पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.याबाबत पीडितच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून वैभव उर्फ सोनू सदाशिव कमले ( रा सोलापूर) विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यातील पिडीता ही शहरातील एका शाळेत शिक्षण घेत आहे. साधारण एप्रिल २०२५ पासून आरोपी पीडीत पाठलाग करत आहे. तू मला आवडत असल्याने मी तुझ्याशी लग्न करणार असे म्हणून पीडितेच्या मनाला लज्जास्पद वाटेल असे तो कृत्य करीत होता. याबाबत कोणास काही सांगितलेस लहान बहिणीच्या अंगावर गाडी घालतो तसेच पीडितेच्या नातेवाईकांाही बघून घेण्याची धमकी दिली.

### जादूटोणाविरोधी जनजागृतीसाठी समितीची बैठक संपन्न

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**
जिल्हास्तरावर जादूटोणाविरोधी जनजागृती प्रचार-प्रसार कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी गठीत समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी सूचित केले की, पात्र अर्जदारांना पुढील बैठकीस चर्चेसाठी बोलविण्यात यावे. त्यांच्या पात्रतेची सविस्तर माहिती घेऊन अंतिम प्रस्ताव शासनास सादर केला जाईल. यावेळी सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे म्हणाले, समितीसाठी प्राप्त ८पैकी ६ अर्जदारांची चारित्र्य पडताळणी पूर्ण झाली असून, उर्वरित दोघांची प्रक्रिया सुरू आहे. पात्र सदस्यांची निवड करून शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. जादूटोणा, अघोरी प्रथा व अमानुष रूढींच्या विरोधात जनजागृतीसाठी शासनाच्या अधिनियमानुसार समाजातील शोषण व छळ थांबविण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. शासन निर्णयानुसार समितीची पुनर्रचना करण्यात आली असून, तिच्या माध्यम तून जिल्हास्तरावर जनजागृती कार्यक्रमांची अंम लबजावणी व देखरेख केली जात आहे.

# सोलापूर-पुणे-मुंबई विमानसेवेचा मार्ग मोकळा

**● व्हायबिलिटी गॅप फंडिंग देण्यास राज्य मंत्रीमंडळाची मंजुरी**
**● पालकमंत्री गोरे यांच्या पाठपुराव्याला यश**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**
बऱ्याच वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या सोलापूर मुंबई विमानसेवेचा मार्ग मोकळा झाला आहे. मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सोलापूर-पुणे-मुंबई विमानसेवेकरीता व्हायबिलिटी गॅप फंडिंग देण्यास मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

सोलापुरात मोठ्या प्रमाणावर रोजगार येण्याकरिता सोलापूर शहराला मुंबई, बेंगलोर, दिल्ली अशा मोठ्या शहरांमध्ये विमानसेवा सुरू होणे आवश्यक असल्याची मागणी वारंवार होत होती. परंतु सोलापूर- मुंबई-सोलापूर विमानसेवा नसल्याने अनेक उद्योजकांची प्रचंड अडचण होत होती. उद्योजक सोलापुरात येण्यास तयार असूनही केवळ विमानसेवा नसल्यामुळे यात अनेक अडथळे येत होते. यावर उपाय म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोलापूर-मुंबई- सोलापूर विमानसेवा सुरू होण्याची मागणी लावून धरली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोलापूर दौऱ्यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विमानतळावर भेट घेऊन याबाबत पुन्हा चर्चा केली होती.

यानंतर सोलापूर-मुंबई-सोलापूर विमानसेवा लवकरच सुरू करू, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सोलापूरकरांना दिले होते. यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून विमानसेवेबाबत प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून राज्य मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत व्हायबिलिटी फंड देण्याचा निर्णय झाल्यामुळे सोलापूर मुंबई विमानसेवेच्या प्रयत्नांना मूर्त स्वरूप आले आहे. राज्य शासनाच्या या महत्वपूर्ण निर्णयामुळे लवकरच सोलापूर मुंबई विमानसेवा सुरू होणार आहे.

**● काय आहे व्हायबिलिटी गॅप फंडिंग ?**
विमानसेवा कायमस्वरूपी सुरू रहावी आणि प्रवाशांच्याअभावी विमानसेवा देणाऱ्या कंपनीकडून ती बंद होऊ नये याकरिता राज्य शासनाकडून संबंधित विमान कंपनीला प्रत्येक तिकिटामागे देण्यात येणाऱ्या ठराविक रकमेला व्हायबिलिटी गॅप फंडिंग म्हणण्यात येते.

**● सरकारचे बूस्ट; १८ कोटींची तरतूद**
अपुरे प्रवासी आणि वाढत्या खर्चामुळे सोलापुरातील रखडलेल्या विमानसेवेला राज्य सरकारकडून मोठे बूस्ट मिळाले. सोलापूर-पुणे-मुंबई हवाई मार्गासाठी उडान योजनेच्या धर्तीवर एक वर्षासाठी प्रति आसन व्यावहारिक तूट (व्हायअबिलिटी गॅप फंडिंग- व्हीजीएफ) निधी म्हणून वर्षभरासाठी प्रत्येक सीटमागे ३,२४० रुपये मिळणार असल्याने प्रवाश्यांना विमान तिकिटाचा भुर्दंड कमी होणार आहे. केंद्र शासनाने सामान्य नागरिकांना विमान प्रवास परवडेल यादृष्टीने उडान (रिजनल कनेक्टिव्हिटी स्किम) योजना सुरू आहे. त्यानुसार ही योजना लागू होईपर्यंत वर्षभरासाठी प्रति आसन ३ हजार २४० रुपये दराने (शंभर टक्के व्हिजीएफ) व्यावहारिकता तूट म्हणून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. या निर्णयानुसार सोलापूर-मुंबई आणि सोलापूर-पुणे या हवाई मार्गासाठी स्टार एअर कंपनीस दर आसनामागे हा व्यावहारिक तूट निधी उपलब्ध करून देण्यात येईल. यकरीता १७ कोटी ९७ लाख ५५ हजार २०० रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. या विमानतळासाठी उडान योजना लागू झाल्यानंतर शासनाकडून देण्यात येणारा हा निधी बंद करण्यात येईल व केंद्र शासनाच्या उडान योजनेप्रमाणे २० टक्के व्यवहारिकता तूट (व्हिजीएफ) देण्यात येणार आहे.

## शरणु हांडे अपहरण प्रकरण; सुरवसेसह सातजणांना न्यायालयीन कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट -**
भाजप आमदार गोपीचंद पडळकर समर्थक शरणू हांडे अपहरणप्रकरणी एम आयडीसी पोलिसांनी अटक केलेल्या सात आरोपींना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

अमित म्हाळाप्पा सुरवसे (वय २९, रा. मणिधारी सोसायटी, अक्कलकोट रोड, सोलापूर), सुनिल भिमाशंकर पुजारी (वय २०, रा. साईबाबा चौक, सेलापूर), दिपक जयराम मेश्राम (वय २३, रा. लोकमंगल हॉस्पीटलजवळ, आशा नगर, सोलापूर), अभिषेक गणेश माने (वय २३, रा. एकता नगर, सोलापूर), राकेश भिमाशंकर कुदरे (वय २१, रा. मुमताज नगर, सोलापूर), श्रीकांत बाबूराव सुरपुरे (वय २४, रा. सिध्दारमेश्वर नगर, एमआयडीसी, सोलापूर), समर्थ वासुदेव भैरी (वय १९, रा. निलम नगर, सोलापूर) अशी न्यायालयीन कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. याबाबत विष्णु शिवराया हांडे (वय ३५, रा. साई नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर शरणु शिवराया हांडे (वय ३६) असे अपहरण करून जखमी करण्यात आलेल्या पडळकर समर्थकाचे नाव आहे.

आरोपी अमित सुरवसे याने २०२१ साली गोपीचंद पडळकर यांच्या गाडीवर दगडफेक केली होती. याचा बदला म्हणून मे महिन्यात शरणु हांडे याने अमित सुरवसे याला मारहाण केली होती. या मारहाणीचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात वायरल झाल्यानंतर शरणु हांडे आणि अमित सुरवसे यांनी वाद मिटवून घेतला होता. पण अमित याने याच मारहाणीचा आणि अपमानाचा बदला घेण्यासाठी आपल्या मित्राच्या मदतीने शरणु याचे ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास साई नगर येथील राज बिअर शॉपी येथून एमएच १२ एक्सएक्स ६५४७ क्रमांकाच्या कारमधून अपहरण केले. शहर पोलिसांनी तात्काळ हालचाल करून कर्नाटकातील होर्तीजवळून ताब्यात घेऊन हांडेंची सुटका केली. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्ह्यात वरील सात आरोपींना अटक करण्यात आली होती. या सर्व आरोपींना न्यायालयाने मंगळवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. त्यामुळे सर्व आरोपींना मंगळवारी पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. पोलिस निरीक्षक विजय खोमणे तपास करीत आहेत.

## पुन्हा नियुक्ती मिळालेल्या आरोग्य अधिकाऱ्याच्या विरोधात कामती येथे आंदोलनाची तयारी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**
वारंवार तक्रारी करून सुद्धा कामती येथील आरोग्य अधिकाऱ्याला जिल्हा आरोग्य अधिकारी पाठीशी घालत आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी आणि कामती येथील आरोग्य अधिकारी यांची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्यात यावी अन्यथा समस्त ग्रामस्थांना घेऊन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करणार इशारा सामाजिक कार्यकर्ते माऊली हेगडे यांनी दिला आहे.

अनेक तक्रारी असताना देखील कामती येथील आरोग्य अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रकार सुरू आहे. वारंवार गैरहजर राहणाऱ्या आरोग्य अधिकाऱ्याची बदली करणे किंवा त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित असताना आरोग्य विभागाकडून त्या आरोग्य अधिकाऱ्याला त्याच ठिकाणी ठेवले जात असल्याने कामती आणि हराळवाडी येथील नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.




**जिल्हा आरोग्य विभागाकडे अहवाल पाठविला**
वरिष्ठांच्या आदेशानुसार संबंधित महिला डॉक्टरचा अहवाल जिल्हा आरोग्य विभागाकडे पाठवण्यात आला आहे.कामती आरोग्य केंद्रात असणाऱ्या दोन्ही डॉक्टरांना कामाचं वेळापत्रक बनवून देण्यात आला आहे.नेमून दिलेल्या वेळेत कामात हलगर्जीपणा केला तर तसा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात येईल.
**- डॉ.अरुण पाथरूडकर,** तालुका आरोग्य अधिकारी मोहोळ

जून मध्ये घडलेल्या घटनेला आता तीन महिने उलटले मात्र कारवाई न करताच तो अहवाल जिल्हा आरोग्य विभागाकडून दाबला जात आहे. जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून घालून दिलेले नियम कामती येथील प्राथमिक केंद्रातील आरोग्य अधिकारी पायदळी तुडवत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. तात्काळ अशा उद्धट अधिकाऱ्याची नियुक्ती रद्द करावी अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. अन्यथा सोलापूर जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याच्या दालनात आंदोलन करण्याचा इशारा ग्राम स्थांकडून देण्यात आला आहे.

**जन आंदोलन उभे केले जाईल**
कामती येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकाऱ्याच्या मनमानी विरोधात अनेक लेखी आणि तोंडी तक्रारी ग्रामपंचायतीकडे प्राप्त झाल्या आहेत.त्या अनुषंगाने आम्ही जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याकडे ग्रामपंचायतीने लेखी तक्रार दिली होती.कामती येथील आरोग्य अधिकाऱ्यांवर कारवाई ऐवजी त्यांना पुन्हा कामती येथेच नियुक्त केल्याचे आम्हाला सम जले असून या विरोधात आम्ही वरिष्ठ स्तरावर दाद मागणार आहे.प्रसंगी जन आंदोलन उभे केले जाईल.
**- अंजली प्रवीण भोसले,** सरपंच कामती ग्रामपंचायत






# तिरंगा प्रभात फेरीद्वारे विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी केला देशभक्तीचा जागर

**▶▶ प्रत्येकाने घरावर तिरंगा राष्ट्रध्वज लावावा : अतिरिक्त आयुक्त रवी पवार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**
भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमि त्ताने सोलापूर महानगरपालिका आणि शहरातील ज्ञान प्रबोधनी प्रशाला, सेवा सदन प्रशाला, छत्रपती शिवाजी प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी विविध शाळांच्या वतीने तिरंगा प्रभात फेरी काढण्यात आली.

यामध्ये मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रत्येक नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा राष्ट्रध्वज फडकवावा, असे आवाहन यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले. सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या वतीने तिरंगा प्रभात फेरी काढण्यात आली. हर घर तिरंगा मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आज सोलापूर महापालिका आणि शहरातील ज्ञान प्रबोधनी प्रशाला, सेवा सदन प्रशाला, छत्रपती शिवाजी प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने एका भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचा समारोप महानगरपालिकेच्या प्रांगणात करण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त रवी पवार , उपायुक्त तैमूर मुलाणी , क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे,पर्यावरण व्यवस्थापक स्वप्नील सोलनाकर आणि आरोग्य विभागाचे डॉ. वाळवेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शहरातील प्रमुख रस्त्यांवरून काढलेल्या या तिरंगा प्रभात फेरीच्या माध्यमातून हर घर तिरंगा या उपक्रम द्वारे राष्ट्र अभिमान आणि राष्ट्रप्रेम यांचा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यात आला. या रॅलीमध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**राष्ट्र प्रेमाविषयी विद्यार्थ्यांनी केली प्रेरक भाषणे**
लोकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता निर्माण करणे, देशभक्तीची भावना जागृत करणे आणि राष्ट्रध्वजासोबत प्रत्येक नागरिकाचा वैयक्तिक बंध जोडणे, या उदात्त उद्देशाने या फेरीचे आयोजन करण्यात आले होते. यात तिन्ही प्रशालांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत राष्ट्रप्रेमाचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी यावेळी देशभक्तीपर समूहगीत सादर केले. राष्ट्र प्रेमाविषयी प्रेरक भाषणेही दिली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी विद्यार्थ्यांना देशाचा राष्ट्र ध्वज व निर्मिती बद्दल तसेच ''हर घर तिरंगा'' उपक्रमाबद्दल माहिती दिली. सर्वांना १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आपल्या घरावरती देशाचा राष्ट्रध्वज लावण्याचे आवाहन केले.



## विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून घरफोडी; ४ गुन्हे उघडकीस

**४ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट -**
येथील आयुक्तालयातील शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेऊन त्याच्याकडून घरफोडीचे ३ व दुचाकी चोरीचा १ गुन्हा उघडकीस आणला. या बालकाच्या ताब्यातून पोलिसांनी ४ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

शहर गुन्हे शाखेकडील सहायक पोलिस आयुक्त निलेश सोनवणे-पाटील यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिस पथकाने एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेऊन घरफोडीच्या गुन्ह्याच्या अनुषंगाने त्याच्याकडे चौकशी केली. त्यावेळी त्याने विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीचे तीन व दुचाकी चोरीचा एक गुन्हा केल्याचे कबुल केले. पोलिसांनी या बालकाच्या ताब्यातून ३२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम १ लाख ११ हजार ५५० रुपये, २० हजार रुपये किंमतीची मोटारसायकल, गुन्हा करण्यासाठी वापरलेली २ लाख रुपये किंमतीची कार असा ४ लाख ५९ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या बालकाकडून एमआयडीसी पोलिस ठाण्यातील दोन, फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील एक आणि जेलरोड पोलिस ठाण्यातील एक गुन्हा उघडकीस आला आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक निलेश सोनवणे-पाटील, पोलिस अंमलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, बाळासाहेब काळे, सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## मुक्तीचे साधन काय? : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

मानवी जीवनाचा परम पुरुषार्थ म्हणजे मोक्ष ; हीच खरी मुक्ती. मृत्युसमयी मनुष्याने काय करावे? काय ऐकावे? काय त्यागावे? अशा गंभीर प्रश्नांची उकल राजा परीक्षिताने शुकाचार्यांना विचारली, असे श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावरील प्रवचनमालेच्या १८व्या सत्रात सांगितले. भीष्माचार्यांनी आपल्या अखेरच्या क्षणी हस्तिनापुराच्या राजा धर्मराजाला उपदेश केला - 'मानव समाजाच्या उन्नतीसाठी नीतीने वागा, धर्माचे पालन करा, शुद्ध आचरण ठेवा.' धर्मराजाने हा उपदेश आयुष्यभर जोपासला. त्याच्या उत्तम राज्य कारभारामुळे प्रजा आनंदी होती. म्हणूनच त्याला अजातशत्रू हे बिरुद लाभले. भीष्माचार्य बीजधामाला पोहोचताच भगवान श्रीकृष्ण द्वारकेला जाण्यास निघाले. तेवढ्यात उत्तरा भयभीत होऊन त्यांच्या चरणी धावून आली, 'प्रभु, अश्वथाम्याने माझ्यावर ब्रह्मास्त्र सोडले आहे. त्यामुळे पांडवांचा वंशच संपुष्टात येईल!' उत्तरा ही अर्जुनाचा वीरपुत्र अभिमन्यूची पत्नी, आणि त्यावेळी गर्भवती होती. तिच्या गर्भातील बाळच म्हणजे पांडवांचा शेवटचा वंशज होता. भगवंताने तिला धीर देत सांगितले, 'शांत हो, काळजी करु नकोस. आता तुझ्या पोटात दोन जीव आहेत. एक तुझा गर्भ आणि दुसरा मी स्वतः. ब्रह्मास्त्र तुला स्पर्शही करु शकणार नाही.' अश्वथामाच्या मस्तकावरील मणी काढून, मरणापेक्षाही घोर अपमान करीत अर्जुनाने त्याचा पराभव केला. तोच गर्भातील बालक पुढे परीक्षित राजा झाला. जन्मतःच भगवंताचे दर्शन झालेले असल्याने तो सदैव भक्तिभावाने भारावलेला होता. परंतु, शिकारीस जाताना त्याने पूर्वज जरासंधाचा मुकुट परिधान केला. जरासंध दुष्ट प्रवृत्तीचा असल्याने त्या संगतीच्या स्पर्शाने परीक्षिताची वृत्ती आकस्मिक बदलली. यावेळी, डॉ.जयवंत महाराजांनी श्रोत्यांना मार्गदर्शन केले, 'संगती मनुष्याला उन्नतीकडे नेऊ शकते किंवा पतनाकडे ढकलू शकते. दुष्ट संगती ही मृत्यूसारखे विघ्न ओढवते; सज्जन संगत ही मुक्तीचा मार्ग दाखवते.' त्या दुष्ट जरासंधाच्या मुकुटाच्या ऊर्जेचे प्राबल्य परिक्षिताच्या कृतीवर होऊन ध्यानमग्न असलेल्या एका ऋषीने पाणी न दिल्याने रागाने त्याने मेलेला साप त्या ऋषींच्या गळ्यात ठेवला. नंतर अपराधाची जाणीव झाली, पण तोवर उशीर झाला होता. त्या ऋषीपुत्राने शाप दिला, सात दिवसांत सर्पदंशाने तुझे मरण होईल! आपल्याकडून झालेल्या पापासाठी प्रायश्चित्त म्हणून परीक्षित राजाने गंगेच्या तीरावर उपोषणास बसण्याचा निर्णय घेतला. तेथेच शुकाचार्य आगमन झाले आणि मृत्यू समीप असताना परीक्षिताने त्यांना मुक्तीच्या मार्गाविषयी प्रश्न विचारले. याच उत्तरांतून प्रकटणारे अमृतमय उपदेश म्हणजेच भागवत कथा ! जीवनाला पवित्र करणारे, मुक्तीचा मार्ग दाखवणारे, असे डॉ. जयवंत महाराज श्रोत्यांसमोर मांडतात. राजा परिक्षितने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे उद्याच्या सत्रात मिळतील.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - १८

## मंद्रुपमध्ये घाणीचे साम्राज्य; पथदिवे बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

पंधरा दिवसापासून मंद्रूपमध्ये संततधार पाऊस सुरू आहे. यामुळे सर्वत्र चिखलामुळे दलदलीचे साम्राज्य दिसून येत आहे. तर दुसरीकडे मुख्य रस्त्यांसह गावातील अनेक पथदिवे बंद पडल्यामुळे अंधार असल्यामुळे चोरांचा सुळसूळाट वाढला आहे. ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे नागरीकांना त्रास सहन करावे लागत आहे.

मंद्रूपमध्ये २५ हजार लोकसंख्या इाहे. दिवसेंदिवस हद्दवाढ भाग वाढत आहे. गावातील नागरीकांनाच सोयी सुविधा मिळत नसल्याने हद्दवाढ भागातील नागरीकांनी पाणी, वीज व रस्त्याबाबत अपेक्षा ठेवणे व्यर्थ आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेचा गाजावाजा करण्यात येत असले तरी प्रत्येक नागरीकांला मुबलक पाणी मिळण्यास आणखी कालावधी जाणार आहे. मूलभूत सोयीसूविधा पुरविण्यात मंद्रूप ग्रामपंचायत अपयशी ठरत आहे. पंधरा दिवसापासून मंद्रूपमध्ये संततधार पाऊस सुरू आहे. यामुळे मुख्य रस्त्यावर व इतर वॉर्डात दलदलीमुळे घाणीचे साम्राज्य वाढले आहे. शिवाय ऐन पावसाळ्यातपथदिवे बंद पडल्याने सर्वत्र अंधार दिसून येत आहे. ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे पथदिवे बंद असल्याने विषारी प्राण्यांचा प्रादुर्भाव वाढला आहे. विषारी साप दंश रूग्ण वाढत आहेत. शिवाय तीन आठवड्यापासून हद्दवाढ भागात चोरीचे प्रमाण वाढले आहे. समर्थ नगर येथे चोरट्यांनी सोने लंपास केला आहे.पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर अंधारामुळे चोर गरयब होत आहेत. ग्रामपंचायतीचे निष्क्रिय पदाधिकारी मात्र मूग गिळून गप्प आहेत. ग्रामपंचायतीच्या मनमानी काराभाराबद्दल नागरीकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.



### मूलभूत हक्कांपासून नागरिक वंचित

पाणी, वीज व रस्ता ही नागरीकांचे मूलभूत हक्क आहेत. ग्रामपंचायतीच्या निष्क्रियतेमुळे नागरीकांना या मूलभूत हक्कांपासून नागरीक वंचित राहावे लागत आहे. वॉर्डातील समस्या सांगितल्यानंतर ग्रामपंचायतीमध्ये पैसा नसल्याच सांगण्यात येते. मोठया प्रताणात कर भरूनही दुर्दैवाने सोयी सुविधा मिळत नाहीत.

- चिदानंद मुगळे, नागरिक, मंद्रूप

## जेलरोड पोलीसांच्या ताब्यातील वाहनांचा लिलाव २२ ऑगस्टला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापुर, दि. १२ ऑगस्ट-**

जेलरोड पोलिसांकडून जप्त करण्यात आलेली नागेश भिक्षापती यांच्याकडून सुझुकी कंपनीची एम एच १३ डीयु ३४३७ क्रमांकाची दुचाकी जप्त करण्यात आली आहे. न्यायालयाने वाहनाची जप्ती वॉरंट काढला असून त्यानुसार शुक्रवारी २२ ऑगस्ट रोजी जेलरोड पोलिस स्टेशन येथे लिलाव करण्यात येणार आहे.

तरी इच्छुकांनी लिलावात सहभागी होण्याचे आवाहन जेलरोड पोलिस तसेच जेलरोड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक एम.एम. मोरे यांनी केले आहे.

## गावाला जातो म्हणत घरातून निघालेले मुरलीधर वेन्नु बेपत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापुर, दि. १२ ऑगस्ट-**

न्यू पाच्छा पेठ येथील मुरलीधर नरसण्णा वेन्नु (वय ५९) हे १५ मे रोजी दुपारी गावाला जातो असे सांगून घरातून निघून गेले.

घरातील सदस्यांना त्यांनी पुढील काहीही कळविले नाही. त्यांच्या पत्नी हेमावती वेन्नु यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. घटनेनंतर पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली आहे. मुरलीधर वेन्नु यांचा शोध लागल्यास जेलरोड पोलीस स्टेशन ०२१७-२७४४६३१ किंवा ९७६४००३३०२ या क्रमांकावर संपर्क साधावा. नागरिकांनी माहिती मिळताच तात्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जीएसटी वकीलाच्या जामीन आदेशातील १० कोटी भरण्याची अट सत्र न्यायालयाकडून रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

येथील रहिवासी व जी एस टी सल्लागार वकील साजिद अहमद शेख (वय ४६, रा. सोलापूर) यास सुमारे ४४ कोटी रुपयांचा जी एस टी कर बुडविल्याच्या गुन्ह्यात कोल्हापूर येथील न्यायदांडाधिकारी कोर्टाने घातलेली १० कोटी रक्कम कोर्टात जमा करण्याची अट सत्र न्यायालयातील अति. सत्र न्यायाधीश शैलेंद्र तांबे यांनी रद्द करण्याचे आदेश दिले.

सोलापूर येथील जी एस टी सल्लागार वकील साजिद अहमद शेख याने, प्रत्यक्षात वस्तूंची विक्री न करताच बनावट बिलांच्या आधारे कर चोरी केल्याचा संशय होता. सदर आरोपीने शासनाची गेल्या चार वर्षापासून कर चोरी करून फसवणूक केल्याप्रकारणी २२ मे २०२५ रोजी अटक केली होती. सदरकामी आरोपीने कोल्हापूर येथील न्यायदंडाधिकारी कोर्टात जामीन अर्ज दाखल केला होता. सदरचा जामीन अर्ज १० कोटी रक्कम कोर्टात जमा करण्याचा तसेच इतर अटी व शर्तीवर मंजूर केला होता.

सदर १० कोटी रक्कम भरण्याच्या अटी विरुद्ध आरोपीने कोल्हापूर येथील सत्र न्यायालयामध्ये अपील दाखल केले. या अपीलाच्या सुनावणी वेळी आरोपीच्या वकिलांनी, सदर अट कायाद्यास व नैसर्गिक न्याय तत्वास धरून नाही असा युक्तीवाद केला. याकामी सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर केले त्याविरुद्ध आरोपीच्या अट शिथिल करण्याच्या अर्जास सरकारी वकिलांनी तीव्र विरोध केला. तथापि आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून सत्र न्यायालयाने आरोपीस १० कोटी रुपये भरण्याची प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्टाची अट रद्द करुन आरोपीस रुपये ५० हजार रुपयाच्या जात मुचलक्याच्या जमिनीवार सोडण्याच्या आदेश दिला.

या प्रकरणात सरकारतर्फे विशेष सरकारी वकील ॲड. शेखर टोणपे यांनी तर आरोपीतर्फे यांचेतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. देवदत्त बोरगावकर, ॲड.प्रसाद अग्निहोत्री, ॲड. आदित्य अदोने यांनी काम पहिले.

## विजयपूर-बागलकोट विभागात दुहेरीकरणाचे काम

### मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात धावणाऱ्या गाड्यांवर परिणाम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

दक्षिण पश्चिम रेल्वेच्या हुब्बळ्ळि विभागातील विजयपूर-बागलकोट विभागात दुहेरीकरणाच्या कामासाठी रेल्वे विशेष वाहतूक आणि पॉवर ब्लॉक चालवत आहे. त्यामुळे मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात जाणाऱ्या गाड्यांवर परिणाम होतील.

ट्रेन क्रमांक १६५३५/१६५३६ मैसूर-पंढरपूर गोलगुंबज एक्सप्रेस या १८/१९.०८.२०२५ ते २२/२३ ऑगस्ट २०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत. ट्रेन क्रमांक ११९३९/११९४० छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-होसपेटे एक्सप्रेस या १८/१९.०८.२०२५ ते २२/२३ ऑगस्ट २०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत. ट्रेन क्रमांक १६२१८ साईनगर शिर्डी-मैसूर साप्ताहिक एक्सप्रेस या २० ऑगस्ट २०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत. ट्रेन क्रमांक १७३२४ बनारस-हुब्बळ्ळि साप्ताहिक एक्सप्रेस या १७ ऑगस्ट २०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत या गाड्या अलमट्टि येथे थांबणार नाहीत.

ट्रेन क्रमांक १७३०७/१७३०८ मैसूर-बागलकोट बसवा एक्सप्रेस या १३/१४ ऑगस्ट २०२५ ते २२/२३ ऑगस्ट २०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत. ट्रेन क्रमांक ११९३९/११९४० छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-होसपेटे एक्सप्रेस या १३/१४ ऑगस्ट २०२५ ते २२/२३ ऑगस्ट २०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत या गाड्या विजयपुर येथे कमी वेळाचे टर्मिनेशन करतील. ट्रेन क्रमांक १७३१९/१७३२० हुब्बळ्ळि-हैदराबाद एक्सप्रेस या १५/१६ ऑगस्ट २०२५ ते २२ ऑगस्ट २०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत गदग - होसपेटे - बळ्ळारी - गुंतकल - रायचूर - यरमरस - चिकसुगूर - यदलापूर - कृष्णा - नालवार उत्तर - वाडी मार्गे वळवण्यात आली असुन आलूर ते शाहबाद दरम्यानचे थांबे वगळण्यात आले आहेत. ट्रेन क्रमांक ११४१५/११४१६ सोलापूर-होसपेटे या १४/१५ ते २३/२४ ऑगस्ट २०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत. ट्रेन क्रमांक ५६९०६/५६९०५ हुब्बळ्ळि-सोलापूर या १६/१७ ते २३/२४ ऑगस्ट २०२५ प्रवासा दरम्यानच्या कालावधीत. ट्रेन क्रमांक ५६९०४/५६९०३ धारवाड-सोलापूर या १६/१७ ते २३/२४ ऑगस्ट २०२५ या प्रवासा दरम्यानच्या कालावधीत गाड्या रद्द राहतील.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार
दि. १३ ऑगस्ट २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - श्रावण
तिथी कृ. चतुर्थी (०६.३६)
ऋतु - वर्षा
नक्षत्र - उभाद्रपदा (१०.३२)
योग - धृती (१६.०५)
करण - कौलव (१७.३०)

दिनविशेष - श्री टेंबेस्वामी जयंती, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यदिन

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल.



## लायन्स क्लब, ड्रीम फाउंडेशन आयोजित रक्षाबंधन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटी व ड्रीम फाउंडेशन आयोजित रक्षाबंधन व राखी तयार करणे कार्यशाळेत मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतलेल्या मुलांना, प्रमाणपत्र वाटप करण्यात आल.

ड्रीम फाऊंडेशन कस्तूर बाग हॉऊसिंग सोसायटी येथे राखी पौर्णिमा व रक्षाबंधन व राखी बनविणे प्रशिक्षण देण्यात आले विद्यार्थ्यांना क्लबचे अध्यक्ष लायन मोहन भुमकर, राजेंद्र शालगर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमास यांची उपस्थित एजाज शेख, स्वप्नाली इंगळे, आयेशा शेख, मुजम्मिल शेख, राकेश माळकोटे व लायन क्लबचे अध्यक्ष मोहन भूमकर यांनी मार्गदर्शन केले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## सद्भावना तिरंगा केंद्रास आजपासून प्रारंभ

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य महोत्सवानिमित्त सद्भावना तिरंगा व मिठाई केंद्र दि. १३ ते १५ ऑगस्ट पर्यंत सद्भावना तिरंगा बंगला, हॉटेल सिटी पार्कच्या मागे आणि प्रभात टॉकीज समोरील गांधी ट्रॅक्टर दुकान समोर उपलब्ध राहणार आहे, अशी माहिती सद्भावना सेवा दलाचे प्रमुख दिव्यकांत गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या तिरंगा केंद्रावर तिरंगा ध्वज, ओढणी शेला, टी-शर्ट, पगडी , बॅच यासह १६ नमुन्यांचे तिरंगा वस्तू उपलब्ध आहेत. फायबरची तीन ते ३.५० फुटाची आकर्षक भारत मातेची मूर्तीही इथे उपलब्ध होणार आहे. शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११:३० वाजता मान्यवरांच्या हस्ते भारत माता मूर्तीचे पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर बुधवार दि. २० ऑगस्ट रोजी वंचित, उपेक्षित घटकांना घराघरांमध्ये लाडू वाटप करण्यात येणार आहे. मंगळवार दि. २६ ऑगस्ट रोजी शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी भारतीयोंके अपने त्यौहार के उत्सव दृश्य या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी ध्रुवेश गांधी, सोना गांधी, श्रुती गांधी, स्नेहा गांधी , नारायण छाबरीया, रोशन शेख आदी उपस्थित होते.

## सुफी संत हजरत पीर हाजी अहमद अली शाहबाबा यांच्या उर्स उत्सवानिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

बारा इमाम चौकातील जागृत सुफी संत हजरत पीर हाजी अहमद अली शाह बाबा यांच्या १२३ व्या उर्स उत्सवानिमित्त दिनांक २५ ते २८ ऑगस्ट दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष हाजी मकबूल मोहोळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोमवार दि. २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता संदल मिरवणूक काढण्यात येणार आहे. ढोलीबाजा, बँजो, उंट घोडे, बग्गा यांच्यासह उत्कृष्ट सजावट करून देखावे सादर करण्यात येणार आहेत. ही मिरवणूक बारा इमाम चौक ते पुढे समाचार चौक, माणिक चौक, विजापूर वेस, बेगम पेठ पोलीस चौकी, किडवाई चौक, सोशल हायस्कूल, मौलाना आझाद चौक, मुस्लिम पाच्छा पेठ, जिंदशाह मदार चौक, पद्मशाली चौक, अकबर कासिम मज्जिद समोरून जोड बसवण्णा चौक, रंगा चौक, भारतीय चौक, शनिवार पेठ, पेंटर चौक, विजापूर वेस ते बारा इमाम चौक, दर्गाह पटांगण येथे विसर्जन करण्यात येणार आहे.

मंगळवार दि. २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ ते १० वाजता हजरत शहजादा ए गौसूल आजम पीर सय्यद आले मुस्तफा कादरी अल जीलानी अलिपाशा सरकार यांचे व्याख्यान होणार आहे. दि. २७ आणि २८ ऑगस्ट रोजी महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. यंदाच्या वर्षी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सियान मोहोळकर यांची निवड करण्यात आली आहे तर सरचिटणीसपदी मुखतयार मोहोळकर, कार्याध्यक्ष हाजी अहमदअली मोहोळकर, उपाध्यक्ष शानु मोहोळकर, जॉईंट सेक्रेटरी म. रफिक मोहोळकर, खजिनदार इस्माईल शेख यांची निवड करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेस इकबाल दुर्वेश, बाबा मोहोळकर, सियान मोहोळकर, नवाज मोहोळकर आदी उपस्थित होते.

## शालेय जीवन: विद्यार्थ्यांची पहिली पावले सफलतेच्या वाटेवर

शालेय जीवन ही विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्त्वाची पायरी आहे. या काळात ते नवनवीन अनुभवांना सामोरे जातात, मित्र बनवतात, शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिकतात आणि स्वतःच्या स्वप्नांचा शोध घेतात. शालेय जीवन ही विद्यार्थ्यांसाठी अनेक स्मृती आणि अनुभवांचा काळ आहे. त्यांना पहिल्या दिवशी शाळेत जाण्याची उत्सुकता असते, नवीन मित्र बनवण्याचा आनंद असतो आणि शिक्षकांकडून शिकण्याची इच्छा असते.




विद्यार्थ्यांच्या मनातील स्वप्ने आणि आकांक्षा शाळेतील शिक्षणाच्या माध्यमातून आकार घेतात. ते त्यांच्या भविष्याबद्दलची कल्पना आणि योजना करतात आणि शाळेतील शिक्षणाचा त्यांच्या स्वप्नांवरील प्रभाव समजून जातात. शिक्षकांची भूमिका विद्यार्थ्यांच्या जीवनात खूप महत्त्वाची आहे. ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात, प्रोत्साहित करतात आणि त्यांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी मदत करतात. शालेय जीवनातील सामाजिक दबाव आणि मानसिक आरोग्य हे दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत. विद्यार्थ्यांना शाळेतील सामाजिक दबावाचा सामना करावा लागतो आणि त्याचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

शाळेतील समर्थन प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मदत करते. यामध्ये शिक्षकांचे मार्गदर्शन, मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या संसाधनांचा समावेश होतो.याचा निष्कर्ष असा आहे की,शालेय जीवन ही विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्त्वाची पायरी आहे. या काळात ते नवनवीन अनुभवांना सामोरे जातात, मित्र बनवतात, शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिकतात आणि स्वतःच्या स्वप्नांचा शोध घेतात. शालेय जीवनाचा विद्यार्थ्यांच्या भविष्यावर खूपच जास्त प्रभाव पडतो. ते शाळेतील शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःच्या स्वप्नांचा शोध घेतात आणि त्यांना साकार करण्यासाठी प्रयत्न करतात. शालेय जीवनातील चढ-उतारांना सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी धीर धरावा, स्वतःवर विश्वास ठेवावा आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा.

शालेय जीवन ही विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्त्वाची पायरी आहे. या काळात ते नवनवीन अनुभवांना सामोरे जातात, मित्र बनवतात, शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिकतात आणि स्वतःच्या स्वप्नांचा शोध घेतात.विद्यार्थ्यांचे कुटुंबीय सुद्धा त्यांच्या शालेय जीवनात महत्त्वाची भूमिका बजावतात. पालकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या शिक्षणाचा पाठपुरावा करणे आणि त्यांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांसाठी शालेय जीवनातील संधीमध्ये विद्यार्थ्यांना नवीन विषय शिकण्याची संधी मिळते ज्यामुळे त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रगती करण्याची संधी मिळते.विद्यार्थ्यांना खेळ, कला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेण्याची संधी मिळते ज्यामुळे त्यांना त्यांच्या कौशल्यांचा विकास करण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांना नेतृत्व आणि सामाजिक कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते ज्यामुळे त्यांना त्यांच्या समूहात नेत्यांची भूमिका बजावण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रगती करण्याची संधी मिळते ज्यामुळे त्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि व्यक्तिगत विकासात मदत होते.विद्यार्थ्यांना विद्यार्थी विनिमय कार्यक्रमांमध्ये भाग घेण्याची संधी मिळते ज्यामुळे त्यांना वेगवेगळ्या संस्कृती आणि देशांचा अनुभव घेता येतो आणि त्यांच्या ज्ञान आणि कौशल्यांचा विकास होतो. ह्या संधींचा फायदा घेऊन विद्यार्थी त्यांचे स्वप्न साकार करू शकतात! शालेय जीवन ही विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्त्वाची पायरी आहे ज्यामध्ये त्यांना अनेक संधी मिळतात ज्या त्यांचे स्वप्न साकार करण्यास मदत करतात.विद्यार्थ्यांनी ह्या संधींचा फायदा घेऊन त्यांचे शैक्षणिक आणि व्यक्तिगत विकास करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. शालेय जीवनातील संधींचा योग्य वापर करून विद्यार्थी त्यांचे भविष्य उज्ज्वल बनवू शकतात. विद्यार्थ्यांना शिक्षकांचा मार्गदर्शन, पालकांचा पूर्ण पाठिंबा आणि स्वतःचा प्रयत्न घेऊन त्यांचे लक्ष्य गाठता येतील. शालेय जीवनातील संधींनी विद्यार्थ्यांना त्यांचे स्वप्न साकार करण्यास मदत होईल.



-**दत्तात्रय पोतदार,** मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगर. ता. अक्कलकोट,
जि. सोलापूर

## महत्वाचे...



### अभिनव माध्यमिक विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

येथील अभिनव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सन २०००-२००१ या वर्षी इयत्ता १० वीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा २५ वर्षानंतर स्नेहमेळावा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरुणदादा बारबोले, प्रमुख पाहुणे अशोक बारबोले, विशेष उपस्थिती म्हणून मुख्याध्यापक बजरंग नरोटे, श्रीमती गोरे, श्रीमती ओमन, शिंगण, माळी, प्रा. अंकुश बारबोले, प्रा माने आणि शाळेतील इतर शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना विराज पतंगे यांनी केली. सूत्रसंचालन रामेश्वर चोबे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनानी झाली. यानंतर शिक्षकांचे सत्कार करण्यात आले. अध्यक्ष अरुण बारबोले यांचा सत्कार रवी कुलकर्णी यांनी केला. प्रमुख पाहुणे अशोक बारबोले यांचा सत्कार अमोल मिसाळ यांनी केला. यानंतर माजी विद्यार्थ्यांनी आणलेले दोन व्हाईट बोर्ड शाळेस भेट दिले. सर्व मुला मुलींसाठी अनेक प्रकारचे खेळ घेण्यात आले. देवीदास शिंदे यांनी आभार मानले.

### अनंत चैतन्य प्रशालेत रक्षाबंधन उत्सव

**अक्कलकोट, दि. १२ ऑगस्ट-**

रक्षाबंधनाचा पवित्र उत्सव महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे पार पडला. यावेळी प्रशालेतील पाचवी ते दहावी व



कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी व बारावीच्या मुलींनी प्रशालेतील मुलांना राखी बांधल्या विशेष म्हणजे यातील बहुतांश राख्या या मुलींनी स्वतः बनवल्या होत्या. यावेळी मुलांनीही आपल्या बहिणीला ओवाळणी म्हणून शालेय साहित्य भेटस्वरुपात दिले. प्रशालेचे प्राचार्य अशोक साखरे, पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे व समस्त प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेत्तर बंधूनाही शिक्षिका भगिनींनी राखी बांधली. रक्षाबंधनाचा कार्यक्रम प्रशालेत साजरा केल्याने संस्थेचे अध्यक्ष व आमदार सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते सागर कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सीईओ रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी यांनी कौतुक केले.



### स्वाती जाधव यांच्या 'स्वर्णिम काव्यप्रभा' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**पिलीव, दि. १२ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म ळोलीच्या उपशिक्षिका स्वाती दिलीप जाधव यांच्या स्वर्णिम काव्यप्रभा काव्यसंग्रहाचे प्रकाशन आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यप्रसंगी आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक आनंद बनसोडे, अभियंता शितल नकाते, राष्ट्रपती शौर्य पारितोषिक विजेते एपीआय महारुद्र परजने, माजी गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती माळशिरस सुषमा महामुनी, डॉ. निशिगंधा चव्हाण, प्रसन्न पब्लिकेशनचे संस्थापक,अध्यक्ष नवनाथ धांडोरे, प्रिया धांडोरे, अभिनेते दिपक साठे, शाळा व्यवस्थापन समिती शिवराज जाधव, मळोली पोलीस पाटील ॲड. संतोष पवार, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य विनोद आसबे, अभिजीत शेळवणे उपस्थित होते. तसेच प्रसन्न नवोदय फाउंडेशन यांच्या वतीने स्वाती जाधव यांना दीपस्तंभ आदर्श प्रेरणादायी शिक्षिका पुरस्कार देण्यात आला.



### अर्धनारी नटेश्वर ज्येष्ठ नागरिक संघटनेचा वर्धापन दिन उत्साहात

**वेळापूर, दि. १२ ऑगस्ट-**

वेळापूर येथील विरंगुळा केंद्रात अर्धनारी नटेश्वर ज्येष्ठ नागरिक संघटनेचा सोळावा वर्धापन दिन साजरा झाला. अध्यक्षस्थानी रतन काकुळे होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच रजनीश बनसोडे उपस्थित होते. प्रास्ताविक शिंदे यांनी केले. या सोहळ्यात संघटनेच्या वतीने सर्व ज्येष्ठ नागरिकांना आधाराच्या काठ्यांचे वाटप करण्यात आले. तसेच गावातील विविध शाळांमधील खेळात व अभ्यासात विशेष प्रावीण्य मिळवलेल्या, तसेच दहावी-बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित ज्येष्ठ महिलांनी प्रमुख पाहुण्यांना राखी बांधून बहिणीच्या नात्याने शुभेच्छा दिल्या. यावेळी सरपंच रजनीश बनसोडे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला इंग्लिश स्कूल, ज्युनियर कॉलेज, तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन इंगळे व कुदळे यांनी केले तर आभार जोशी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेलगे आणि माने यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

# जिल्ह्यात १९ मुले शाळाबाह्य

## शाळाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण

## ७ मुले तर १२ मुलींचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

प्राथमिक शिक्षण विभागाकडून एक ते १५ जुले दरम्यान जिल्ह्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये १९ विद्यार्थी सापडले आहेत. त्या विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेच्या प्रवाहात आणण्याचे काम शिक्षण विभागाने केले आहे. त्यामुळे ते विद्यार्थी आता पुन्हा शिक्षण घेणार आहेत.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले होते. त्या सर्वेक्षणातून १९ शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात पुन्हा आणण्यात आले



आहे. जिल्ह्यातील १९ शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेत दाखल केले आहे. यामध्ये सात मुले तर १२ मुलींचा समावेश आहे. दरम्यान, प्राथमिक शिक्षण विभागाकडून दरवर्षी शाळाबाह्य विद्यार्थी शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वेक्षण केले जाते. त्यातून बरेच विद्यार्थी शाळेच्या प्रवाहात पुन्हा येत आहेत. सर्वेक्षणाची व्याप्ती वाढविण्याची मागणी पालकांतून होत आहे.

### सर्वेक्षणाची चौकशी हवी

सोलापूर जिल्ह्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याचा दावा नागरिकांतून वारंवार होत आहे. मात्र, शिक्षण विभागाने फक्त १९ विद्यार्थी शाळाबाह्य विद्यार्थी असल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे पुन्हा एकदा सर्वेक्षण व्हावे. तसेच ते सर्वेक्षण बरोबर आहे की, घरात बसूनच सर्वेक्षण केले आहे, याची चौकशी व्हावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

| | |
|---|---|
| शाळेत न गेलेली बालके | १३ |
| अनियमित हजर बालके | ६ |
| शाळाबाह्य बालके | १९ |
| परजिल्ह्यात स्थलांतरित | २३ |
| राज्यातून स्थलांतरित आलेली बालके | २७ |

### तालुकानिहाय आकडेवारी

अक्कलकोट - १, करमाळा ३ , माढा,. २ मोहोळ - ६, पंढरपूर - सांगोला - ४, उत्तर सोलापूर - ००, दक्षिण सोलापूर म हापालिका ३ असे १९ शाळाबाह्य विद्यार्थी आढळले आहेत.

### शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी विशेष मोहीम

प्राथमिक शिक्षण विभागाच्या शाळाबाह्य सर्वेक्षणामध्ये शहर जिल्ह्यातून केवळ १९ विद्यार्थी आढळले आहेत. क्षेत्रभेटीच्या सर्वेक्षणातून यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिक्षणामुळे मुलांच्या आयुष्यात परिवर्तन होते म्हणून आगामी काळात शाळाबाह्य मुलांना शोधून त्यांच्या शिक्षणासाठी विशेष मोहीम राबविण्याची गरज आहे.

**- मळसिध्द मुगळे, जिल्हा उपाध्यक्ष भाजपा**

## श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांच्या जयंती उत्सवानिमित्त करकंब येथे संतवाणी

### नादब्रह्म कला फाऊंडेशनच्या वतीने माऊलींचा जन्मदिवस होणार साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १२ऑगस्ट-**

गोकुळाष्टमी दिवशी श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती उत्सवानिमित्त आळंदी प्रमाणेच संपूर्ण जगात माऊलींच्या जन्मदिन उत्सव मोठ्या दिमाखात, उत्साहात साजरा होत आहे. करकंब येथेही नादब्रह्म कला फाऊंडेशन यांचेवतीने पद्मश्री पं. उल्हासजी कशाळकर यांचे शिष्य महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक श्रीपाद लिंबेकर (पुणे) यांचा संतवाणी ज्ञानेशांची कार्यक्रम चौंडेश्वरी देवी मंदिर सोमवार पेठ येथे सायंकाळी ५ते ७ यावेळेत आयोजित करण्यात येणार असून त्यांना संगीत साथ तबला गणेश लोहार, हार्मोनियम श्रीरंग जाकी, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ माऊली पिसे करणार आहेत. सुंदर कार्यक्रमासाठी करकंब आणि करकंब पंचक्रोशीतील सर्व माऊली भक्त आणि कलारसिक मायबाप श्रोत्यांनी जास्तीत जास्त संख्येने माऊलींचा ऐतिहासिक जन्मदिवस साजरा करण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन नादब्रह्म कला फाऊंडेशनचे ज्ञानेश्वर दुधाणे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९७६७७७६८५८ या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.





## श्री शंकरलिंग महाविद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १२ ऑगस्ट-**

वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथील श्री शंकरलिंग कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अकरावी (कला )शाखे मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक विश्वनाथ थळंगे उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य वीरेश थळंगे यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वनाथ थळंगे यांनी व्यक्तिमत्व विकास व गुरुचे स्थान याबद्दल मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिले. कार्यक्रमाकरिता संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, संचालक शिवशरण प्याटी, रमेश दुधगी,प्रकाश दुधगी, मल्लिनाथ थळंगे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिभा तांडूरे,शरणप्पा मसुती, गंगाधर बिराजदार सिद्धारूढ हिरेमठ, संतोष कस्तुरे, बाळकृष्ण गुंड, गौरीशंकर चनशेट्टी, कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन शरणप्पा मसुती यांनी मानले.

## मंद्रुपमार्गे एसटी बस सुरू करा

### आमदार देशमुखांचे अधिकाऱ्यांना सूचना

### नवीन बसस्थानक विषयी पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

सोलापूर ते विजयपूर जाणार्या व सोलापूर ते जतला जाणार्या एसटी बस मंद्रुपमार्गे सुरू करण्याचे निवेदन भाजपाचे तालुका संघटक गौरीशंकर मेंडगुदले, माजी सरपंच विश्वनाथ हिरेमठ व माजी सभापती डॉ. चनगोंडा हविनाळे यांनी आमदार सुभाष देशमुख यांच्याकडे केली . त्यानंतर आमदार देशमुख महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी अमर गोंजारी, चौधरी यांच्या बरोबर चर्चा करून एसटी बस सुरू करण्याच्या सूचना दिल्या. विजयपुरला जाणार्या एसटी तेरा मैल, मंद्रुप व नांदणीमार्गे सोडण्यात यावे अशी मागणी करण्यात आले. तर सोलापूर ते जत नवीन एसटी बस तेरामैल, मंद्रुप, माळकवठे, लवंगी, उमराणी व चडचणमार्गे सुरू करण्यासाठी निवेदन देण्यात आले.



### गुडापूरला जाणाऱ्या भक्तांची सोय

सोलापूर विजयपूर एसटी बस मंद्रुप नांदणीमार्गे व नवीन बस सोलापूर जत नवीन एसटी बस मंद्रुपमार्गे माळकवठे चडचणमार्गे सुरू केल्यास शेतकरी व प्रवाशांची सोय होणार आहे. चडचण बाजारपेठेला व गुड्डापूर तीर्थक्षेत्राला जाणार्या शेतकरी व भक्तांची सोय होण्यास मदत होईल. तसेच आमदारांनी मंद्रुपच्या नवीन बसस्थानका विषयी पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या.

**- गौरीशंकर मेंडगुदले, माजी तालुकाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा, दक्षिण सोलापूर**

## उमा महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथालय दिवस

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ ऑगस्ट-**

श्री पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित उमा महाविद्यालय पंढरपूर मधील ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय ग्रंथालय दिवस व जागतिक युवा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक संस्थेचे विश्वस्त व माजी प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक हे होते. प्राचार्य डॉ.धीरजकुमार बाड यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी गंधाली खिस्ते व प्रा.एन.एस.लोखंडे यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं तसेच संस्थेचे विश्वस्त व माजी प्राचार्य डॉ.मिलिंद परिचारक यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजाच्या १२ किल्ल्याचा युनेस्को वर्ल्ड हेरिटेज साईट्स मध्ये समावेश करण्यात आलेल्या व वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये आषाढी वारीची नोंद करण्यात आलेल्या फलकाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत प्रा.दत्ता सलगर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.अंजली



चौरे यांनी केले. सूत्रसंचालन साक्षी लालबोन्द्रे व सानिका कुलकर्णी हिने केले. आभार सानिका कुलकर्णी हिने मानले. या कार्यक्रम प्रसंगी प्रा.ए.व्ही. कुलकर्णी, प्रा.एन.एस. लोखंडे उपस्थित होते.

## पंढरपुरात १३ सप्टेंबरला राष्ट्रीय लोक अदालत

**पंढरपूर, दि.१२ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण, मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांच्या आदेशानुसार पंढरपूर येथे १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले असून, नागरिकांनी व पक्षकारांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश ए.एस. सलगर यांनी केले आहे. या लोकअदालतीत मध्ये पंढरपूर येथील सर्व न्यायालयातील प्रलंबित दिवाणी दावे, निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्टस अॅक्ट च्या कलम १३८ खाली दाखल झालेली, दाखलपूर्व प्रकरणे, वैवाहीक वाद, भूसंपादन बाबतची प्रकरणे, अपघात न्यायाधीकरणाबाबतची प्रकरणे, तडजोडपत्र फौजदारी खटले तसेच महाराष्ट्र राज्य महावितरण, भारत संचार निगम, बँका, पतसंस्था यांचे प्रकरणासह ठेवण्यात येणार आहेत. राष्ट्रीय लोकअदालतचा नागरिकांनी पक्षकारांनी आपले प्रलंबित असलेले व दाखलपूर्व प्रकरणे सामोपचाराने मिटविणे कामी राष्ट्रीय लोकअदालत मध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर यांचे मार्फत करण्यात आले आहे.



## सांगोला पंचायत समिती बचत भवन येथे हिमोग्लोबिन तपासणी

**सांगोला, दि. १२ ऑगस्ट-**

सांगोला पंचायत समिती बचत भवन येथे हिमोग्लोबिन तपासणी कार्यक्रम कार्यालयातील महिला कर्मचारी, अधिकारी यांचेसाठी घेण्यात आला.

स्त्रीरोग तज्ञ डॉ.निकिता देशमुख, गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कृषी अधिकारी दिपाली जाधव, उमेदचे अण्णा अवताडे, पंचायत अधिकारी महिला, अंगणवाडी पर्यवेक्षिका, कार्यालयीन महिला स्टाफ, आशा कार्यकर्ते, आरोग्य सहाय्यक जिलानी काझी, सुनील माने, सविता माळी, महानंदा कसबे, विकास बनसोडे, शेखर सुरवसे, डॉ.अक्षय कांबळे, रक्त चाचणीसाठी एचएलएल लॅबचे पंकज वाघमारे, रसिका गेजगे उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. संदीप देवकते, सूत्रसंचलन आरोग्य विस्ताराधिकारी मिलिंद सावंत यांनी केले.

## खंडाळी येथे 130 शालेय बॅगचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १२ ऑगस्ट-**

खंडाळी (ता. माळशिरस) येथे दि.१२ ऑगस्ट रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त जि.प. शाळा, खंडाळी येथील १३० विद्यार्थ्यांना शालेय बॅग भेट देण्यात आल्या, तसेच विविध स्पर्धेत यश प्राप्त केल्याबद्दल विध्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. हा कार्यक्रम लहुजी शक्ती सेनेचे युवक तालुका अध्यक्ष मारुती अवघडे यांच्या आयोजनात राबवण्यात आला.



कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विक्रम पराडे-वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी, माळशिरस तालुक्याच्या गटशिक्षण अधिकारी महामुनी, खंडाळी-दत्तनगरच्या विद्यमान सरपंच सुनीता सुरवसे,जि. प. माजी सदस्य बाळासाहेब धाईंजे,जय मल्हार क्रांति संघटनेचे जिल्हा अध्यक्ष काकासाहेब जाधव, रिपब्लिकन पार्टीचे मिलिंद सरतापे, माजी सरपंच बाबुराव पताळे,माजी उपसरपंच विठ्ठल पताळे, माळशिरस तालुका भाजप युवा मोर्चा सरचिटणीस व लोककल्याण प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे सचिव विनोद थिटे, अमोल पताळे, प्रवीणसिंह पताळे-पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी भक्ती नाचणे,केंद्र प्रमुख राजेंद्र ढकिरडे उपस्थित होते.

सदर शालेय वाटप साहित्य लोककल्याण प्रतिष्ठानचे सचिव विनोद थिटे यांच्या सहकार्याने राबविण्यात आले. यावेळी बाळासाहेब धाईंजे,मिलिंद सरतापे, विनोद थिटे, महामुनी यांनी विचार व्यक्त केले व या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते शाहू भोसले,लक्ष्मण खंडागळे, नागेश वाघंबरे, आबासाहेब वाघमारे, अमोल पिंपळे, राहुल कटके,राहुल खंडागळे, सुनील खंडागळे, अजय कांबळे,स्वप्नील सकट, अमोल खवळे,अभयकुमार वाघमारे, विशाल खंडागळे, देवा भोसले, बंडू खंडागळे, बापू अवघडे व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती समिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती तीच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले. दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहासाठी ना. शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केल्या बदल रिपाई आठवले तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांचा आणा भाऊ साठे जयंती समीतीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी करुन घेण्याचे महसूल प्रशासनाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १२ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरातील शेतकऱ्यांनी तात्काळ स्वतःच्या मोबाईलदवारे ७/१२ उताऱ्यावर लागवड केलेल्या खरीप हंगामातील पिकांची नोंदणी १ ऑगस्ट पासून करावी असे आवाहन पिलीवचे मंडलाधिकारी विजय एकतपुरे यांनी केले आहे. शासनाने हा प्रकल्प २०२१ पासुन संपूर्ण राज्यात राबविण्यास सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या निर्णयानुसार रब्बी हंगाम २०२४ पासुन या प्रकल्पात सुधारणा करुन डिजीटल क्रॉप सर्व्हे प्रणालीद्वारे ही संपूर्ण राज्यात लागु करण्यात आली आहे. सध्या खरीप हंगामातील पिक पाहणी कार्यवाही सुरु झाली आहे. खरीप हंगाम २०२५ साठी ई पिक पाहणी डिसीएस मोबाईल आपचे व्हर्जन ४.०.० अदयावत स्वरुपात गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी पहील्यादां अपचे अपडेट करून घ्यावे .खरीप हंगाम तील शेतकरी स्तरावरील पिक पाहणी १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत करुन घ्यावी .तर सहहायक स्तरावरील पिक पाहणी १५ सप्टेंबर ते २९ आक्टोंबर या कालावधीत करुन घ्यावी. शेतकऱ्यांनी शक्य तितकी लवकर पिक पाहणी करून घ्यावी .याबाबत काही अडचण आल्यास गाव कामगार तलाठी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नाझरा विद्यामंदिरमध्ये तिरंगा जनजागृती रॅली

**सांगोला, दि.१२ ऑगस्ट-**

सांगोला तालुक्यातील नाझरा विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजमध्ये हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत विविध उपक्रम राबवण्यात आले होते. यामध्ये तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी हातामध्ये ध्वज घेऊन प्रभात फेरीच्या माध्यमातून तिरंगा जनजागृती रॅली काढली होती. भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणांनी नाझरे गावातील विविध चौक दणाणून गेले होते. तसेच कलाशिक्षक रावसाहेब बंडगर, शुभांगी नागरसे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून तिरंगा या विषयावर रांगोळ्या साकारल्या होत्या.



## महत्त्वाचे



### हनुमान सार्वजनिक वाचनालयात डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी

**सांगोला, दि. १२ ऑगस्ट-**

श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय, वासुद (ता. सांगोला) येथे डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती ग्रंथपाल दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षक सागर व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी किरण पोरे यांनी डॉ. एस.आर रंगनाथन यांच्या कार्याचा इतिहास सांगून उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी उपस्थित मान्यवर व ग्रंथालय कर्मचारीवर्ग यांचा सन्मान करण्यात आला.




### माळशिरस रिपाइंतर्फे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा सत्कार

**वेळापूर, दि. १२ ऑगस्ट-**

केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री, भारत सरकार आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची नुकतीच पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी फेरनिवड झाली. या निवडीबद्दल माळशिरस तालुका रिपाइंतर्फे यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, सोलापूर जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले, तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, पश्चिम महाराष्ट्र संघटक एस.एम. गायकवाड, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर,नगरसेवक अमर माने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने केलेल्या सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक कार्याची प्रशंसा केली. पक्षाच्या संघटनविस्ताराबाबत आगामी काळातील योजनांवरही चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्षपदी फेरनिवड ही माळशिरस तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील रिपाइं कार्यकर्त्यांसाठी अभिमानाची बाब असल्याचे तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी सांगितले.



### कट्टेव्वादेवी गोशाळेत रक्षाबंधन

**वेळापूर, दि. १२ ऑगस्ट-**

वडकबाळ येथील श्री कट्टेव्वा देवी गोशाळा येथे अध्यक्ष उमा बिराजदार यांच्या हस्ते प्राणी मित्र विलास भाई शहा यांच्या प्रेरणेने गोमातेच्या रक्षणार्थ गोमातेला राखी बांधून गोमातेचे संरक्षण व संवर्धन करण्याचे संकल्प करण्यात आले. गोशाळेतील सर्व गोमातांना राखी बांधून रक्षाबंधन साजरा करण्यात आला.



### कुर्डूवाडीत आदिवासी दिन साजरा

**कुर्डूवाडी, दि. १२ ऑगस्ट-**

कुर्डूवाडी (ता. माढा) येथे आदिवाशी समाजाच्या वतीने जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी बिरसा मुंडा ,भागवत बनसोडे, सुहास टोणपे, सचिव संभाजी ब्रिगेड, जिल्हा सचिव शितल काळे, महिला भाजपा अध्यक्ष सोशल मीडिया मनोज काळे, अध्यक्ष नटवरलाल काळे, सतीश भोसले, महादेव काळे, सोमनाथ काळे, सविता काळे, चमू काळे सचिन काळे, सुमित भोसले, समाधान काळे, सुलतान मुलानी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन संस्थापक अध्यक्ष सतीश भोसले यांनी केले.

# अन्नछत्र मंडळाकडून महाप्रसादगृहाचे काम प्रगतीपथावर

## कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ ऑगस्ट-**

देश विदेशातील भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून अन्नदानाचे पवित्र कार्यसाठी पाच मजली अत्याधुनिक तंत्रज्ञानाने रचित महाप्रसादगृहाचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. अक्कलकोटच्या वैभवात भर टाकणारी ही वास्तू येत्या २०२८ पर्यंत साकार होणार असून या महाप्रसाद गृहामध्ये ५ हजार भाविक प्रतिक्षालयात बसू शकतील आणि एकाच वेळी २, ५०० भाविक महाप्रसाद घेतील, अशी व्यवस्था करण्यात आल्याची माहिती प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांनी दिली.




श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सदरचे बांधकाम सुरू आहे. वास्तुविशारद योगेश अहंकारी व स्ट्रक्चरल अभियंता संजय दाताडे यांच्या निरीक्षणाखाली हे बांधकाम सुरू आहे. १० नोव्हेंबर २०२४ रोजी या कामाचे भुमिपुजन करण्यात आले आहे.२० हजार स्केअरफुटावर सदरचे बांधकाम सुरू असून दररोज सरासरी ४० हजार भाविकांच्या महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येणार आहे. महप्रसादगृहाचे बांधकामसाठी ६५ कोटी रुपये खर्च येणार आहे. क्षेत्रफळ २०००० स्केअर फूट असून एकुण बांधकाम १२०००० स्केअरफूट आहे.मुख्य आकर्षण-पाच मजली अत्याधुनिक, वातानुकूलित महाप्रसादगृह व त्यावर १३ फुटी आसनावर ५१ फुटांची स्वामी समर्थांची मार्बल मुर्ती.इतर-मोठ्या प्रमाणावर व्यापारी गाळ्यांची रचना होणार असल्याने स्थानिकांना अर्थार्जनाची मोठी संधी मिळणार आहे.तर पार्किंगसाठी सुयोग्य नियोजन करण्यात येणार आहे.

> अन्नछत्र मंडळाची वाटचाल ही अक्कलकोट तालुक्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल अशी आहे.धर्म आणि सामाजिक बांधिलकीतून भोसले परिवाराची वाटचाल सुरू आहे. नव्या महाप्रसादगृहाच्या बांधकामाने नवा अध्याय सुरू होईल.महाप्रसादासोबतच स्वामीभक्तांच्या सोईसाठी व्यापक दृष्टिकोन ठेवून मंडळाने घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद आहे.प्रत्येक स्वामीभक्त व अक्कलकोट तालुक्यातील नागरिकांना अभिमान वाटला पाहिजे अशी या बांधकामाची रचना आहे.
>
> **- सचिन कल्याणशेट्टी, आमदार**

# ॲक्सिस बँक जॉब फेअरला उत्स्फूर्त प्रतिसाद

## शिवरत्न शिक्षण संस्था, शिवपार्वती ट्रस्ट, शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १२ ऑगस्ट-**

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून शिवरत्न शिक्षण संस्था, शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट आणि शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने क्सिस बँक जॉब फेअरचे आयोजन शिवरत्न नॉलेज सिटी येथे करण्यात आले. या रोजगार मेळाव्याला युवक युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला





याप्रसंगी ॲक्सिस बँकेचे अधिकारी विवेक अजमाने व धनश्री लोहकरे उपस्थित होते. त्यांनी बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी, आवश्यक पात्रता आणि निवड प्रक्रियेची माहिती सहभागी उमेदवारांना दिली. मेळाव्यात १४७ युवक-युवतींनी सहभाग नोंदवला. लेखी परीक्षा व मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड होणार आहे. प्रसंगी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिक्षणासोबत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे ही संस्थेची प्राथमिकता आहे. ग्रामीण भागातील तरुणांना करिअरच्या संधी मिळाव्यात व त्यांना मार्गदर्शन मिळावे, हा या जॉब फेअरचा उद्देश आहे. यावेळी शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्टचे संचालक विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, सचिव शिवदास शिंदे, धर्मराज दगडे, डॉ. विश्वनाथ आवड, श्रीकांत राऊत, नितीन बनकर, दत्तात्रय लिके,रामकृष्ण काटकर, शंकरराव मोहीते महाविद्यालयाचे प्राचार्य टिळेकर,मॅनेजमेंट स्टडीजचे प्राचार्य भारत साठे, ग्रीनफिंगर्स कॉम्प्युटर कॉलजचे उपप्राचार्य डॉ. महेश ढेंबरे, अश्रफ शेख उपस्थित होते.

# सद्गुरु संत बाळूमामा पुण्यतिथीनिमित्त कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन

**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

सद्गुरु संत बाळूमामा यांची पुण्यतिथी अत्यंत भक्तिभावाने साजरी केली जाणार आहे. कापसे मळा, पानगाव येथे यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १२ रोजी रात्री १० ते १२ या वेळेत गुरुवर्य हभप राघव चैतन्य महाराज, पुणे यांचे भावपूर्ण कीर्तन सेवा होणार आहे.



त्यानंतर रात्री १२ वाजून ५ मिनिटांनी फुले पडण्याचा कार्यक्रम संपन्न होईल. १३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. राघव चैतन्य महाराज यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. महाप्रसादाचे आयोजन कापसे यांच्यातर्फे करण्यात आले. काल्याच्या महाप्रसादाचे आयोजन बाबासाहेब साहेबराव करडे यांच्यातर्फे करण्यात आले आहे. या पावनप्रसंगी सर्व भाविक भक्तांनी सद्गुरु बाळूमामा यांचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पानगाव येथील सद्गुरु बाळूमामा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाबासाहेब कापसे यांनी केले आहे.

### ६२ हजार शाळांना मोफत डिजिटल शिक्षण देणार

**सोलापूर, दि. १२ ऑगस्ट-**

सगळ्या मुलांना शिक्षणाची समान संधी मिळावी, याच ध्येयाने खान अकॅडमी इंडिया आणि महाराष्ट्र सरकार एकत्र आले आहेत.आता राज्यातल्या सरकारी शाळांमधील मुलांना त्यांच्या अभ्यासक्रमावर आधारित,चांगल्या दर्जाचे डिजिटल शिक्षण साहित्य म ोफत मिळणार आहे.यासाठी ५ वर्षांचा करार झाला आहे,आणि यावेळी माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे आणि माननीय राज्यमंत्री भोयर उपस्थित होते.

# ढाळे पिंपळगाव, हिंगणी मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो

- जवळगावने केली पंचाहत्तरी पार
- बार्शी तालुक्यातील लघु व मध्यम प्रकल्पाची परिस्थिती

**तभा वृत्तसेवा। अरुण बळप**
**बार्शी, दि. १२ ऑगस्ट-**

२०२४ मध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्याने तालुक्यातील सर्व मध्यम आणि लघु पाटबंधारे प्रकल्प जुलै महिन्यात पूर्ण क्षमतेने भरले होते. मात्र यावर्षी तालुक्यात कधी नव्हे असा विक्रमी सरासरीपेक्षा दहापट पाऊस मे महिन्यातच पडला. त्यामुळे तालुक्यातील तळाला गेलेले लघु व मध्यम प्रकल्प शंभर टक्के भरण्याकडे वाटचाल करु लागले आहेत.

१२ लघु पाटबंधारे तलावांपैकी वैराग आणि कळंबवाडी लघु पाटबंधारे तलाव १०० टक्के भरले आहेत. तर उर्वरित तलावात ६० ते ७५ टक्के पाणी जमा झाले आहे. तीन मध्यम प्रकल्पातील ढाळे पिंपळगाव व हिंगणी १०० टक्के भरले आहेत तर जवळगाव मध्ये ७६ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. बार्शी तालुक्याचा विचार करता मागील वर्षी (२०२४) सरासरीच्या १५० टक्के असा विक्रमी पाऊस पडला. धाराशिव जिल्ह्यात ही चांगला पाऊस पडला त्यामुळे सर्वच प्रकल्प ओव्हरफलो झाले होते.

सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक चार मध्यम प्रकल्प हे बार्शी तालुक्यात आहेत. त्यापैकी जून महिन्यातच हिंगणी आणि ढाळे पिंपळगाव प्रकल्प १०० टक्के भरले. बालाघाट डोंगररांगा च्या पायथ्याशी असलेल्या पाथरी लघु पाटबंधारे प्रकल्पात ४० टक्के पाणी आहे. लघु प्रकल्पातील कोरेगाव ६४.९४ टक्के, चारे ८३.३३ टक्के, कारी ६०.६३ टक्के,कळंबवाडी १०० टक्के, वैराग (लाडोळे) १०० टक्के, काटेगाव ७०.५६ टक्के, वालवड ५७ टक्के ,ममदपूर ६० टक्के, शेळगाव आर २९ टक्के तर गोरम ाळे ५३ टक्के,आणि तावडी ६२ टक्के पाणी आहे. अशी माहिती पाटबंधारे उपविभागाचे उपविभागीय अभियंता विराज परदेशी यांनी दिली. बाभूळगाव बृहत लघु प्रकल्पात मात्र केवळ २ टक्के पाणी आहे. हा प्रकल्प भरण्यास वेळ लागणार असे दिसत आहे.

> यंदा पावसाळा सुरु होण्याच्या प्रारंभी प्रकल्प भरत आल्याने पुढे नद्या नाले पूर्ण क्षमतेने भरुन वाहत आहेत.आता ही पाऊस सुरुच आहे. तसेच आपल्याकडे परतीचा पाऊस हा जास्त पडतो हा नेहमीचा अनुभव आहे. त्यामुळे या पुढील काळात जास्त पाऊस पडल्यास नदीकाठी तसेच इतरत्र ही पिकांचे नुकसान होण्याचा धोका जास्त आहे.
>
> ढाळे पिंपळगाव मधून ६८ क्यूसेक,हिंगणी मधून १७८ क्यूसेक,तर वैराग मधून १५ क्यूसेकने नदी पात्रात विसर्ग सुरु आहे तर भोगावती आणि नीलकंठा नदीवर असलेल्या केटीवेअर बंधाऱ्यातुन विसर्ग सुरु आहेत यात मोहोळ तालुक्यातील भोयरे- १६००, देगाव- १४००, डिकसळ- १५०० तर बार्शी तालुक्यातील घाणेगाव- २००, इर्ले- ४८० आणि तडवळे या केटीवेअर बंधाऱ्यातुन ७५० क्यूसेकने विसर्ग सुरु आहे

# कॉरिडॉरचे संकट टाळण्यासाठी मंत्री नितीन गडकरींना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ ऑगस्ट-**

येथील संभाव्य कॉरिडॉर प्रकल्प रद्द व्हावा या मागणीसाठी कॉरिडॉर विरोधी कृती समितीच्या वतीने नागपूर येथे जाऊन भाजपाचे वरिष्ठ नेते तथा केंद्रीय रस्ते महामार्ग व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन त्यांना या बाबतचे निवेदन नुकतेच देण्यात आले.



पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाने कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी लवकरच भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होणार असून मालमत्ताधारकांचा या कॉरिडॉरला विरोध होत आहे. मात्र याकडे शासन दुर्लक्ष करत असल्यामुळे कॉरिडॉर कृती समितीच्या सदस्यांनी नागपूर येथे जाऊन केंद्रीय रस्ते महामार्ग दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन कॉरिडॉर रद्द करण्यात यावा याबाबतचे निवेदन दिले.

शासनाने पंढपुक्त पहिल्या टप्प्यात चौफाळा (गोपाळकृष्ण मंदिर) ते महाव्दार घाटापर्यंत कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ६३० मालमत्ता बाधित होणार आहेत. या मालम त्ताधारकांना योग्य मोबदला देण्यासाठी बैठकीचे सत्र सुरू करण्यात आले आहे. मात्र कॉरिडॉरला मालमत्ताधारकांचा विरोध होत आहे. कांही दिवसापूर्वी मालमत्ता धारकांनी कॉरिडॉरचा आराखडा चंद्रभागा नदीमध्ये बुडवून आंदोलन केले होते. त्या नंतर महिलांनी देखील या विषयात उडी घेत रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना नो कॉरिडॉर लिहिलेल्या राख्या पाठविल्या, तसेच कॉरिडॉर करण्यात येऊ नये याबाबतचे निवेदन देखील पाठविले आहे. एकीकडे मालमत्ता धारकांकडून कॉरिडॉरला विरोध होत असतानाच दुसरीकडे मात्र शासन या विरोधाकडे दुर्लक्ष करून कॉरिडॉर राबविण्याच्या प्रक्रियेतील एक एक टप्पे मार्गी लावत असल्याचे दिसत आहे. त्याचाच भाग असलेल्या भूसंपादनाची प्रक्रिया राबविण्यासाठी तीन उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी मालमत्ता धारकांबरोबर बैठक घेऊन किती मोबदला देण्यात येणार याची माहिती देत आहे. मात्र शासनाकडून देण्यात येणारा मोबदला खूपच कमी आहे.

यामुळे काही मालमत्ताधारकांनी ज्यादा मोबदल्याची मागणी देखील केली आहे. तर अनेकांनी कॉरिडॉरला विरोध दर्शविला असून तो करण्यात येऊ नये यासाठी आंदोलने करण्यात येत आहेत. दरम्यान याचाच एक भाग म्हणून कॉरिडॉर कृती समितीचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी इचगावकर, संपर्कप्रमुख व्यंकटेश कुलकर्णी, गणेश लंके, कौस्तुभ गुंडेवार आणि पार्थ बेणारे यांनी चक्क नागपूर येथे जाऊन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला व पंढरपुरात होणाऱ्या कॉरिडॉरकडे लक्ष वेधून कॉरिडॉरमुळे सुमारे ६३० मालमत्ता धरक बाधित होणार आहेत. तरी तो होऊ नये यासाठी आपण जातीने लक्ष घालावे अशी मागणी केली आहे.

### ● संरसंघचालकांनाही दिले निवेदन

कॉरिडॉर कृती समितीच्या सदस्यांनी नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयात जाऊन तेथील डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. सरसंघचालक मोहन भागवत यांना ही निवेदन देण्यात आले.

### ● प्रकल्पाचा आढावा घेऊन गडकरी निर्णय देणार

कॉरिडॉर प्रकल्प रद्द करून त्याच निधीतून तीर्थक्षेत्र विकास करण्यात यावा असे निवेदन केंद्रीय रस्ते विकास व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांना देण्यात आले, यावर नितीन गडकरी यांनी पूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन तसेच या प्रकल्पाचा आढावा घेऊन योग्य तो निर्णय लवकरच आपणास कळवू असे आश्वासन कॉरिडॉर विरोधी कृती समिती यांना दिल्याची माहिती अभयसिंह कुलकर्णी (इचगावकर) यांनी दिली.

### ● खास पंढरपूरी चिवड्याची गडकरींना भेट

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे उत्तम खवैय्ये देखील आहेत. देशात,परदेशात कुठेही त्यांचा दौरा असला की, तेथील कोणत्या खाद्यपदार्थांची खासीयत आहे याची माहिती घेऊन तो पदार्थ ते आवडीने खातात. पंढरपूरचा चिवडा देखील सर्वदूर प्रसिध्द आहे. पंढरपूरी चिवड्याचे राज्यात, परराज्यात तसेच परदेशात देखील विविध क्षेत्रातील अनेक मातब्बर मंडळी चाहते आहेत. त्यामुळे गडकरींच्या भेटीसाठी गेलेल्या पथकाने खास पंढरपूरी चिवडा गडकरींना भेट देण्यासाठी नागपूरला नेलेला होता. केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी देखील पंढरपूरी चिवड्याची भेट आनंदाने स्विकारली.